पाक्षिक


समाज आणि राष्ट्राच्या नवरचनेसाठी

www.peoplespost.in

# द पीपल्स पोस्ट

वर्ष : १ । अंक २० । मराठी पाक्षिक । मूल्य : २५। दिनांक १५ ते ३० जून २०१९



डॉ.रावसाहेब कसबे

**पर्याय नसल्यामुळं जनतेनं दिली पुन्हा मोदींच्या हाती सत्ता**



डॉ.सूर्यनारायण रणसुभे

**कामगार अन् शेतकऱ्यांचेही तारणहार : डॉ. आंबेडकर**



प्रो. सुखदेव थोरात

**जातिभेद अन् हिंसाचाराबाबत कोडगा बनत चाललाय समाज**


With Best
Compliments
Sos. Agrotech Pvt.Ltd

● संपादक

**चेतन शिंदे**

● मांडणी व सजावट

**सचिन ओव्हाळ**

● संपादकीय पत्रव्यवहार

११, तळमजला, बी ब्लॉक,
लक्ष्मी निवास, जे. के. सावंत मार्ग
यशवंत नाट्यमंदिरासमोर, माहिम (प.)
मुंबई ४०००१६

● संपर्क

८८८८५४१८२२
९५८८४५११५१
E mail :
thepeoplespost2014@gmail.com



(या अंकातील सर्व लेखांचे हक्क सुरक्षित)


*अंकात व्यक्त झालेल्या लेखकांच्या मतांशी
संपादक सहमत असेलच असे नाही.

द पीपल्स पोस्ट | ८८८८५४१८२२


● जाहिरात विभाग संपर्क

९८२१४४५४०९/ ८८०५१५१४५२

● वर्गणीदारांसाठी संपर्क

**महाराष्ट्र / मुंबई :**
**विदर्भ** : अंकुश वाकडे : ९४२१४२४२४२
**मराठवाडा** : सचिन : ७३५००९१५६९
**मुंबई / कोकण** : संकेत तांबे : ७७३८७८४१३२


● वर्गणीचा धनादेश, धनाकर्ष

**द पीपल्स पोस्ट** या नावाने काढावा


पाक्षिक

# द पीपल्स पोस्ट

समाज आणि राष्ट्राच्या नवरचनेसाठी

स्थापना : २९ ऑगस्ट २०१८ । वर्ष : १ ।
अंक २० वा । मूल्य : रु. २५ । दिनांक १६ जून ते ३० जून २०१९



**संपादकीय :** भीमाच्या लेकरांसाठी आता खरोखरच सोशल सर्जिकल स्ट्राईकची गरज ५

पर्याय नसल्यामुळं जनतेनं दिली पुन्हा मोदींच्या हाती सत्ता – **डॉ.रावसाहेब कसबे** १०

संतपरंपरेचा कृषिनिष्ठ आविष्कार, संतपरंपरा आणि कृषिसंस्कृती – **प्रतिनिधी** १६

राजर्षी शाहूंचे शिक्षण धोरण व सामाजिक न्यायाची प्रस्थापना – **डॉ. राजेंद्र ना. गोणारकर** १९

कामगार अन् शेतकऱ्यांचेही तारणहार : डॉ. आंबेडकर –**डॉ.सूर्यनारायण रणसुभे** २२

तो फार विचार करतो –**बी.जी.वाघ** २५

जातिभेद अन् हिंसाचाराबाबत कोडगा बनत चाललाय समाज – **प्रो. सुखदेव थोरात** २७

मुस्लिमांचे नोकऱ्यांमध्ये कमी प्रतिनिधीत्व –**अजय के. नाईक, खलिद खान, आशुतोष वर्मा** ३०

बहुजनांच्या दुरवस्थेला इंग्रजच जबाबदार असल्याचा नेमाडेंना साक्षात्कार – **नागनाथ कोत्तापल्ले** ३४

**व्यक्तिविशेष :** अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या लढाईतील महायोद्धा – **प्रकाश खंडेलोटे** ३७

**ग्रंथपरिचय :** समाजभानी विज्ञान कथा – **मिलिंद कसबे** ३९

**आजकालचे प्रश्न :** **पंक्चरवाला** ४१

**ग्रेट थॉट्स :** ४५


**कविता:** ४६

**कोण काय बोलतं... :** ४७



हे पाक्षिक, मालक, मुद्रक, प्रकाशक धम्मपाल भीमराव शिंदे यांनी मेत्ता प्रिंटर्स सीटीएस नं. १४४ मिल कॉर्नर, छावणी रोड, बारापुल्ला गेटजवळ, औरंगाबाद ४३१००१ येथे छापून फ्लॅट नंबर ए-४०३, जीएन नं. १०/२, ग्लोरियासिटी, एमएसईबी पावर हाऊसजवळ पडेगाव, औरंगाबाद ४३१००१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. *संपादक चेतन भीमराव शिंदे (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांची राहील.) सर्व वादविवाद औरंगाबाद जिल्हा न्यायालयीन कक्षेत. प्रकाशित झालेल्या लेखकांच्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. नोंदणी क्र. MAHMAR/2018/76460

## वाचकांची पत्रे




## संपादकीय उत्तमच!

काय, पाशवी बहुमत एकाधिकारशाहीच्या वाटेवरून चालेल? असा सवाल करणारे १ ते १५ जूनच्या अंकातील संपादकीय वाचनीय होते. भाजपने २०१९ ची लोकसभा निवडणूक विकास कामांऐवजी भावनांचीच बनवली होती. केवळ देव, धर्माचा धोशा लावून लोकांच्या पोटापाण्याचे प्रश्न सुटत नाहीत. तरीही लोकांच्या जीवन-मरणाचे प्रश्न बाजूला सारून भाजपवाल्यांनी धर्मवाद आणि राष्ट्रवादाचे स्तोम माजवले आणि लोकांच्या भावनांशी खेळून प्रचंड मताधिक्याने निवडून आले. आपण नोंद घेण्यासारखे कोणतेही काम केले नसताना लोकांकडे कोणत्या तोंडाने मतं मागायची, अशी भीती भाजपवाल्यांना वाटत होती. त्यामुळे त्यांनी सर्जिकल स्ट्राईक आणि पाकिस्तानातील हवाई हल्ल्याचे तसेच देवा-धर्माच्या मुद्याचे राजकारण करून लोकांची दिशाभूल केली, या सर्व बाबींवर संपादकीयामध्ये ताशेरे ओढले आहेत. एकूणच संपादकीय उत्तम होते. **– संजय कांबळे, पुणे**

## 'ग्रेट थॉट्स' ला आणखी जागा द्यावी

आपल्या प्रत्येक अंकात प्रसिद्ध होणारे ग्रेट थॉट्स हे सदर आमचं सर्वाधिक आवडीचं सदर आहे. या सदरात एका पानावर केवळ आठच विचारवंतांचे विचार असतात. म्हणून यासाठी आणखी एक पान वाढवून मिळावे, असे आम्हाला वाटते. समाजात सकारात्मक विचार पेरण्याचे काम यामधून होत असते. चांगले आणि प्रेरणादायी विचार समाजासाठी दिशादर्शक ठरत असतात. ग्रेट थॉट्ससाठी आणखी एक पान मिळाले तर जास्तीत जास्त विचारवंतांच्या विचारांमधून समाजाचं प्रबोधन होण्यास मदत होईल, असे वाटते. **– संदेश मिसाळ, विजय कांबळे, कोल्हापूर**

## महाराष्ट्राचे 'भूषण'

न्यायव्यवस्थेतील सजग प्रहरी न्या. भूषण गवई हे १ ते १५ जूनच्या अंकातील प्रकाश खंडेलोटे यांनी लिहिलेले व्यक्तिविशेष न्या. भूषण गवई यांच्या कार्यावर प्रकाश टाकणारे आहे. तब्बल नऊ वर्षांनी न्या. भूषण गवई यांच्या रूपाने अनुसूचित जातीतील व्यक्ती सर्वोच्च न्यायालयात न्यायाधीश बनली आहे. आपल्या कर्तृत्वाने या पदापर्यंत पोहोचणारे न्या. भूषण गवई हे महाराष्ट्राचे भूषणच आहेत. व्यक्तिविशेषमधून त्यांच्या कार्याचा जो परिचय करून देण्यात आलेला आहे, तो या क्षेत्रात येऊ इच्छिणाऱ्या तरुणांसाठी प्रेरणादायी आहे. **– समाधान वानखेडे, नागपूर**

## निवडणूक निकालाचे कव्हरेज इतरांपेक्षा वेगळे

१ ते १५ जूनच्या अंकात दिलेला लोकसभा निवडणुकीच्या निकालांचा वृत्तांत इतरांपेक्षा वेगळा आणि वाचनीय होता. वंचित बहुजन आघाडीच्या राजकीय वाटचालीचा आढावा आणि या आघाडीच्या उमेदवारांनी घेतलेली मते याबद्दलची माहिती ज्ञानात भर घालणारी होती. राज्यनिहाय निकाल, महाराष्ट्राचा मतदारसंघनिहाय निकाल, नवीन केंद्रीय मंत्रिमंडळ आणि आतापर्यंतचे पंतप्रधान ही सर्व माहिती इतरांपेक्षा वेगळ्या स्वरूपात दिली. त्याबद्दल संपादकांचे अभिनंदन. **– विनायक पाटील, नांदेड**

## वंचित बहुजन आघाडीची आश्वासक वाटचाल

राज्यभरातून ४० लाखांहून अधिक मतं मिळवणारी वंचित बहुजन आघाडी राजकारणात आश्वासक वाटचाल करीत असल्याचे दिसते आहे. 'वंचित बहुजन आघाडी राजकीय परिवर्तनाच्या दिशेने' हा १ ते १५ जूनच्या अंकातील यशपाल भिंगे यांचा लेख आघाडीच्या उदय आणि वाटचालीचा आढावा घेणारा आहे. आघाडीच्या मतदारसंघनिहाय मतांची आकडेवारीही प्रस्थापितांना धडकी भरवणारी असल्याचे दिसते. ॲड. प्रकाश आंबेडकर बहुजनांच्या हाती सत्तासूत्रे देण्यासाठी नेहमीच प्रयत्नशील राहिले आहेत. लोकसभेत त्यांच्या आघाडीला एक जागा मिळालेली असली तरी आघाडीच्या उमेदवारांना मिळालेल्या भरघोस मतांवरून वंचित बहुजन आघाडी येत्या विधानसभा निवडणुकीत चांगली कामगिरी करील, असे वाटते.

**– नितीन व्यवहारे, सोलापूर**

**सूचना**

अंकाविषयी आपण पाठवलेल्या प्रतिक्रियांचे जरुर स्वागत आहे.


संपर्क : 'द पीपल्स पोस्ट' सीटीएस नं. १४४, मिल कॉर्नर छावणी रोड, बारापुल्ला गेटजवळ, मिल कॉर्नर, औरंगाबाद - ४३१००१

ई-मेल : thepeoplespost2014@gmail.com

# भीमाच्या लेकरांसाठी आता खरोखरच सोशल सर्जिकल स्ट्राईकची गरज

गेल्या वेळेपेक्षा एकवीस जागा जादा जिंकून म्हणजे तीनशे तीन जागा जिंकून भाजप सत्तेवर आला. अर्थातच पक्षांचे संघटन असलेले 'एनडीए'ही सत्तेवर आले. जेव्हा निवडणूक निकाल जाहीर झाला तेव्हा दुसऱ्यांदा पंतप्रधान होणारे नरेंद्र मोदी 'एनडीए'च्या नवनिर्वाचित खासदारांसमोर म्हणाले, की गेल्या काही वर्षांत अल्पसंख्याक समाजाची सातत्यानं पिळवणूक करत त्यांना भीतीच्या आणि दबावाच्या वातावरणात ठेवण्यात आलं. त्यांची मतबँक बनवण्यात आली. पिळल्या गेलेल्या, दबल्या गेलेल्या सर्व समाजांनी यावेळी निर्भयपणे मतदान केले आहे. या सर्वांचा विश्वास आपण संपादन केला पाहिजे.

मोदींचं दोन-चार ओळीतलं हे भाष्य खूप महत्त्वाचं आहे आणि चकवा देणारंही आहे. दिशाभूल करणारंही आहे. लोकांची स्मरणशक्ती खूप अल्प असते असं त्यांनीही गृहीत धरलं असावं. मोदींनी जे सांगितलं ते खरंच मानायचं झालं तर ते स्वतः गुजरातचे मुख्यमंत्री असताना झालेल्या नरसंहाराचं काय करायचं? बाबरी मशीद उद्ध्वस्त झाल्यानंतरच्या दंगलीत बळी गेलेल्यांचं काय करायचं? ठिकठिकाणी झालेल्या स्फोटांचं काय काय करायचं, असा प्रश्न तयार होतो. गेल्या अनेक वर्षांत अल्पसंख्याकांच्या मतबँका झाल्या हे सांगताना मोदींनी काँग्रेसकडे बोट केलं असल्यास नवल वाटायचं काही कारण नाही. तो त्यांच्या राजकीय धोरणाचा भाग असू शकतो किंवा आहे. काँग्रेसमुक्त भारताकडे जाण्यास त्यांना बरंच यश आलंय हे नाकारून चालणार नाही. तो त्यांच्या राजकीय डावपेचांचा भाग आहे. जी गोष्ट डाव्यांना, समाजवाद्यांना जमली नाही ती मोदींनी करून दाखवली. काँग्रेस कोमात गेलीय. गतिमंद झालीय हे सारं खरंच आहे; काँग्रेसेतर पुरोगामीही कोमात गेले पण बदलाच्या तत्त्वानुसार जगात कोणतीही गोष्ट स्थितीशील असत नाही. लोक बदलतात, लोकांचा समाज बदलतो, राजकारण बदलतं. एवढंच काय छातीची मोजमापं बदलतात. भाजपेतर पक्षांचंही असंच होणार आहे.

मुद्दा हा आहे की, अल्पसंख्याक समाजावरील अन्याय-अत्याचार जातव्यवस्थेत नेहमीच होत असले तरी अलीकडच्या काळात ते वाढले आहेत. त्यातील क्रूरताही वाढली आहे. सरकारी आकडेवारीच हे सारं सांगते. तिच्यावर विश्वास ठेवून मांडणी करावी लागते. अन्याय-अत्याचाराच्या घटना देशभर घडत असल्या तरी प्रामुख्यानं उत्तरेकडे त्या अधिक होतात. मनूची परंपरा जपू पाहणारे तिकडे जास्त आहेत. मनूचा पुतळाही तिकडेच (जयपूर-राजस्थानमध्ये) आहे हेही वेगळं सांगण्याची आवश्यकता नाहीय. २००७ ते २०१७ या काळातील दशकाचा नमुना म्हणून अभ्यास करायचा झाल्यास या काळात अन्यायामध्ये ६६ टक्क्यांनी वाढ झालीय. म्हणजे भारतात दर पंधरा मिनिटाला दलिताविरुद्ध एक गुन्हा होतोय. प्रत्येक दिवसाला दलितांच्या सहा महिलांवर अत्याचार होतोय. म्हणजे बलात्कार, खून, धिंड असं काही तरी अनुचित घडतंय. या दशकात तीन वर्षे भाजप आणि चार वर्षे काँग्रेसची सत्ता होती. २०१४च्या पुढं भाजपचीच बलदंड सत्ता आलीय. विशेष म्हणजे, या कालावधीत अन्यायाचं स्वरूप अधिक उग्र झालंय. अन्यायामागची कारणं काही प्रमाणात बदलली. काही जुनीच आली. २०१४ ते २०१९ या पाच वर्षांत गायीच्या कारणावरून मुस्लिमांविरुद्ध अन्याय वाढले. सोबत अस्पृश्यांविरुद्धही वाढले. गाय ठार करणे, ती खाणं, तिचं मांस लपवणं, तिला त्रास देणं, तिला उपाशी ठेवणं, तिला दगड मारणं वगैरे गायकेंद्रित कारणं होती. त्यातून सातत्यानं खून, मारामाऱ्या, बहिष्कार यांसारख्या घटना घडत राहिल्या. दुसरीकडं जिथं भाजपची राज्य सरकारं होती त्यापैकी काही ठिकाणी गायीला देवीचा दर्जा, गायीला राष्ट्रमातेचा दर्जा देण्याचे प्रस्ताव मंजूर झाले. म्हणजे एकीकडे गायीला घटनात्मक संरक्षण, तिचं घटनात्मक उदात्तीकरण, घटनात्मक संवर्धन आणि दुसरीकडे त्याच्या आड येऊ पाहणाऱ्या किंवा तसा संशय असणाऱ्यांवर हल्ले असे प्रकार सुरू झाले. सांस्कृतिक राष्ट्रवादाच्या मध्यभागी गाय उभी होती. गायीच्या पलीकडची समाजरचना म्हणजे जातव्यवस्था टिकवण्याच्या प्रयत्नातूनही हल्ले सुरू होते आणि सुरू आहेत. अशा हल्ल्यांना घटनात्मक प्रतिबंध मोठ्या प्रमाणात होता; पण पुढं पुढं तो सैल करण्याचा प्रयत्न सुरू झाला. कधी राखीव जागा, कधी मंडल आयोग, कधी अस्पृश्यांचा जागा झालेला आत्मसन्मान, कधी मूलतत्त्ववाद्यांचा वाढता प्रभाव, कधी धर्माचा वाढता प्रभाव, कधी धर्मीय तणाव, कधी धर्मवाद्यांनी राजकारणाचा मध्यबिंदू व्यापून टाकणं वगैरे बरंच काही घडत गेलं. परिणाम अन्याय वाढत गेले. त्यामागची महत्त्वाची कारणं लक्षात घ्यायला हवीत. एक : आत्मसन्मानाची उभारी मारणाऱ्यांना दाबून टाकणं. दोन : आपली जीर्ण जातव्यवस्था पुनर्विकासासाठी त्यांना भाग पाडणं. तीन : हिंदू संस्कृतीत पवित्र मानल्या जाणाऱ्या गोष्टींचं रक्षण करणं. चार : हिंदुत्वाची व्याख्या वाढवत तीत अनेकांना बळजबरीनं ओढणं.

पुरोगामी म्हणून समजल्या जाणाऱ्या महाराष्ट्रातही दलित अत्याचाराच्या घटनांचं प्रमाण मोठं आहे. २९ जानेवारी २०१३ रोजी सातारा जिल्ह्यात दलित नवविवाहितांवर सवर्णांनी हल्ला केला. दलितांवर अन्याय करणाऱ्या राज्यांमध्ये दहा राज्ये आघाडीवर

आहेत. यात महाराष्ट्राचा क्रमांक वरचा आहे. अलीकडच्या काळात महाराष्ट्रात १७५० दलितांवर अन्याय झाले आणि ३१ हजार ३८८ महिलांचा छळ झाला. शेजारच्या कर्नाटकातही दलित अत्याचाराच्या घटना वारंवार घडतात. ७ सप्टेंबर २०१५ रोजी कर्नाटकातील हरदनहळ्ळी येथे मंदिर प्रवेश केल्याबद्दल चार दलित महिलांना मारहाण करण्यात आली.

आता २०१७ ते २०१९ मध्ये झालेल्या अन्याय-अत्याचाराची काही उदाहरणं वाचू आणि मग ती घडण्यामागचा विचार करू. उत्तर प्रदेश, राजस्थान, गुजरात वगैरे राज्यांतील ही उदाहरणे आहेत. उत्तर प्रदेश आणि मनूचा पुतळा मिरवणारे राजस्थान अन्यायात आघाडीवर आहे.

● **मार्च २०१७ :** बंगळुरूनजीक हरिहरपुरा या गावी सिदी नावाचा एक अत्यंत वेदनादायी विधी आयोजित केला होता. यात दलितांनी लोखंडी हुकाने आपले मांस काढून ते लाकडी खांबाला बांधले. उदुस सलम्मा देवी जत्रा महोत्सवानिमित्त आयोजित या अघोरी विधीस अनेक सामाजिक संघटनांनी विरोध केला होता.

● **पाच मे :** ठाकूर या उच्चजातीय लोकांच्या गटाने शरणपूर जिल्ह्यातील शब्बीपूर खेड्यात दलितांवर सशस्त्र हल्ला केला. त्यात एक दलित ठार झाला. १५ जखमी झाले. यामागं जातिभेदाचं कारण होतं.

● **सात मे :** मध्य प्रदेशातल्या छत्तरपूर जिल्ह्यात दलित वधू वरातीच्या वेळी सुंदर कपड्यांत आणि सजवलेल्या मोटारीत बसली म्हणून वरातीतील सहा जण आणि वधू यांना ठेचून जखमी करण्यात आलं.

● **मे २०१७ :** मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या भेटीच्या वेळी दलितांनी स्वच्छ होऊन जावं म्हणून त्यांना गावातील सवर्णांनी साबण आणि शाम्पू वाटला. कुशीनगर जिल्ह्यातील ही घटना.

● **जून २०१७ :** कर्नाटकातील हळीगोंडाकानल येथील निंगप्पा या दलित तरूणाने एका ग्रामस्थाच्या मुलीस पळवून नेल्याच्या संशयावरून त्याच्यासह त्याचे पिता मरेप्पा यांना झाडाला बांधून मारहाण.

● **३ जुलै २०१७ :** आपल्यावरील अन्यायाविरुद्ध पत्रकार परिषद घेऊन मुख्यमंत्र्यांना भेटू पाहणाऱ्यांना प्रतिबंध करण्यात आला.

● **जुलै २०१७ :** मराठवाड्यात दलितांना अंत्यसंस्कारासाठी जागा देण्यास सवर्णांचा नकार.

● **जुलै २-२०१७ :** केरळमध्येही दलितांविरुद्धचा अत्याचार मोठ्या प्रमाणात वाढतोय असा अहवाल अनुसूचित जातीसाठी असलेल्या राष्ट्रीय आयोगानं दिलाय. जून १६ ते एप्रिल २०१७ या वर्षात अन्यायाच्या ८८३ घटना या छोट्याशा राज्यात म्हणजे देवभूमीत घडल्या.

● **सप्टेंबर २०१७ :** गुजरातमध्ये पीयूष पारमार या २५ वर्ष वय असलेल्या दलित युवकाची सवर्णाकडून हत्या.

● **सप्टेंबर २९ – २०१७ :** गुजरातमध्येच कुणाल मगेरिया या तीस वर्षीय अस्पृश्य तरुणानं मिशा वाढवल्याबद्दल त्याची सवर्णाकडून हत्या.

● **सप्टेंबर ३०-२०१७ :** कर्नाटकात बेळ्ळूर तालुक्यात दसरा मिरवणुकीत सहभागी होऊ पाहणाऱ्या पाच दलितांना सवर्णांकडून मारहाण.

● **ऑक्टोबर १-२०१७ :** गुजरातमध्ये गरबा नृत्यात भाग घेतल्याबद्दल सवर्णांच्या बेभान गटानं २१ वर्षांच्या दलित तरुणाला ठार केलं.

● **ऑक्टोबर ३-२०१७ :** मोटारसायकलीवरून आलेल्या दोन सवर्ण तरुणांनी एका दलित तरुणाच्या मानेवर ब्लेड मारले.

● **जानेवारी १०-२०१८ :** मंदिराच्या तळगृहात अल्पवयीन मुलीवर बलात्कार करून खून. जम्मू-काश्मीरमधील कठुआ येथील घटना.

● **२ एप्रिल २०१८ :** अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाविरोधात पुकारलेल्या भारतबंद दरम्यान रस्त्यावर उतरून आंदोलन करणाऱ्या आंदोलनांपैकी हिंसाचारात नऊ जणांचा मृत्यू. ॲट्रॉसिटी कायद्याचा दुरूपयोग होत असल्याचे सांगून या कायद्यातील आरोपीला चौकशी शिवाय अटक करता येणार नाही, असा निर्णय या न्यायालयाने दिला होता. या निर्णयाविरोधात देशभरातील दलित जनता रस्त्यावर आली होती.

● **जून २०१८ :** तामिळनाडूतील शिवगंगा जिल्ह्यात काचनाथम येथे पायावर पाय ठेवून बसल्याच्या रागात दलित समुदायातील तिघांची उच्चवर्णीयांनी हत्या केली.

● **१० जून २०१८ :** जळगाव जिल्ह्याच्या जामनेर तालुक्यातील वाकडी येथील शेतकरी ईश्वर जोशी याच्या शेतातील विहिरीत पोहल्याच्या कारणावरून पहूर येथील दोन अल्पवयीन दलित मुलांना दोघांकडून बेदम मारहाण.

● **१५ जून २०१८ :** एका १३ वर्षीय दलित मुलाने एम्ब्रॉयडरीचा चामडी बुट घातला म्हणून चार राजपूत तरूणांनी त्याच्यावर हल्ला केला.

● **१७ जून २०१८ :** एक दलित व्यक्ती नेहमीप्रमाणे आपल्या सजवलेल्या घोड्यावर बसण्यासाठी जात असताना गुजरातमध्ये उच्चवर्गीय लोकांनी त्याला शिवीगाळ केली.

● **२१ जून २०१८ :** सरपंचाच्या घराजवळून मोटारसायकल नेली म्हणून दयाराम अहिरवार या ३० वर्षीय दलिताला बेदम मारहाण आणि जातीवाचक शिवीगाळ केली.

● **२२ जून २०१८ :** भोपाळ जिल्ह्यात परसोरीया घाटखेडी येथे किशोरीलाल जाटव या दलित शेतकऱ्याने त्याच्या जमिनीवर अतिक्रमणास विरोध केला म्हणून चौघांनी जाळले.

● **२४ जून २०१८ :** ६५ वर्षीय दलित महिलेची शेळी शेतात शिरली म्हणून तिला ठार मारण्यात आले. उत्तर प्रदेशातल्या फतेपूर जिल्ह्यात दतौली येथे ही घटना घडली.

● **२५ जून २०१८ :** सलूनमध्ये दलितांचे केस कापले (कटींग केली) म्हणून चौघांनी गुजरातच्या मेहसाना जिल्ह्यात न्हाव्यावर हल्ला केला.

● **मे २०१९ :** या महिन्याच्या पहिल्या एकाच आठवड्यात गुजरातमध्ये दलितांच्या लग्नाच्या वरातींवर सवर्णांनी हल्ला केल्याच्या

चार घटना घडल्या. मुख्यमंत्र्यांची मात्र या प्रकरणावर चुप्पी.

● **५ जून २०१९ :** राजस्थानात पाली येथे मंदिर प्रवेशाबद्दल दलित तरूणाला मारहाण आणि पुन्हा मंदिर प्रवेश करणार नाही असे सांगेपर्यंत नग्न केले.

● **७ जून २०१९ :** उत्तरप्रदेशातील कुशीनगर जिल्ह्याच्या अहिरौली बाजार पोलिस ठाण्याच्या हद्दीत एका १२ वर्षीय दलित मुलीवर सहा नराधमांनी केला बलात्कार.

● **१० जून २०१९ :** उत्तरप्रदेशात महिला आणि दलितांवरील वाढते अत्याचार म्हणजे भारतीय जनता पक्षाच्या दलितविरोधी मानसिकतेचा परिणाम असल्याची काँग्रेस प्रवक्ता रणदीपसिंग सुरजेवाला यांची टीका.

● **११ जून २०१९ :** कर्नाटकातील गुंडलपुर येथे मंदिर प्रवेश केल्याबद्दल दलितांची नग्न करून धिंड.

या दहा वर्षांतल्या काही घटनांवरून एक गोष्ट लक्षात येते की, या कालावधीत अन्यायाच्या घटनांमध्ये दुपटीनं वाढ झाल्याचं राष्ट्रीय गुन्हे अन्वेषण विभागात दिलेल्या माहितीवरून स्पष्ट होतं. अधिक खुलासा करायचा झाल्यास २००६ मध्ये अन्यायाच्या घटना २७ हजारांवर होत्या, त्या २०१७ मध्ये ३३ हजारांवर गेल्या. २००९ मध्ये एकूण गुन्हे ३३,५९४ होते ते २०१४ मध्ये ४७ हजारांवर गेले. बलात्काराच्या घटना १३४६ वरून २२३३ वर आणि खुनाच्या (म्हणजे फक्त दलितांच्या) घटना ६२४ वरून ७४४ वर गेल्या. राज्यवार विचार करायचा झाल्यास उत्तर प्रदेशात १४ मध्ये ८०६६, राजस्थानात ६७३४, बिहारमध्ये ७८७४ आणि मध्य प्रदेशात ३२९४ असे आकडे दिसतात.

२०१७ नंतरच्या दीड-दोन वर्षांत म्हणजे २०१९ मध्ये लोकसभेचा निकाल लागल्यानंतरही दलितांवरील अन्याय थांबलेले नाहीत. विशेष म्हणजे, मोदींचं भाषण जे सुरुवातीला दिलं आहे त्यानंतरही थांबलेल्या नाहीत. आंतरजातीय विवाह, चोरीचा संशय, चांगले जीवन जगणे, सवर्णांमधील नाव दलितांनी स्वतः साठी वापरणे, मंदिरात प्रवेश मागणं अशा अनेक कारणांवरून अन्याय झाले आहेत. ज्या दिवशी लोकसभा निवडणुकीचा निकाल लागला त्याच दिवशी बिहारमध्ये मोटारसायकलीवरून जाणाऱ्या एका अल्पसंख्याक तरुणाला सवर्ण तरुणाने अडवले. नाव विचारून गोळ्या घातल्या आणि जा पाकिस्तानला असं तो म्हणाला. या घटनेचा व्हिडिओ व्हायरल झाला.

हरियाणात नमाज पढून येणाऱ्या एका तरुणाला जमावानं अडवलं आणि 'जय श्रीराम' म्हणण्याचा आदेश दिला. त्यानं नकार दिल्यावर सवर्णांनी त्याला मारहाण केली. हीसुद्धा मेमधील घटना.

गुजरातमध्ये एका दलिताने २३ मे २०१९ रोजी फेसबुकवरून आपल्यावर झालेल्या अन्यायाची आणि सवर्णांनी केलेल्या मारहाणीची चर्चा केली म्हणून त्याला पुन्हा मारहाण झाली.

मध्य प्रदेशात गायीचे मांस ठेवल्याच्या संशयावरून २४ मे रोजी गोरक्षकांनी सओनी जिल्ह्यात एक मुस्लिम पुरुष आणि दोन महिलांना 'जय श्रीराम'चा घोष देत मारहाण केली. चौकशीअंती फिर्यादीकडे गोमांस नसल्याचं सिद्ध झालं. झारखंडमध्ये २५ मे रोजी एका कलाशिक्षकाला आक्षेपार्ह पोस्टबद्दल अटक झाली. एका विद्यार्थी संघटनेनं त्याच्याविरुद्ध आंदोलन केलं.

देशभरात ठिकठिकाणी अशा घटना घडत आहेत. एकीकडे पंतप्रधान दलित सफाई कामगाराचं पाय धुतात आणि दुसरीकडं अन्याय-अत्याचारही घडतात. या सर्व पार्श्वभूमीवर खरंच दलित समाज मानसिकदृष्ट्या सुरक्षित असेल की असुरक्षित, असा प्रश्न निर्माण होतो. आमच्याकडे कोणी दलित नाहीच. आहेत ते गरीब, श्रीमंत, स्त्री-पुरुष असं टाळ्या घेणारं उत्तर आता देऊन चालणार नाही; कारण टाळ्यांचा आवाज काही सामाजिक, मानसिक सुरक्षितता देत नाही हेही स्पष्ट होऊ लागलंय. हा 'देश माझा, मी देशाचा', 'हा समाज माझा, मी समाजाचा' अशी भावना तयार होण्याची गरज आहे. ती करायची असेल तर स्वातंत्र्य, समता, बंधुता, सामाजिक न्याय या मूल्यांकडे जावं लागणार आहे. राज्यघटनेचा आम्ही आदर करतो, डॉ. बाबासाहेबांचा आदर करतो असं सांगून चालणार नाही तर भीमाची लेकरं सैरभैर का केली जात आहेत, हेही तपासायला हवं. हे सारं आपोआप घडतंय की जाणीवपूर्वक कुणीतरी घडवतंय हेही तपासायला हवं. काहींना मनू का हवा आहे, काहींना जाती का हव्या आहेत? याच वर्तनाला आपण समाजद्रोह, राष्ट्रद्रोह का म्हणत नाहीय?

वाढता धर्मवाद, वाढता सांस्कृतिक राष्ट्रवाद, वाढता वर्णवाद या साऱ्यांचा सारांश म्हणजे या सगळ्या घटना आहेत. त्या मानवी मनात असुरक्षितता तयार करतात. त्या संपवण्यासाठी आपल्या सरकारनं कार्यक्रम घेतला पाहिजे. पोलिसांत नोंदवल्या गेलेल्या घटनांपेक्षा न नोंदवल्या गेलेल्या घटना खूप खूप म्हणजे खूपच असतात. त्यांचा अंदाज घेता येत नाही एवढ्या मोठ्या प्रमाणात त्या असतात. जात, राजकारण, दमदाटी यामुळे त्या पोलिसांच्या दप्तरापर्यंत कधीच पोहोचत नाहीत. बलात्कार, विनयभंग यासारख्या घटनांचा त्यात अधिक समावेश असतो. चारित्र्य, लज्जा, परंपरा आदी अनेक कारणांमुळे त्या मुक्या राहतात. त्यांना कोणीच बोलकं करू शकत नाही. सर्वप्रथम हे मान्य करायला हवं की, २०१४ ते २०१९ या काळात दलितांवरील अन्याय वाढले आहेत. दुसऱ्या बाजूला एखादा दुसरा अपवाद वगळता त्यावर चर्चा होत नाही. आंदोलनं होत नाहीत. या साऱ्या गोष्टी करणारे बरेच पुढारी आणि त्यांच्या संघटना आता सत्ताधाऱ्यांमध्ये जाऊन घुसल्या आहेत. त्यामुळे गेल्या सहा वर्षांत असे पक्ष, नेते किंवा संघटना आपल्याला अपवादानेच आढळतात, की ज्या या अन्यायाविरुद्ध संसदेत आणि बाहेर आवाज उठवत आहेत. सत्तेनं घालून दिलेल्या पिंजऱ्यात त्यांना राहावं लागतं. पिंजऱ्यात स्वेच्छेनं बंद करून घेणाऱ्या पोपटांची संख्या वाढते आहे. पिंजऱ्यालाच ते यशस्वी राजकारण समजतात किंवा समजू लागले आहेत. भांडवलशाहीनं खास करून तयार केलेला नवमध्यमवर्ग या सर्वांसाठी नाते सांगायला तयार नाही. २०-२५ वर्षांपूर्वी दक्षिण आफ्रिकेत एखाद्या काळ्याला पकडलं की येथे भारतातून १० कार्यकर्ते तरी त्याचा निषेध करायचे. मोर्चा काढायचे. निवेदनं प्रसिद्ध करायचे. अखिल मानव जातीच्या दुःखाशी आपलंही नातं जोडण्याची परंपरा फुले, शाहू, आंबेडकर यांनी तयार

करून ठेवली आहे. आता ही सारी परंपरा पुतळ्यात, स्मारकात, चिन्हात कोरण्याची खूप मोठी स्पर्धा चालू आहे. परिणाम गेल्या पाच-सहा वर्षांत घडलेल्या किंवा जमावाकडून घडवल्या गेलेल्या अनेक अमानवी घटना पाहून, ऐकून समाजमन कधी हादरल्याचं जाणवलं नाही. काही अपवाद वगळता समाजानं मूकबधिर होऊन या घटना पाहणं पसंत केलं आहे. अनेक घटनांमध्ये बहुसंख्य समाजच आरोपी आहे. जेव्हा समाजच कायदा मोडतो, बंधुतेच्या गळ्याला नख लावतो तेव्हा गंभीर परिस्थिती तयार होते. शिक्षा कोणाला, कशी आणि किती द्यायची, असा प्रश्न निर्माण होतो. समाजच एखाद्या गोष्टीला धर्माचे, प्रतिष्ठेचे अवरण लावून आक्रमक होतो तेव्हा कायदा दुबळा होतो. त्याच्याही डोळ्यावर गांधारीप्रमाणे काळी चिकटपट्टी लावली जाते. अनेक प्रकरणं पोलिसांतच जात नसतील आणि गेलेली हलवून कोर्टापर्यंत नेली जात नसतील आणि कोर्टातली साक्षीदारांअभावी किंवा ते फितूर झाल्यामुळे उलटत असतील तर काय करायचं?

अन्याय-अत्याचारांच्या घटनांमधील कारणं जवळपास समान आहेत. 'मनुस्मृती'नं नाकारलेल्या गोष्टी करण्याचा ज्यांनी प्रयत्न केला तेथील बहुसंख्य समाजातील मनू जागा झाला. जो महाडच्या सत्याग्रहात गाडला गेला होता. तो संपला असं आपण मानत होतो; पण वास्तव तसं नाहीय. तो जागा ठेवला गेला होता. बाहेर पडण्याची वाट आणि पूरक वातावरणाची प्रतीक्षा तो करत होता. ज्या मनूनं महिलांना युगायुगाचे गुलाम केलं त्या काही महिलाच मनूचं समर्थन करू लागल्या. बाबासाहेबांनी भारतातल्या स्त्रीमुक्तीसाठी हिंदू कोड बिल तयार केलं होतं, त्याला विरोध करण्यात काही महिलाही आक्रमक बनल्या होत्या. मोर्चा काढत होत्या. निवेदनं देत होत्या. पुरुषप्रधान, मनुप्रधान व्यवस्था हे पद्धतशीरपणे घडवत होती. ज्यांच्या मुक्तीसाठी हिंदू कोड बिल त्याच कसा त्याला विरोध करतात हे कोड्यासारखं वाटत होतं. हळूहळू ते सुटायला लागलं. पुरुषप्रधान, मनुप्रधान व्यवस्थेचे लपलेले दात आणि नखं दिसू लागली. तर ज्या काही अगणित घटना घडल्या त्यातलं सूत्र काय? दलितांनी नवी वस्त्रं परिधान केली, त्यांनी घोड्यावरून वरात काढली, त्यांनी नवं घर बांधलं, ते धार्मिक उत्सवात गेले किंवा आत्मसन्मान जागा करत आणखी काही तरी करून बसले. ज्या गोष्टींना मनूनं नकार दिला होता अशा काही गोष्टी ते करून बसले. व्यवस्थेच्या शिक्षेस पात्र ठरले. एक अस्वस्थ, असुरक्षित मन घेऊन जगू लागले. हाच समाज राष्ट्र खऱ्या अर्थानं घडवत असतो.

एखादा समाज आरोग्यदायी आणि आनंदी आहे की नाही हे कसं ओळखायचं? या समाजाचा देश महान होतो तेव्हा, तो धावू लागतो तेव्हा, त्याचं दरडोई उत्पन्न वाढतं तेव्हा, नोकरी-शिक्षणातला टक्का वाढतो तेव्हा, चांगल्या इमारतीत जातो तेव्हा, ऑनलाईन व्यक्त होतो तेव्हा, त्याचं राजकारण फुलतं तेव्हा, त्याच्यासाठी घोषणा होतात आणि ते कोणत्या तरी लंगोटीसारख्या योजनांचे धनी होतात तेव्हा, ते मॉलमध्ये जातात आणि जागतिकीकरणात प्रवेशतात तेव्हा? कधी होतो समाज आनंददायी आणि संपन्न? याचं उत्तर सामान्य माणूसही देईल. त्यासाठी बुद्ध किंवा सॉक्रेटिसकडे जाण्याची गरज नाहीय. साधं उत्तर आहे आणि ते म्हणजे त्याच्या जगण्याला, आत्मसन्मानाला सुरक्षितता लाभली पाहिजे. समाज आणि शासनानं ती तयार करायला हवी. असुरक्षित जगणारा समाज कधी राष्ट्राचा, राष्ट्रवादाचाही विकास करू शकत नाही. ज्याला आपल्या श्वासाचीच गॅरंटी, वॉरंटी ठाऊक नाही. ज्याच्या श्वासाची एक्स्पायरी डेट कधीही येते तो कसा करेल राष्ट्राचा विचार? त्याच्या दृष्टीनं सुरक्षित जगणं आणि आत्मसन्मान बाळगून जगणं प्राधान्याचं असतं.

काळाला मागं नेणारा हा अन्याय-अत्याचाराचा प्रवाह रोखायचा कसा? कोण रोखणार, कायदा काय करणार, तो चालवणारं सरकार काय करणार, सरकार स्थापन करणारे पक्ष काय करणार, हिजड्यासारखा बनू पाहणारा आणि त्यालाच ब्यूटिपार्लरमध्ये नेऊ पाहणारा आणि भांडवली व्यवस्थेनं मुद्दामहून तयार केलेला नवमध्यमवर्ग काय करणार, याची उत्तरं मिळत नाहीत किंवा खूप अंधुक मिळतात. अन्यायाची पातळी वाढत चाललीय आणि तो करणाऱ्यांचं बळ वाढत चाललंय. मिशी वाढली म्हणून थेट खून कसा काय होतो? या क्रूरतेची सप्लायलाईन कोणी सुरू केलीय आणि कशी सुरू केलीय, हेही एक उघड आणि सामर्थ्यवान गुपित ठरतं आहे. खरंच आपल्याला हा समाज बंधुतेकडे आणि सुरक्षिततेकडे न्यायचा आहे की नाही? खरंच आपल्याला दुर्गंधीनं भरलेल्या आणि अमानवी व्यवस्थेच्या निकालाचा विचार करायचा आहे की नाही? आपल्या पंतप्रधानांनी पाकिस्तानमध्ये घुसून सर्जिकल स्ट्राईक केलं आणि भारतभर एक देशभक्तीची लाट उसळली. तिचं मतांत रूपांतर झालं की नाही हा वेगळा प्रश्न आहे. पण सर्जिकल स्ट्राईक करून सीमेबाहेरच्या शत्रूच्या काळजात आपण धडकी भरवली होती. आता प्रश्न आहे तो आपल्या देशातील बंधुता, राज्यघटना, धर्मनिरपेक्षता यांना इलाज पोहोचवू पाहणाऱ्या काहींविरुद्ध सामाजिक स्ट्राईक करायचा की नाही? त्यासाठीचं राजकीय बळ ज्यांच्याकडे आहे त्यांनीच यासाठी पुढाकार घ्यायला हवा. अर्थात, शत्रूच्या घरात घुसून सर्जिकल स्ट्राईक करणे तसे तंत्रज्ञानाच्या दृष्टीनं सोपं असतं. पण इथं तर पिळणारे आणि पिळले जाणारे आपलेच लोक आहेत. क्षेपणास्त्राचा इथं उपयोग होत नाही. अंधार दूर करणारी, बंधुता जागवणारी नवी वैचारिक क्षेपणास्त्रं तयार करावी लागतात. फुले, शाहू, आंबेडकरी परंपरेनं वापरलेली अशी शस्त्रं नव्यानं वापरावी लागतात. कोणा राफेल वा अंबानीकडे ती मिळत नाहीत. एच.ए.एल.मध्येही तयार होत नाहीत. ती तयार करण्याचं आव्हान आपल्यालाच स्वीकारावं लागणार आहे. अस्पृश्यांना कोणत्या तरी कारणांनी वेचून वेचून मारण्याची ही मरणाची साखळी तोडायची असंल, विषमता जन्माला घालणाऱ्या व्यवस्थेचं गर्भाशयच फेकून द्यायचं असंल तर भीमाच्या लेकरासाठी सोशल सर्जिकल स्ट्राईकची गरज आहेच आहे. ज्यांना राजकीय सुरक्षितता भरभरून मिळाली आहे त्यांनीच हे करायचं आहे. गंगा शुद्ध करण्याची जशी गरज आहे तशी ती अशुद्ध करणाऱ्यांची मनं साफ करण्याचीही गरज आहे. म्हटलं तर हे काळाचंच आव्हान आहे. म्हटलं तर समाज, देश सुंदर करण्यासाठीचंही ते आव्हान आहे. ●●●

# भय इथले संपत नाही...



● गुजरातमधील मेहसाना जिल्ह्याच्या कडी तालुक्यात लोर येथे दलित समाजातील नवरदेवाची घोड्यावरून वरात काढल्याच्या कारणावरून गावातील उच्चवर्गीयांनी दलित समाजावर बहिष्कार टाकला होता. ही घटना मे २०१९ मध्ये घडली.



● कर्नाटकातील बिजापूर जिल्ह्याच्या गुंडनकाला गावच्या एका २१ वर्षीय गर्भवती मुस्लिम तरूणीस तिच्या माहेरच्यांनी जीवंत जाळले. गावातीलच सायबन्ना शरणाप्पा कोन्नूर या २४ वर्षीय तरूणाशी विवाह केल्याच्या रागातून हे कृत्य करण्यात आले.



● जळगाव जिल्ह्याच्या जामनेर तालुक्यातील वाकडी येथील शेतकरी ईश्वर जोशी याच्या शेतातील विहिरीत पोहल्याच्या कारणावरून पहूर येथील दोन अल्पवयीन दलित मुलांना दोघांनी बेदम मारहाण करून त्यांचे कपडे काढले.



● मध्यप्रदेशातील टिकमगढ जिल्ह्यात आपल्या शेतजमिनीवर अतिक्रमण करण्यास विरोध केला म्हणून दलित शेतकरी किशोरीलाल जाटव याला जिवंत जाळण्यात आले. त्याचे शोकमग्न नातेवाईक.



● गुजरातमधील अरवल्ली जिल्ह्याच्या मोडसा तालुक्यातील खंबीसार गावात दलितांच्या वरातीवर हल्ला केल्याच्या निषेधार्थ लोक १२ मे २०१९ रोजी रस्त्यावर आले होते. जमावाला नियंत्रणात करताना पोलिस.




● जम्मू काश्मिरातील कठूआ येथे अल्पवयीन मुलीवर बलात्कार करून खून केल्याच्या घटनेचा निषेध महिला संघटनांच्या कार्यकर्त्यांनी दिल्लीत केला.




'गरिबी हटाओ'ची घोषणा देऊन इंदिरा गांधी १९७१ मध्ये पंतप्रधान झाल्या. परंतु दिलेल्या घोषणेची पूर्तता करणे शक्य झाले नसल्याने जनतेत अ
धर्माला राष्ट्रवादाचा आधार बनवून २०१९ ची निवडणूक जिंकली. लोकांना फॅसिझमकडे नेणारा हा राष्ट्रवाद कळला नसल्याने मोदींना यश मिळा

# पर्याय नसल्यामुळं जनतेनं दिली पुन्हा मोदींच्या हाती सत्ता



डॉ.रावसाहेब कसबे

नरेंद्र मोदींचं सरकार येणं हे जवळजवळ निश्चित झालेलं होतं; परंतु ते एवढ्या बहुमताने येईल असं वाटलं नव्हतं. त्याला इतकं बहुमत मिळालेलं आहे की, त्यातून काही प्रश्न निर्माण झालेले आहेत. राज्यशास्त्राचा अभ्यासक म्हणून मला असं वाटतं की, आतापर्यंत भारतीय राजकारणामध्ये ज्या ज्या पक्षांना इतकं प्रचंड बहुमत मिळालेलं आहे, त्या पक्षांची सरकारं या ना त्या कारणांनी सर्वसामान्य जनतेने नाकारलेली आहेत. उदा. १९७१ साली इंदिरा गांधींनी बांग्लादेशच्या संदर्भात किंवा 'गरिबी हटाओ' संदर्भात ज्या घोषणा करून जनमत संघटित केलं होतं, त्यामुळे भरपूर मतं मिळाली आणि त्या पंतप्रधान बनल्या; परंतु त्यांना सरकार चालवणं कठीण गेलं. कारण १९७१ साली त्यांनी जी आश्वासनं लोकांना दिली होती, ती त्यांना पाळता येणे शक्य नव्हतं. कारण भारतातल्या भांडवलशाहीचा ज्या पद्धतीने विकास होत होता, तो लक्षात घेता कोणत्याही सरकारला या देशातील गरिबी हटवणे शक्य नव्हतं. भांडवलशाही अर्थव्यवस्थेवर उभी असलेली लोकशाही आणि दिलेल्या आश्वासनांमुळे सर्वसामान्य जनतेच्या ज्या अपेक्षा त्यांच्याकडून वाढलेल्या होत्या, त्या पूर्ण न झाल्यामुळे जनतेमध्ये उद्रेक झाला आणि बिहारपासून एक आंदोलन सुरू झालं. गुजरातमध्ये ते आंदोलन अधिक व्यापक झालं आणि पुढे ते संपूर्ण देशामध्ये पसरलं. या आंदोलनामध्ये अनेक नेते होते. त्यांच्यापैकी जयप्रकाश नारायण हे एक होते; परंतु या आंदोलनाला इंदिरा गांधींचं सरकार मोडून काढणं फार कठीण होतं. कारण त्यामध्ये अतिशय मोठमोठ्या व्यक्तींचा सहभाग होता आणि इंदिरा गांधी दिलेली आश्वासनं पाळत नाहीत



**असंतोष उफाळला. त्याचे पर्यवसान विरोधकांच्या उठावात झाले. परिणामी पुढील निवडणुकीत काँग्रेसचा पराभव झाला. नरेंद्र मोदी यांनी ले. परंतु हे यश देशातली लोकशाही टिकवून ठेवण्यासाठी पूरक ठरेल काय, असा प्रश्न विचारला जात आहे.**

म्हणून जनमत त्यांच्या विरोधी गेलेलं होतं. अशावेळी एकच मार्ग इंदिरा गांधींसमोर शिल्लक होता, तो म्हणजे या देशामध्ये आणीबाणी जाहीर करणं. त्यानुसार १९७५ साली त्यांनी राज्यघटनेतील तरतुदीनुसार देशामध्ये आणीबाणी लागू केली आणि लोकांची स्वातंत्र्ये काढून घेतली. इंदिरा गांधींच्या विरोधामध्ये चळवळ राबविणाऱ्या प्रमुख नेते व कार्यकर्त्यांना त्यांनी तुरुंगात टाकले. पण शेवटी इंदिरा गांधींना ही आणीबाणी उठवावी लागली. १९७७ साली इंदिरा गांधींच्या विरोधामध्ये जेवढे म्हणून पक्ष संघटित झालेले होते, त्यामध्ये आरएसएस, समाजवादी पक्ष होते, काँग्रेसमधून फुटून आलेले काही तरूण तुर्क होते. त्यामध्ये मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचा फार मोठा सहभाग होता. यावरुन आपल्या असं लक्षात येतं की, इंदिरा गांधींना आणीबाणीशिवाय दुसरा कुठलाही पर्याय नव्हता आणि म्हणून त्यांनी या सगळ्या लोकांना १८ महिने तुरुंगात डांबलं. पण पुढे आणीबाणी यापेक्षा अधिक काळ सुरू ठेवता येणार नाही हे त्यांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी आणीबाणी उठवली, त्याचक्षणी सगळे विरोधक संघटित झाले. त्यांनी जनता पक्ष नावाचा एक राजकीय पक्ष स्थापन केला. त्याच्यामध्ये काँग्रेसमधून फुटून आलेले जगजीवनराम हे सहभागी होते. त्यांच्या एका प्रेस कॉन्फरन्सने देशातील संपूर्ण वातावरण बदलून टाकलं. त्या प्रेस कॉन्फरन्समध्ये जगजीवनराम असं म्हणाले होते की, Emergency was not the decision of cabinet म्हणजे आणीबाणी लादण्याचा निर्णय मंत्रिमंडळाचा नव्हता. याचा अर्थ आणीबाणीचा निर्णय एकट्या इंदिरा गांधींनी घेतला होता. राष्ट्रपती परदेशात असताना तिथे एक माणूस पाठवून त्यांची सही घेऊन येणं ही गोष्ट भारतीय लोकशाहीच्या इतिहासामध्ये अतिशय चमत्कारिक वाटावी अशा प्रकारची होती. म्हणून इंदिरा गांधींच्या विरोधी जनमत गेलं. १९७७ साली ज्या निवडणुका झाल्या, त्यात जनता पक्षाच्या हाती सरकार आलं. मोरारजी देसाई पंतप्रधान झाले आणि जगजीवनराम आणि त्यांच्याबरोबर चरणसिंग यांनाही राजकारणामध्ये महत्त्व प्राप्त झालं. जवळजवळ २ वर्षे ते सरकार टिकलं; परंतु तेही जनतेला दिलेली आश्वासनं पूर्ण करू शकले नसल्यानं त्यांच्यामध्ये अंतर्विरोध सुरू झाले. समाजवादी लोकांनी विशेषतः जॉर्ज फर्नांडिस यांनी जनता पक्षामध्ये एक मुद्दा उपस्थित केला की, एकाचवेळी तुम्हाला जनता पक्षाचं सदस्यत्व आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचं सदस्यत्व घेता येणार नाही. म्हणजे कोणतं तरी एक तुम्हाला सोडावं लागेल. त्यामुळे जनता पक्षामध्ये अंतर्गत अंतर्विरोध निर्माण झाला. त्याचदरम्यान १९७८ साली 'झोत' नावाचं पुस्तक मी लिहिलं. आरएसएसचे दुसरे सरसंघचालक गुरूजी गोळवलकर यांच्या 'बंच ऑफ थॉट्स' या ग्रंथाचा मी बारकाईने अभ्यास करून त्याची चिकित्सा 'झोत' मधून जनतेसमोर मांडली होती. हे पुस्तक आरएसएस आणि जनता पक्षातल्या जनसंघाच्या कार्यकर्त्यांना आवडलं नाही, म्हणून पुण्यामध्ये एस. जोशी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या जनता पार्टीच्या अधिवेशनात हे पुस्तक जाळलं गेलं. त्याची प्रतिक्रिया संपूर्ण देशात उमटली. स्वतः इंदिरा गांधींनी त्याचा विरोध केला. जयप्रकाश नारायणांनीही याचा विरोध केला. संसदेमध्ये, विधिमंडळात याच्यावर चर्चा झाली. पुस्तक जाळल्याने विचार

मरत नसतात, अशी अतिशय खंबीर प्रतिक्रिया इंदिरा गांधी आणि जयप्रकाश नारायण यांनी दिली. त्यानंतर जनता पार्टी फुटली आणि इंदिरा गांधी पुन्हा सत्तेवर आल्या. इंदिरा गांधींनी पुन्हा एकदा देशाची सत्ता हस्तगत केली. याचा अर्थ भारतीय लोकशाहीमध्ये एक अतिशय मूलभूत स्वरूपाचं विश्लेषण करायचं ठरवलं तर भारतीय जनमाणसात ही लोकशाही रुजलेली होती, असं आपण म्हणू शकतो; परंतु त्यानंतर १९८४ साली इंदिरा गांधींची हत्या झाली आणि राजीव गांधी पंतप्रधान झाले. हे मी येथे यासाठी नमूद करतोय की, इंदिरा गांधींना १९७१ साली प्रचंड बहुमत मिळूनही त्यांचं सरकार टिकलं नाही. त्यांना आणीबाणी जाहीर करावी लागली. परिणामी त्यांना सत्तेतून पायउतार व्हावं लागलं. राजीव गांधी यांच्या नेतृत्त्वाखाली १९८४ मध्ये काँग्रेसला भारतीय लोकशाहीच्या इतिहासात एवढं बहुमत मिळालेलं होतं, की तसं बहुमत यापूर्वी कुठल्याही राजकीय पक्षाला मिळालेलं नव्हतं; परंतु जसजसा काळ लोटत गेला तसतसे सर्वसामान्य माणसांचे प्रश्न, गरिबीचे प्रश्न, सर्वसामान्यांच्या रोजगाराचे प्रश्न आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर देशामध्ये छोट्या-छोट्या आंदोलनांना सुरुवात झालेली होती. या काळात 'शहाबानो' प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने निकाल दिलेला होता. तो निकाल शहाबानोच्या बाजूने फिरवण्यासाठी राजीव गांधींनी राज्यघटनेमध्ये दुरूस्ती केली. त्यामुळे देशातलं लोकमत राजीव गांधींच्या विरोधात गेलं. परिणामी देशामध्ये राजकीय परिवर्तनाला सुरुवात झाली. व्ही. पी.सिंग पंतप्रधान असताना १९९० साली अडवाणींनी एक महत्त्वाचा प्रयोग सुरू केला. बाबरी मशिद पाडून त्या ठिकाणी राममंदिर उभारण्याचा त्यांचा जो प्रयत्न होता, तो राजकीय इतिहासातला एक टर्निंग पॉईंट होता, राजकारणाला एक वेगळी दिशा देणारा होता. अडवाणींच्या या प्रयत्नातून देशामध्ये सरळ सरळ हिंदू विरूद्ध मुसलमान असा एक संघर्ष होऊ घातलेला होता. अडवाणींनी त्या संघर्षाला अधिक जागृत केलं. त्या काळात विशेषतः बिहारमध्ये त्यांची तीर्थयात्रा ज्यावेळी लालूप्रसाद यादवांनी अडवली, त्यावेळी अडवाणींच्या राजकीय पक्षाने व्ही. पी. सिंग सरकारचा पाठिंबा काढून घेतला. त्यामुळं ते सरकार पडलं. त्यानंतर आणखी दोन पंतप्रधान झाले; परंतु त्यांचा फारसा परिणाम सर्वसामान्य जनतेवर दिसला नाही. आपण पाहतो की, भारतीय जनतेचं जे मत आहे ते मत हळूहळू हिंदुत्त्ववादाकडे झुकायला सुरुवात झाली. त्याचं प्रमुख कारण हे अडवाणी होतं. म्हणजे स्वातंत्र्योत्तर भारताच्या इतिहासामध्ये लालकृष्ण अडवाणी हे पहिले असे नेते होते, ज्यांनी या देशामध्ये हिंदू आणि मुसलमान यांच्यामध्ये दरी निर्माण करण्याचा प्रयत्न केला अणि तिथून पुढे भारतीय राजकारणाला एक वेगळं वळण मिळालं. म्हणजे भारतीय लोकशाहीच्या दृष्टीने आणि भारतीय राज्यघटनेच्या सरनाम्याच्या तत्त्वाच्या दृष्टीने विचार केला तर अडवाणींचे हे सगळे विचार त्याच्याविरोधी होते. मला असं वाटतं की, अडवाणींनी स्वातंत्र्योत्तर भारतामध्ये केलेले सगळ्यात मोठे पाप म्हणजे त्यांनी सुरू केलेली 'रामरथ यात्रा' हे होय. अर्थात, त्याची सगळी फळं लालकृष्ण अडवाणी गेली ५ वर्षे भोगताहेत आणि त्यांना ती पुढेही भोगावीच लागतील. थोडक्यात सांगण्याचा मुद्दा असा की, जेव्हा जेव्हा एखाद्या राजकीय पक्षाला प्रचंड बहुमत मिळतं आणि विरोधी पक्ष दुर्बल असतात, त्यावेळी भारतीय राजकारणात इतक्या बहुमतानं निर्माण झालेलं सरकार टिकू शकत नाही हे सिद्ध झालेलं आहे. त्यानंतर अटलबिहारी वाजपेयी राजकीय पटलावर आले, पंतप्रधान झाले. त्यानंतर नरसिंहरावांच्या हाती सत्ता गेली. त्यानंतर पुन्हा एकदा भाजपच्या हाती सत्ता गेली. सोनिया गांधींच्या राजकारण प्रवेशानंतर मनमोहनसिंग पंतप्रधान झाले आणि त्यांनी १० वर्षे अतिशय व्यवस्थित, सर्वसमावेशक असं राजकारण केलं; परंतु भारतीय जनता पक्षाने आपल्या देशातल्या कार्यकारी व्यवस्थेमध्ये जे संघाचे लोक घुसवलेले होते, त्याचा परिणाम असा झाला की, मनमोहनसिंग यांचं सरकार विशेषतः भ्रष्टाचाराच्या दृष्टीनं बदनाम करणं त्यांना शक्य झालं. वस्तूतः त्याच्यामध्ये भ्रष्टाचार होता किंवा नव्हता हे माहिती नाही; परंतु न्यायालयाचं म्हणणं असं की, त्यासंदर्भात कोणीही इथे जबाब देण्यासाठी आलेलं नाही आणि म्हणून ती केस बंद करण्यात आली. या गोष्टीचा फायदा घेऊन काँग्रेस सरकार भ्रष्ट सरकार आहे, अशी एक प्रतिमा संपूर्ण भारतासमोर उभी करून नरेंद्र मोदी भारतीय राजकारणात उदय पावले. त्याचा इतिहास सर्वश्रृत आहे. मुख्यमंत्री असताना त्यांनी कोणकोणत्या गोष्टी केल्या आणि गुजरातमधला जो सगळा नरसंहार आहे, तो सगळा एका अर्थाने शासकीय पातळीवरचा आहे, अशी चर्चादेखील देशामध्ये होऊ लागली; परंतु त्याला नकार देत देत जवळजवळ १० वर्षे नरेंद्र मोदी गुजरातचे मुख्यमंत्री राहिले. त्यांनी विकासाचा गुजरात पॅटर्न स्थापन केला होता आणि मग मनमोहनसिंग सरकारची इतकी मलिन झालेली प्रतिमा पुढे करण्यात आली आणि नरेंद्र मोदी देशाचे पंतप्रधान झाले. ते पंतप्रधान झाल्यानंतर त्यांनाही त्यावेळी बऱ्यापैकी मतं मिळाली होती; परंतु देशामध्ये यांचं सरकार स्थिर होतं. कारण संसदेमध्ये त्यांना बहुमत होतं; तरीही जनतेमध्ये असंतोष होता. हिंदुत्त्ववादी हे मुसलमानांना त्रास देत होते. गोहत्याबंदी कायद्याचा दुरुपयोग करू नये. मुसलमानांना या देशात कुठल्याही प्रकारचे स्थान असणार नाही अशा घोषणा हे लोक देत होते. त्याचा परिणाम असा झाला की, संपूर्ण देशामध्ये नरेंद्र मोदींच्या सरकारला दोन वर्षे पूर्ण होताच हळूहळू अराजकता सुरू झाली. हे अराजक कसं थांबवायचं याचं उत्तर नरेंद्र मोदींकडे नव्हतं. दुसरी गोष्ट त्यांनी अर्थमंत्री म्हणून जे पुढारी नेमलेले होते त्यांना अर्थशास्त्राचा गंधही नव्हता. त्यांनी परराष्ट्रमंत्री म्हणून सुषमा स्वराज यांची नियुक्ती केलेली असली तरी आंतरराष्ट्रीय क्षेत्रातले सगळे निर्णय स्वतः मोदी घेत होते. रिझर्व्ह बँकेच्या गव्हर्नरला किंवा मंत्रिमंडळाला विश्वासात न घेता त्यांनी नोटाबंदी केली. यामुळे सर्वसामान्य माणसाला वाटलं की, हा माणूस खरोखर भ्रष्टाचाराच्या विरोधामध्ये लढतो आहे आणि म्हणून आपण त्याला मत दिलं पाहिजे. लोकांनी खूप हाल सहन करूनही त्यांचा निर्णय स्वीकारला; परंतु देशातल्या बँकांमध्ये पैसाच नव्हता आणि


बँकांमध्ये पैसा येण्यासाठी ही नोटाबंदी करणं आवश्यक होतं. त्यानंतर दोन-तीन महिन्यांनी बँकांना कोट्यवधी रूपयांचा गंडा घालून नीरव मोदी व त्याचे दुसरे मामा विदेशात पळून गेले. हे दोघेही नरेंद्र मोदींच्या ओळखीचे होते. नरेंद्र मोदींच्या अनेक भाषणांमध्ये त्यांचा उल्लेख व्हायचा. हे लोक पैसे घेऊन गेले. त्यामुळे लोकांच्या मनामध्ये द्विधा परिस्थिती निर्माण झाली. भ्रष्टाचाराविरोधी लढणारा आणि त्याच्यासाठी प्राण पणाला लावणारा एक नेता, स्वतःचं कुटुंब नसलेला एक फकीर नेता आणि त्याला काहीच कमवायचं नाही अशी जी त्यांची प्रतिमा निर्माण झाली होती, त्या प्रतिमेला यामुळे थोडासा तडा गेला; परंतु पुढच्या कालखंडामध्ये भारतीय जनता पक्षाला आणि त्याच्या घोडदौडीला लगाम लागेल असा विरोधी पक्ष नव्हता. पहिली ३ वर्षे काँग्रेस पूर्णपणे शांत होती. त्यांना काहीही करता आलेलं नाही. त्यानंतर राहुल गांधी पक्षाचे अध्यक्ष झाले. काही महिन्यांनी झालेल्या मध्यप्रदेश, राजस्थान आणि छत्तीसगड विधानसभा निवडणुकीत काँग्रेसची सरकारं आली; परंतु प्रश्न असा आहे की, काँग्रेसची तीन राज्यात सरकारं आलेली असली तरीही भारतीय जनतेने राहुल गांधी यांना पंतप्रधान म्हणून मनापासून स्वीकारलेलं नाही आणि याचा परिणाम २०१९ च्या निवडणुकीत दिसला. म्हणजे भारतीय जनतेचे नरेंद्र मोदींनाच पूर्णपणे मतदान होते. कारण नरेंद्र मोदी संपूर्ण प्रचारात त्यांच्या पक्षाच्या उमेदवाराला मत मागत नव्हते तर ते जनतेला सांगत होते की, तुम्ही मला मत द्या. सगळे उमेदवार निष्प्रभ होते. ते केवळ मोदींच्या नावाने मतं मागत होते. पंतप्रधानपदी येण्याच्या लायकीचा माणूस भारतीय जनतेला ना राहुल गांधींमध्ये दिसला ना मायावतींमध्ये ना ममता बॅनर्जींमध्ये. म्हणून मोदींचा जो विजय झाला, तो एका अर्थाने नकारार्थी आहे. म्हणून आज मोदींना एवढी मतं मिळालेली असली तरी आणि त्यांनी स्थापन केलेलं सरकार संसदेच्या पातळीवर स्थिर असलं तरी प्रत्यक्ष जनतेमध्ये या सरकारप्रती अस्वस्थता असेल, अपेक्षाभंग असेल आणि इथून पुढे देशात अराजकतेला सुरुवात होईल. हे अराजक कसं थांबवायचं यासाठी आज दोनच मार्ग उपलब्ध आहेत. एकतर पुन्हा एकदा आणीबाणीची घोषणा करावी लागेल; परंतु आज राज्यघटनेच्या दृष्टीने ती फार अवघड गोष्ट आहे आणि तसं झालं तरीसुद्धा भारतीय जनमानसाने आणीबाणीचा अनुभव घेतल्यामुळे मोदींविरूद्ध जाऊ शकत नाही; परंतु दुसरीकडे असंही म्हणता येईल की, एकतर आणीबाणी आणून त्यांना हे अराजक थांबवावं लागेल आणि फॅसिझमच्या मार्गाने जाऊन देशामध्ये हुकूमशाही स्थापन करावी लागेल. कारण त्याशिवाय जनतेच्या चळवळी मोडून काढण्याचा कुठलाही उपाय भांडवलशाहीकडे नसतो. हिटलर असो किंवा मुसोलिनी, यांची जी राजकीय सत्ता स्थापन झालेली होती तीसुद्धा भांडवलशाहीतल्या आंतर्विरोधातूनच स्थापन झाली होती. अशा सत्तेमुळे जनतेचे प्रश्न सुटत नाहीत. आपल्याला सत्ता पाहिजे या अभिलाषेतून एकछत्री राज्य या दोघांनी स्थापन केले. नरेंद्र मोदी ते हिंदुत्त्वाच्या नावाने पण स्थापन करू शकतात. असाही एक वेगळा पॅटर्न निर्माण होऊ शकतो, यासाठी दुसरा-तिसरा कुठलाही मार्ग नाही. अशा स्थितीत सर्वसामान्य माणसाने, विचारवंतांनी, लेखकांनी काय करावं? मला असं वाटतं की, या देशातील विचार करणारे जे लोक आहेत, विचारवंत आहेत, समझदार लोक आहेत त्यांना, मोदींना मिळालेल्या प्रचंड बहुमतातून भारतीय लोकशाहीला काही दुष्परिणाम भोगावे लागतील अशी भीती वाटते, जसे इतिहासामध्ये भोगावे लागलेले आहेत. आज प्रश्न असा आहे की, भारतीय जनतेला हे समजावून सांगावं लागेल की, खरा राष्ट्रवाद काय आहे म्हणून? मोदी जो राष्ट्रवाद सांगतात, तो राष्ट्रवाद खरा राष्ट्रवाद नाही. हा राष्ट्रवाद बनावट राष्ट्रवाद आहे. ज्या राष्ट्रवादाचा आधार सर्वसामान्य जनता असते, तो राष्ट्रवाद खरा राष्ट्रवाद असतो. ज्या राष्ट्रवादाचा आधार एखादा वंश असेल, एखादी जात असेल, धर्म असेल, एखादा प्रदेश असेल तर तो राष्ट्रवाद तुम्हाला फॅसिझमकडे नेणारा असतो. तेव्हा भारताला एक अशा प्रकारचा लोकशाही राष्ट्रवाद पाहिजे की, ज्याच्यामुळे भारतीय संसदेमध्ये एखाद्या पक्षाला फार बहुमत नाही पण किमान बहुमत मिळेल तो व्यवस्थित पद्धतीनं राज्य स्थापन करू शकतो. मग यासाठी काय करावं, असा प्रश्न लोक करतात. या प्रश्नाचं उत्तर आज तरी कोणीही देऊ शकत नाही आणि कोणी दिलं तरी ते सर्वमान्य होऊ शकत नाही. म्हणून आज देशातील विचारवंत, लेखक, कलाकार यांच्यावर एक मोठी जबाबदारी येईल, असं मला वाटतं. आपण जगाचा इतिहास बघितला तर असं दिसतं की, एखाद्या देशात ज्या ज्या वेळी सामाजिक किंवा राजकीय क्रांती होत असते, परिवर्तन होत असते त्यावेळी तिथल्या बुद्धीजीविंची, लेखकांची, कवींची, नाटककारांची अतिशय मोठी भूमिका असते. ती त्यांनी पार पाडल्याशिवाय त्या देशामध्ये सामाजिक किंवा राजकीय क्रांती होऊ शकत नाही. आज जे लेखक, कलावंत, विचारवंत आणि सर्वसामान्य विचार करणारी माणसं आहेत, ती काय करतात? एखादा लेखक होतो, एखादा कलावंत होतो. त्याच्यामध्ये एक ज्ञानपिपासूवृत्ती असावी लागते, ज्ञानाची प्रचंड तृष्णा, प्रचंड तहान असावी लागते आणि ही तृष्णा किंवा ही तहान म्हणजे काय असतं तर आपल्या आजूबाजूचं हे जग आणि विश्व त्याने समजून घेतल्याशिवाय तो लेखक होत नसतो, तो कलावंत होत नसतो, तो साहित्यिक होत नसतो. तेव्हा या विश्वाचं आकलन करण्यासाठी आणि आपल्या आजूबाजूच्या परिस्थितीचं आकलन करण्यासाठी लेखकाला, कलावंताला, साहित्यिकाला जे करावं लागतं ते दोन प्रकारचं असतं. म्हणजे हे विश्व समजून घेण्याचे दोन प्रकार असतात. एक प्रकार असा असतो की, हे विश्व मानून कलावंत, विचारवंत, लेखक त्याच्या बुद्धीनं समजावून घेत असतो. ज्यावेळी विवेकाने तो विश्व समजावून घेतो त्यावेळी धर्म जन्म घेतो, त्यावेळी तत्त्वज्ञान जन्म घेते, त्यावेळी विज्ञान जन्म घेते, त्यावेळी तर्कशास्त्र जन्म घेते. तेव्हा बुद्धीनं समजून एखादा विचारवंत घेतो त्याच्यातून ही संपूर्ण परंपरा निर्माण होते. पण ज्यावेळी एखादा माणूस या विश्वाला ज्याच्या इतर इंद्रियांनी समजून घेतो त्यावेळी कला निर्माण होते. साहित्य निर्माण होते.

# 'भारताचं राजकारण कोलमडेल, त्यावेळी ते सांभाळण्याचं काम विचारवंत, कलावंत व साहित्यिकांना करावं लागेल'

पंडित जवाहरलाल नेहरू साहित्याचे एक अतिशय मोठे आस्वादक होते. ते स्वतः लाल किल्ल्यावर साहित्य संमेलन आयोजित करत असत आणि स्वतः तेथे जात असत. एकदा असंच साहित्य संमेलन आयोजित केलं होतं आणि पंडित जवाहरलाल नेहरू येणार हे ठरलेलचं होतं. त्यावेळी अनेक कवी पंडित जवाहरलाल नेहरूंच्या स्वागतासाठी आलेले होते. ते त्या व्यासपीठाच्या पायऱ्या अतिशय जोरदार चढत असत. म्हणजे आपण म्हातारे नाही आहोत हे ते सिद्ध करत असत. त्यांचा अनुनय सध्या मोदी करतात. तेसुद्धा विमानाच्या पायऱ्या चढताहेत. पण त्यांचा अनुनय मोदींनी चांगला केला तर त्यांच्या दृष्टीनेच ते चांगलं आहे. व्यासपीठाच्या पायऱ्या चढताना जेव्हा पंडित जवाहरलाल नेहरूंचा पाय घसरला आणि ते कोलमडल्यासारखे वाटले त्यावेळी त्यांच्या पाठीमागे त्या काळातले सगळ्यात महत्त्वाचे हिंदी कवी दिनकर बसले होते. पंडित नेहरू पडत असताना दिनकरांनी त्यांना सावरलं. त्यावेळी नेहरूंनी दिनकरांना एक वाक्य सांगितलं होतं. ते आजच्या परिस्थितीमध्ये फार महत्त्वाचं आहे. नेहरू म्हणाले होते, 'कवीराज आज तुम्ही मला सांभाळलंत, ही गोष्ट खरीय. पण ज्यावेळी भारताचं राजकारण कोलमडेल, त्यावेळी ते सांभाळण्याचं काम विचारवंत, कलावंत व साहित्यिकांना करावं लागणार आहे.' नेहरूंचं हे वाक्य आजच्या परिस्थितीमध्ये अतिशय महत्त्वाचं आहे.



**हिंदी कवी रामधारीसिंह ऊर्फ दिनकर**



**देशाचे पहिले पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू**

गद्य निर्माण होते. पद्य निर्माण होते. संगीत निर्माण होतं आणि नाटकपण निर्माण होतं. विश्वाला समजून घेण्याचे जे दोन प्रकार आहेत, त्यातून विचारवंत, साहित्यिक आणि कलावंत निर्माण होतात. त्यांची पहिली बांधिलकी समाजाशी पाहिजे. ती नसेल तर एखाद्या टॉवरमध्ये नुसते बसून येणाऱ्या लोकांचं साहित्य फार काळ टिकत नसतं. जे साहित्य समाजाभिमुख असतं ते साहित्य वाचल्यानंतर सर्वसामान्यांच्या जाणिवा अधिक व्यापक होतात, ते खरं साहित्य असतं. म्हणून आज देशात नरेंद्र मोदींचं हे एवढं मोठ्या बहुमताचं सरकार असलं तरी ते चुका करणारच नाही, असं होत नाही. उलट ज्यावेळी प्रचंड बहुमताचं सरकार असतं, त्यावेळी सरकारकडून खूप चुका होण्याची शक्यता असते. त्या थांबवण्याचं काम विचारवंत, लेखक, कलावंत करीत असतात. त्याचं एक साधं उदाहरण असं देता येईल. आज भारतामध्ये दोन प्रकारची आव्हानं आहेत. एक प्रचंड मोठा जातीवाद आहे आणि दुसरा धर्मवाद आहे. धर्मवाद आणि जातीवाद राष्ट्रवादाचा पोशाख परिधान करून उभा राहिला तर या राष्ट्रवादाच्या पोशाखाची पारख आधी असते किंवा आज ज्या प्रकारचा राष्ट्रवाद सांगितला जातो, ज्याच्या आत काय दडलेलं आहे, या पेहराव्याच्या आत काय दडलेलं आहे याचा शोध या सगळ्यांनी घेतला पाहिजे. शोधलं नाही तर उद्याच्या येणाऱ्या पिढ्या आजच्या साहित्यिक, विचारवंतांना अजिबात क्षमा करणार नाहीत. जगातल्या सर्व क्रांत्यांमध्ये, सर्व परिवर्तनांमध्ये लेखकांनी, कलावंतांनी, विचारवंतांनी जी भूमिका पार पाडली, तशी भूमिका आपल्या लोकांनी पार पाडली नाही तर त्यांना इतिहास क्षमा करणार नाही. भारताला पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू मिळाले, हे भारताचं भाग्य होतं. कारण असा एक राजकारणी की ज्याला साहित्य, इतिहास, संस्कृती, कविता, काव्य माहीत होतं. असा हा जागतिक कीर्तीचा नेता या देशाचा पंतप्रधान होणं ही अतिशय महत्त्वाची गोष्ट होती. पंडित जवाहरलाल नेहरू यांचं लिखाण विशेषतः त्यांचा Discovery of india हा ग्रंथ तरूणपणी मी वाचला, त्यावेळी मला असं वाटलं होतं की, पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरूंनी राजकारणात प्रवेश केला नसता तर ते जागतिक कीर्तीचे साहित्यिक झाले असते. कारण त्यांची भाषा ही पूर्णपणे साहित्यिक भाषा आहे. इंग्रजी भाषेचे दोन नमुने माझ्यापुढे आहेत. एक म्हणजे साहित्याच्या क्षेत्रामध्ये नेहरूंची झगमगाटलेली भाषा, की जी माणसाला पूर्णपणे खिळवून ठेवते आणि दुसरी इंग्रजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची, जी इंग्रजी पूर्णपणे तार्किक आहे, म्हणजे जी सवाल-जवाब आणि तर्क-वितर्क यांच्यावर उभी आहे. डॉ. बाबासाहेबांचं इंग्रजी भाषेमधलं जे विश्लेषण असतं, ते विश्लेषण सहजासहजी कोणालाही मोडून काढता येत नाही. हे असे दोन महापुरूष भारतामध्ये जन्माला आले. त्यांच्यावर प्रेम करणाऱ्या मंडळींनी विचारच केला पाहिजे की, पंडित जवाहरलाल नेहरूंचं हे जे साहित्य आहे ते फार महत्त्वाचं साहित्य आहे. पंडित जवाहरलाल नेहरू साहित्याचे एक अतिशय मोठे


आस्वादक होते. ते स्वतः लाल किल्ल्यावर साहित्य संमेलन आयोजित करत असत आणि स्वतः तेथे जात असत. एकदा असंच साहित्य संमेलन आयोजित केलं होतं आणि पंडित जवाहरलाल नेहरू येणार हे ठरलेलचं होतं. त्यावेळी अनेक कवी पंडित जवाहरलाल नेहरूंच्या स्वागतासाठी आलेले होते. ते त्या व्यासपीठाच्या पायऱ्या अतिशय जोरदार चढत असत. म्हणजे आपण म्हातारे नाही आहोत हे ते सिद्ध करत असत. त्यांचा अनुनय सध्या मोदी करतात. तेसुद्धा विमानाच्या पायऱ्या चढताहेत. पण त्यांचा अनुनय मोदींनी चांगला केला तर त्यांच्या दृष्टीनेच ते चांगलं आहे. व्यासपीठाच्या पायऱ्या चढताना जेव्हा पंडित जवाहरलाल नेहरूंचा पाय घसरला आणि ते कोलमडल्यासारखे वाटले त्यावेळी त्यांच्या पाठीमागे त्या काळातले सगळ्यात महत्त्वाचे हिंदी कवी दिनकर बसले होते. पंडित नेहरू पडत असताना दिनकरांनी त्यांना सावरलं. त्यावेळी नेहरूंनी दिनकरांना एक वाक्य सांगितलं होतं. ते आजच्या परिस्थितीमध्ये फार महत्त्वाचं आहे. नेहरू म्हणाले होते, 'कवीराज आज तुम्ही मला सांभाळलंत, ही गोष्ट खरीय. पण ज्यावेळी भारताचं राजकारण कोलमडेल, त्यावेळी ते सांभाळण्याचं काम विचारवंत, कलावंत व साहित्यिकांना करावं लागणार आहे.' नेहरूंचं हे वाक्य आजच्या परिस्थितीमध्ये अतिशय महत्त्वाचं आहे. सगळ्या विचारी लोकांनी यादृष्टीने विचार करावा आणि स्वतःचा आत्मशोधपण घ्यावा आणि परिस्थितीचं विश्लेषणपण करावं, असं मला वाटतं. खरं म्हणजे, मोदी राज्यघटना बदलतील असा विनाकारण गैरसमज करून घेण्यात काही अर्थ नाही. मोदी असो अथवा कुणीही, कोणालाही देशामध्ये ही राज्यघटना नष्ट करून दुसरी राज्यघटना आणता येणार नाही. ज्या दिवशी या देशामध्ये असा प्रयत्न होईल त्या दिवशी हा देश मोडून पडेल. कारण आज विविधतेत एकता आणणाऱ्या सगळ्या समूहांना सामावून घेणारी संघराज्यात्मक राज्यघटना ही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्याला दिलेली आहे. सर्वसामान्यांचं एक भावनिक नातं या राज्यघटनेशी आहे. त्यामुळे मोदी अशा प्रकारची जोखीम पत्करतील, असं मला वाटत नाही. पण एक गोष्ट ते करू शकतात की, राज्यघटना तशीच ठेऊन तिला धक्का न लावता प्रत्यक्ष व्यवहारामध्ये त्यांना जे करायचं ते ते करू शकतील आणि त्यांनी गेल्या मागच्या पाच वर्षांमध्ये ते केलेलं आहे. तेव्हा राज्यघटनेच्या एकूण संरचनेला मोदी काही धक्का लावतील असं मला वाटत नाही; परंतु त्यांना जे करायचं ते ते करू शकतील. राज्यघटना तशीच ठेऊन ते ते करू शकतील आणि तसं करण्याची क्षमता या लोकांमध्ये आहे, असं मला वाटतं.

प्रचंड बहुमताने भारतीय जनता पक्षातले लोकदेखील गोंधळलेले आहेत. त्यांच्या पत्रकार परिषदांमध्ये भाजपचे लोक म्हणतात की, आता मुसलमानांचा विश्वास संपादन करावा लागणार आहे. आता राज्यघटनेच्या संरक्षणाची हमी द्यावी लागणार आहे. म्हणजे या गोष्टी होतायेत हा त्याचाच प्रकार आहे. तेव्हा दलित, मुस्लिम, आदिवासी यांचं स्थान यापूर्वीही दुय्यम होतं आणि आताही ते दुय्यम राहील. ज्या पद्धतीनं भारतीय राजकारण गेल्या पाच वर्षांपासून चालू आहे, त्यावरून या लोकांना यापुढेही कुठली प्रतिष्ठा मिळेल, असं मला वाटत नाही. माझ्यासमोर पुण्यातली घटना आहे, जिच्याविरूद्ध भारतीय जनता पक्षाने, पंतप्रधानांनी काहीही केलेलं नाही. माझ्यासमोर आकलाकची गोष्ट आहे तेथेही काहीही केलेलं नाही. अनेकवेळा मॉब लिंचिंग झालं. लोकांना मारलं गेलं. त्यांचे व्हिडिओ लोकांनी काढून प्रसारमाध्यमांवर टाकलेले आहेत. येत्या काळातही हे असंच चालू राहणार आहे. म्हणून ते थांबवण्यासाठी दलित, मुस्लिम, आदिवासी आणि या देशातले सगळे पुरोगामी प्रवाह, लोकशाहीवादी प्रवाह, धर्मनिरपेक्ष प्रवाह आणि डावे प्रवाह एकत्रित आले तरच त्यांना संरक्षण मिळू शकतं, अन्यथा त्यांना संरक्षण मिळण्याची शक्यता नाही. नरेंद्र मोदींनी पुलवामाचा जो हल्ला घडवला, त्याचं जे भांडवल केलं, सर्जिकल स्ट्राईक वगैरे केलं त्याचा निवडणुकीत फारसा परिणाम झालेला नाही, असं मला वाटतं. कारण टीव्हीवर सर्वसामान्य माणसेच उघडपणे बोलत होती की, पुलवामात जे लोक मेले ते भारतीय जनता पक्षाने निवडणूक जिंकण्यासाठी मारले. असं उघडपणे बोलणारी माणसं टीव्हीवर बघून मला असं वाटलं की याचा काही परिणाम झालेला नाही. बालाकोटचाही परिणाम झालेला नाही. जिथं पाकिस्तानचा पंतप्रधानच असं म्हणतो, की मला नरेंद्र मोदी पंतप्रधान पाहिजेत, तिथं हे प्रश्न उद्‌भवतच नाहीत. प्रश्न असा आहे की, नरेंद्र मोदींना अजून आपण पंतप्रधानांच्या रूपात एक पर्याय दिलेला नाही आणि राहुल गांधींचा हा जो पर्याय आहे तो स्वीकारण्यापर्यंत भारतीय जनमत गेलेलं नाही. सगळ्यात महत्त्वाची गोष्ट अशी की, लोकशाही विचारप्रणाली स्वीकारण्याची क्षमता भारतीय समाजात, सर्वसामान्य माणसांत यावी म्हणून जे प्रबोधन व्हायला पाहिजे ते झालेलं नाही. भारतीय जनमानस, भारतीय मत हे लोकशाहीला स्वीकारण्याइतपत प्रगल्भ झालेलं नाही. भारतीय माणसाला, भारतीय मनाला सुरक्षितता पाहिजे असते. त्यामध्ये स्वातंत्र्याचा बळी दिला तरीसुद्धा त्यांना चालतो आणि हाच प्रकार या निवडणुकीत घडलेला आहे, असं मला वाटतं.

या निवडणुकीत विरोधी पक्षांच्या काही चुका झालेल्या आहेत, असं मला वाटत नाही. विरोधी पक्षांनी त्यांची सर्व ताकद पणाला लावली होती. विशेषतः, या निवडणुकीमध्ये राहुल गांधींचा ज्या प्रकारे विकास झालेला आपल्याला दिसतो, बौद्धिक विकासपण आणि जनमाणसांत प्रभाव पाडण्याचा विकासपण झालेला आहे. या निवडणुकीत जितके कष्ट त्यांनी घेतलेले आहेत, तितके कष्ट आणखी कोणी घेतलेले नाहीत. विरोधी पक्षांनी सगळी ताकद पणाला लावली होती, पण विरोधी पक्षाकडे नरेंद्र मोदींना पर्याय देता येईल, अशी कुठलीही व्यक्ती नव्हती आणि याच मुद्याने या निवडणुकीमध्ये एक अतिशय मोठी भूमिका पार पाडलेली होती. मोदींना लोकांनी इतकी मतं दिली असली तरी त्यांच्या मनामध्ये मोदींबद्दल इतका आदर वगैरे आहे, असं मला वाटत नाही. नाइलाज होता म्हणून त्यांनी मोदींना मत दिलं. ●●●

# संतपरंपरेचा कृषिनिष्ठ आविष्कार, संतपरंपरा आणि कृषिसंस्कृती

✍ **प्रतिनिधी**




वामन जाधव यांच्या 'संत परंपरा आणि कृषी संस्कृती' या ग्रंथावर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात परिसंवाद आयोजित करण्यात आला होता. या परिसंवादात ज्येष्ठ पत्रकार उत्तम कांबळे यांनी केलेले हे भाषण...

प्रा.डॉ.वामन जाधव यांचे अतिशय महत्त्वाच्या विषयावरचं पुस्तक प्रसिद्ध झालं आहे. संतांचा कृषिव्यवस्थेशी काय संबंध होता, आहे असं या पुस्तकात विवेचन आहे. खरं म्हणजे, माणूस हा निसर्गातून बाहेर पडला आणि त्यानं आपल्या स्वसंरक्षणासाठी निसर्गाच्या बाहेर काही व्यवस्था चालू केली. त्याची जगण्याची एक व्यवस्था म्हणजे शेतीचा शोध आहे. माणसानं आपल्या कुवतीप्रमाणे त्या शेतीला आकार दिला. माणसानं फक्त शेतीव्यवस्था चालू केली, असे नाही तर निसर्गातून बाहेर पडल्यानंतर दुसरी गोष्टही केली. ती अशी की, अवाढव्य निसर्गाचा जो पसारा आहे, त्याचा शोध घेण्यासाठी तो एकाच वेळी निसर्गाशी आणि स्वतःशी बोलायला लागला. अजूनही बोलतो आहे. या बोलण्यातून, या प्रश्नातून एकीकडे देव तयार होत होते, माणसांची संस्कृती तयार होत होती. कृषिसंस्कृतीने नृत्यासारखी कला व धान्याचे प्रकार जन्माला घातले. शेतीचा शोध लागण्यापूर्वी जे निसर्गात धान्याचे प्रकार होते, माणसानं त्याला वेळापत्रकात बसवलं. त्याला ऋतुमध्ये आणलं. त्याला विशिष्ट नाव दिलं. शेतीचा विकास करता करता माणसाने स्वतःचे देवही जन्माला घातले. निसर्गातून बाहेर पडल्यानंतर आपल्याला स्वतंत्रपणे जगायचं आहे. जगण्यासाठी आपल्याला हिंमत लागते. निसर्गाशी संघर्ष करत असताना आपल्या मदतीला कोणी येणार नाही, असे त्याला वाटत होते. शेतीचे व्यवस्थापन आपणच केलं पाहिजे, म्हणून कृषिसंस्कृतीतून जगभर मोजता येणार नाहीत एवढ्या देवदेवता जन्माला आलेल्या आहेत. त्यातही देवतांचं प्रमाण जास्त आहे. कारण स्त्री व शेतीचं एक नातं आहे. स्त्रीच्या जेवढ्या अवस्था असतात, तेवढ्याच शेतीच्या असतात. जशी बाई लहानाची मोठी होते तशी शेतीपण होते. बाई वयात येते तशी शेतीपण वयात येते. बाई बाळंत होते, शेतीतूनही नवनिर्मिती होते. स्त्री म्हातारी होते, शेतही म्हातारं होतं असं शेती आणि स्त्रीचं एक नातं आहे आणि हे संस्कृतीला जोडलं गेलं आहे. जगभर वर्षानुवर्ष हे चालत आलेलं आहे.

प्रा. डॉ. जाधव यांनी जो विचार केला आहे तो शेती आणि संतांचा. संतांची कृषिजन्य कल्पना कशी होती? खरं म्हणजे, कृषिचा आणि भक्तीचा, कृषि आणि देवाचा विचार बुध्दांच्या काळापासून चालत आलेला आहे. म्हणजे बुध्दाला एक चांगला शेतकरी म्हटले आहे. चांगली शेती कशी करावी, पाण्याचं वाटप कसं करावं, पाण्याची बचत कशी करावी हे बुध्दापासूनच आपल्याला एका पध्दतीमधून सांगण्यात आलेलं आहे. बुध्दानंतर शेतीचा जास्त विचार कोणी केला असेल तर तो बसवण्णांनी. त्यातही त्या पंथातल्या स्त्रियांनी बसवपंथातील म्हणजे धर्मातील स्त्रियांनी देवाशी जास्त संवाद केला आहे.

तो खूप भारी संवाद आहे. शेती नुसतीच आली नाही तर शेतकरी आला. शेतकरी खूप उशिरा आला. पुढे शेती करण्याचं स्वातंत्र्य एका विशिष्ट वर्गाला मिळालं आणि मदत करणारा दुसरा एक वर्ग तयार झाला. त्याला आपण आलुतेदार-बलुतेदार असे म्हणतो. आलुतेदार-बलुतेदार ही शेतीची एक व्यवस्था आहे. कवचकुंडले आहेत. हे जर नसेल तर कोणताच शेतकरी शेती करू शकणार नाही. शेतकरी शेती करतो ती या सर्वांच्या मदतीनं. गंमत अशी आहे की, आपण इतिहासाची पानं चाळत चाळत कितीही मागं गेलो तरी प्रत्येक वेळेला अशी परिस्थिती येते की शेती तोट्यात चालली आहे. भारतात शेती कोणत्या काळात फायदेशीर कधी होती? शेती फायद्यात कशी आणावी याविषयी बुध्दांनी पण खूप मार्गदर्शन केल्याचे दाखले बघायला मिळतात. त्यावरून कळतं की, बुध्दांच्या काळातही शेती तोट्यात

जात होती.

बुध्दांनंतर मोठमोठे कालखंड होऊन गेले. त्यातही शेती कशी करावी याविषयी सांगण्यात आलंय. याचाच अर्थ, शेती कसायच्या पध्दती सदोष होत्या. कालांतरानं हळूहळू त्यातील दोष दूर करून फायद्याची शेती करण्याचं तंत्र विकसित होत आहे. महाराष्ट्रातील संतसुध्दा हेच सांगतात. शेती कशी कसावी, फलदायी कशी करावी? तुम्ही जर बारीक अभ्यास केला तर शेती कशी करावी याविषयी बुध्दांनी सांगितलेले विचार आणि संत तुकारामांनी सांगितलेले विचार अगदी हातात हात घालून गेल्यासारखे वाटतात. त्याच शब्दात महात्मा फुले सांगतात. त्याच शब्दात डॉ. बाबासाहेब आंबेडकरदेखील सांगतात. सगळ्यांच्या समोर एकच प्रश्न होता की, शेतकरी गरीब का होतो? तो आत्महत्त्या का करतो?

दुष्काळ काही आता आलेले नाहीत. काळाच्या प्रत्येक कालखंडात माणसं मारणारा दुष्काळ आला आहे. आपण सोळाशे तीसचा दुष्काळ विचारात घेतो. पण त्याच्या मागे-मागे गेल्यानंतर अकराशे मध्ये दुष्काळ आहे. बाराशे-तेराशेमध्येसुद्धा दुष्काळ आहे. संत रामदासांनी सांगितले, दुष्काळात एकविसातले वीस मेले पण शेवटी कोण राहिला? त्याची जात कोणती होती? हे त्यांनी सांगितले नाही. कष्टकरी समाजाचे जगणे शेतीवर अवलंबून आहे. म्हणून या शेतीच्या संदर्भात संत जे काही लिहितात ते एकाच वेळी शेतीचा आणि निसर्गाचा विचार करतात. शेती हा निसर्गाचाच एक भाग आहे मग आपल्याला असा प्रश्न पडायला पाहिजे की, संत निसर्गाचा विचार का करतात? संत निसर्गाचा विचार करतात कारण, निसर्ग महान शक्ती आहे. आपण सगळे निसर्गाने निर्माण केलेले घटक आहोत. शेवटी काही झालं तरी निसर्गाच्या दरबारातच जाऊन उभे राहतो. पावसा लवकर ये म्हणून निसर्गाच्या दारातच आपण भीक मागायला उभा राहतो. भीक मागायची असेल तर पहिल्यांदा निसर्ग समजून घ्यायला पाहिजे. म्हणून मी पहिल्यांदा म्हणालो, निसर्गाला समजून घेण्याच्या प्रयत्नामध्ये अनेक देवदेवता जन्माला आल्या आहेत. त्यांची नावेही आपल्याला माहीत नाहीत. शेतीसाठीच्या प्रत्येक गरजेतून एक देव जन्माला आला आहे किंवा केला गेला आहे. वरूण देवता, धान्यदेवता, जलदेवता, वस्त्रदेवता, सुवर्णदेवता, वृक्षदेवता, उजेडदेवता, मातीदेवता, बांधदेवता हे सगळं संस्कृतीतून आलं आहे. जन्माला घातलं आहे.

संस्कृतीनं या देवता जशा जन्माला घातल्या तशी सेक्सदेवतासुद्धा म्हणजे लैंगिक क्षमता देणारी देवता जन्माला घातली आहे. माझ्या गावात तर तिचं मंदिर आहे. लग्न झाल्यावर तिला पहिल्यांदा नमस्कार करायचा. नवरा-नवरी घोड्यावर बसून येतात. उकिरड्यातील घाण चिखल तुडवत जातात. कारण सेक्स घाणेरडा आहे म्हणून त्याची जागा घाणीत आहे. अशा कृषिसंस्कृतीचा, कृषिजीवनाचा अर्थ लावण्याचा प्रयत्न संतांनी खूप मोठ्या प्रमाणात केला आहे. इथल्या प्रत्येक संताचं नातं, या ना त्या कारणाने निसर्गाशी होतं. शेत व शेतीशी होतं. कृषिसंस्कृती निसर्गालाच महाशक्ती व देव मानते. जगण्याच्या प्रत्येक हालचालीमध्ये त्यांना देव दिसतो. त्यांना कष्टात देव दिसतो. त्यांना झाडात देव दिसतो. पिकात देव दिसतो. त्यांना नदीत देव दिसतो. समुद्रात देव दिसतो. डोंगरात दिसतो. जंगलामध्ये दिसतो. सापामध्ये दिसतो. त्यांनी निसर्गाच्या प्रत्येक घटकामध्ये देव पाहिला आहे. मग प्रश्न असा पडतो की, त्यांनी देव बालाजीमध्ये का नाही पाहिला? साईबाबामध्ये का नाही पाहिला? देव काही कमी होते का? तेहत्तीस कोटी देव आहेत तेही एका गाईच्या पोटात. केवढा मोठा मॉल असेल पण या देवांना ते शरण जात नव्हते. कारण त्यांच्या भक्तीचे स्वातंत्र्य नव्हते. पांडुरंगाने त्यांना भक्तीचे स्वातंत्र्य दिले आणि पांडुरंग हा सगळ्या कष्टकऱ्यांचा श्रमदेव झाला. तो देव नाही अंगात येणारा, दाढी वाढवणारा देव नाही. तो कष्टकऱ्यांचा लीडर आहे. याचे अनेक संदर्भ यांच्या ग्रंथात येतात.

जिथं माणसांचं आणि देवाचं, माणसाचं आणि निसर्गाचं नातं कसं हातात हात घालून चाललेलं आहे, हे पहायला हवं. 'कांदा मुळा भाजी, अवघी विठाई माझी.' देव बघायचा झाला तर कुठल्या डोंगरावर जायचं कारण नाही. दाढी वाढवायचं कारण नाही. तपश्चर्या करायचं कारण नाही. कांद्या-मुळ्यात तो पहायचा. कपाशी फुलून आली तर तिच्यामध्ये पांडुरंग दिसणार. पांडुरंग असा देव आहे की, तो देवळात कधी दिसला नाही. तो मूर्तीत कधी दिसला नाही. घाम गाळून उत्पादन करणाऱ्या प्रत्येक उत्पादनात तो दिसतो. निसर्गाची उदाहरणे देऊन तो पांडुरंगाशी भांडतो. 'ऊस डोंगा परी रस नोहे डोंगा.' ऊस वेडावाकडा असू शकतो, पण त्याचा रस वाकडा असू शकत नाही. ऊस किती वाकडा असला तरी त्याचा रस गोडच असतो. पांडुरंगा तुला हे कळत कसं नाही. ऊस करणारा तूच. रस करणारा तूच आहेस. गाडा चालवणारा पण तूच आहेस आणि न्याय देणारापण तूच आहेस. मातीची उदाहरणं, पिकाची उदाहरणं, नद्याची उदाहरणं, पानाची उदाहरणं, पावसाची उदाहरणं, कष्टाची उदाहरणं घेऊन भक्तीचा एक जल्लोष चालला आहे. अशा ठिकाणी म्हणजे कष्टाच्या ठिकाणी पांडुरंग कोणतंही निमंत्रण नसताना आपोआप जातो. तो तिथेच जातो हेही आणखी एक वैशिष्ट्य आहे. विठ्ठलाच्या इतिहासामध्ये असं कुठंही सापडत नाही की, श्रीमंतांनी प्रार्थना केली आणि विठ्ठल त्यांच्या घरात गेला. तो चोख्याची जनावरं ओढायला जातो. जनाबाईचे जातं ओढायला जातो. सावता माळ्याच्या मळ्यात जातो. नरहरी सोनाराच्या घरी जातो. नामदेवाकडे जातो. जिथे जिथे श्रमाचा यज्ञ चालू आहे, तिथे तो जातो. म्हणूनच विठ्ठलाच्या साक्षीने कृषिचा विचार करायचा आहे.

आज शेतीच्या संदर्भात काही गंभीर प्रश्न उपस्थित केले जातात. शेतकऱ्याच्या अनेक प्रश्नांची उत्तरे सहाशे वर्षापूर्वी तुकारामाने देऊन ठेवली आहेत. संत तुकाराम स्वतः शेतकरी होता. पेरणी करायची कशी? जमीन कोणती निवडायची? पेरणीसाठी नुसतीच लाल माती असेल तर पेरणी योग्य होणार नाही. पेरणी अशा ठिकाणी करा की, जिथे जमीन ओलसर मिळेल. खडकात पेरणी करू नये. नुसती पेरणी करून चालत नाही. आलेलं पीक सांभाळायचं कसं? त्याचं रक्षण कसं करायचं? रास कशी करायची? मार्केटिंग कसं करायचं? हे सगळं तुकाराम तेव्हाच्या शेतकऱ्यांना सांगत

होते. पाटाच्या पाण्यावर आपण गाणी लिहिली, पण पाटाच्या पाण्याचा प्रवाह कसा असायला हवा हे संत तुकारामांनी सांगितलं. पाटात पडलेलं पाणी थेट पिकापर्यंत गेलं पाहिजे. त्यासाठी पाट स्वच्छ असायला हवा. त्यात गवत काडीचा अडसर असू नये हेही तुकारामांनी सांगितलं.

शेतीतज्ञ, विचारवंत असलेल्या म. फुल्यांनी शेतकऱ्यांनी आंघोळ कशी करावी हेही सांगितलं. पिकाला आंघोळ कशी घालावी? त्याची डागडुजी कशी करावी हेही फुल्यांनी शिकवलं. स्वच्छता कशी ठेवायची ते सांगितलं. दुष्काळाच्या काळात शेतकरी कसा जगला पाहिजे हेही सांगितलं. सोळाशे तीसचा दुष्काळ काढून पहा. औरंगजेबच्या अगोदरही खानदेशामध्ये मोठा दुष्काळ पडलेला होता. त्यावेळी लिंगायत धर्म व संत दुष्काळाकडे कसे बघत होते हे पहावं लागेल. या दुष्काळाची तीव्रता एवढी होती की, मेलेली जनावरे माळावर पडायची, त्याची हाडं कुणीतरी व्यापारी गोळा करायचा आणि दळायचा. त्या पिठामध्ये बाजरीचं पीठ घालायचा आणि लोकांना विकायचा. लोकांना कळंतच नव्हतं. आनंद वाटायचा की, जगण्यासाठी काहीतरी उपलब्ध आहे. असा दुष्काळ महाराष्ट्रातल्या संत परंपरेच्या काळामध्ये अनेक वेळा पडलेला आहे. प्राध्यापक जाधव यांनी त्याचा निर्देश या ग्रंथात केला आहे. आज सरकार सांगतं, शेती चांगली करायची असेल तर मपाणी आडवा पाणी जिरवाफ प्रत्येक एस.टीच्या मागं तसं लिहिलं आहे. 'पाणी आडवा, पाणी जिरवा. 'एक एक थेंब, लाख मोलाचा.' मग तुकाराम काय सांगत होते. संत नामदेव काय वेगळं सांगत होते, संत सावता माळी काय वेगळं सांगत होते. हे सगळे लोक परमेश्वराची जागा बदलत होते हे पहिल्यांदा ध्यानात घ्या. संताच्या परंपरेत या जागा बदलल्या आहेत. कोणी ज्वारीच्या कणसात, कोण मळ्यात, कोण पिठात, कोण मेलेल्या जनावरात, कोण सुई-दोऱ्यात, कोण दगडात अशा त्या परमेश्वराच्या जागा बदलल्या आहेत. या परमेश्वराला कृषिजन्य शेतकऱ्याचा नेता म्हणून सगळ्या संतांनी स्वीकारले आहे. म्हणजे पांडुरंग हा कृषिसंस्कृतीचा एक नेता आहे. हा श्रम करणाऱ्यांचा नेता आहे. श्रमाशी आपलं नातं सांगण्याकरता त्यांनी आपली जीवनशैली शेतकऱ्यासारखीच केली आहे. गळ्यात तुळशीची माळ आहे. सोन्याची माळ नाही. सोनं-चांदी नाही फक्त तुळशीची माळ आहे. कपाळावर बुक्का आहे. तो राखेपासून बनतो. तो त्यागातून तयार होतो. त्याचे पाय विटेवर आहेत. त्यामुळे हा संतांचा देव आहे. आतून बाहेरून कृषिजन्य संस्कृतीचं नातं सांगणारा आहे, हे वामन जाधव यांनी उत्तमरित्या मांडलं आहे. वारकरी संप्रदायातले जरि सगळे अभंग शोधून काढले तर सगळ्यात जास्त अभंग पुरूषांनी नाही तर स्त्रियांनी लिहिले आहेत. कृषिजन्य संस्कृतीमध्ये तिनं तिचं स्थान पुन्हा पुन्हा सांगितलं आहे. कृषि म्हणजे केवळ पीकपाणी घेणे नव्हे. कृषि म्हणजे पाऊसपाण्याचा अंदाज नव्हे. माणूस नावाचा जीव निसर्गातून बाहेर पडल्यानंतरची ती व्यवस्था आहे. शेतकरी शेतीमध्ये वाया का जातो. याचं एक महत्वाचं कारणही तुकारामांनी सांगून ठेवलं आहे. आपल्याकडील शेतकरी खूप आळशी आहे. तो शेती देवाच्या भरवशावर करतो. तो शेती नशिबाच्या भरवशावर करतो. तो विचाराच्या, विज्ञानाच्या तंत्रज्ञानाच्या प्रगतीच्या जोरावर करत नाही. अजूनपण असंख्य शेतकरी आहेत, की जे पेरून येतात ते कापणी करायला जातात. कसा काय शेतीचा उद्धार होणार, हे ठोसपणे सांगण्याचं काम संत तुकारामांनी केलं आहे. तुमचा आळस हा तुमचा मृत्यू ठरणार आहे. तुमची प्रयोगहीनता तुमचा मृत्यू ठरणार आहे. शेती हे एक प्रयोगाचं नाव आहे. जसं शिक्षण म्हणजे प्रयोग आहे, तसं शेती म्हणजे प्रयोग आहे.

मला डॉ. रावसाहेब कसबे यांनी एक पुस्तक वाचायला दिलं होतं. सिंधुसंस्कृती आणि हिंदू संस्कृती असे ते पुस्तक. इथला शेतकरी शेतीत कसा अपयशी ठरतो याची खूप कारणं त्यात आहेत. शेती नशिबावर विसंबून करण्याची गोष्ट नाही तर ती ज्ञानावर, प्रयोगावर करण्याची गोष्ट आहे. वर्षानुवर्षे भारतातील शेती भारतासाठी एकाच समूहाच्या ताब्यात होती. तोच शेती करायचा. मात्र शेतीत प्रयोग करत नव्हता. बाराव्या-चौदाव्या-पंधराव्या शतकातल्या संतांनी शेतीचा इतका खोलवर विचार कसा केला याचं आश्चर्य वाटतं . त्यामागे विज्ञान आहे. पुरोगामी विचारपण आहे. प्रयोगपण आहे. त्याच्यामध्ये फळांचं, फु लांचं, पिकांचं सौंदर्यपण आहे. पिकाच्या रक्षणासाठी उपाय सांगितले आहेत. चिमण्या पिकं खातात. त्यांच्यापासून संरक्षण कसं करायचं, दुष्काळापासून संरक्षण कसं करायचं, जनावरापासून संरक्षण कसं करायचं हा एक विचार सगळ्या संतांनी दिला आहे. विठ्ठल हा श्रमदेव आहे. निसर्गात आहे. हे सगळे संत निसर्गाची मुलंबाळं आहेत. निसर्ग सुंदर राहिला तर माणसाचं जगणं सुंदर होईल. म्हणून शहाणा माणूस पहिल्यांदा निसर्ग समजून घेतो आणि मग स्वतःला समजून घेतो.

वारकरी संप्रदाय म्हणजे एकाच वेळेला स्वतःला, भूमीला, निसर्गाला समजून घेण्याचा एक दीर्घ काळ चाललेला प्रयत्न होता. त्या प्रयत्नांमध्ये सगळे बहुजनांचे संत आहेत. संतांना देव करण्याची सगळ्याच लोकांना घाई झालेली आहे. आपल्याकडे संतांचा अभ्यास आध्यात्मिक अंगाने जास्त होतो. तत्वज्ञानाच्या अंगानं कमी होतो. स्त्रीसंतांचा अभ्यास सखोल झालाच नाही. जो अभ्यास होतो तो वरवरचा. तिची श्रद्धा, तिची धारणा एवढाच मर्यादित अभ्यास होतो. आपण संतांनी केलेल्या शेतीच्या अभ्यासाचा विचार केला पाहिजे. तसा तो केला तर मानवी जीवनामध्ये जटील होणारे प्रश्न सोडविण्यासाठी या परंपरेची आपल्याला मदत होणार आहे.

मला वाटतं प्रा. जाधव यांनी या ग्रंथनिर्मितीच्या निमित्ताने हा प्रयत्न केला आहे. तो व्यापक व्हावा, अधिक सर्वदूर जावा, त्या प्रयत्नाला जाधव स्वतः खोली देतील, अजून रूंदी देतील अशी अपेक्षा व्यक्त करतो. ज्याअर्थी त्यांनी या विषयाला हात घातला आहे, त्याअर्थी हा कॅनवास मोठा करण्याची त्यांच्याकडे ताकतही आहे. ती त्यांनी पुन्हा वापरावी अशी जाधव यांना शुभेच्छा देतो. •••

# राजर्षी शाहूंचे शिक्षण धोरण व सामाजिक न्यायाची प्रस्थापना



✍ डॉ. राजेंद्र ना. गोणारकर

आधुनिक पद्धतीच्या समाजकारणाला भारतात एकोणिसाव्या शतकात सुरुवात झाली. इंग्रजी शिक्षणातून भारतातील पुढारलेल्या वर्गांना नवीन दृष्टी मिळाली. पाश्चात्यांचे अनुकरण करून आपल्या समाजाची सर्वांगीण प्रगती घडवून आणण्याचे ध्येय त्यांनी बाळगले, मात्र तत्कालीन भौतिक परिस्थितीमुळे त्यांच्या कर्तृत्वाला बऱ्याच मर्यादा आल्या. त्या मर्यादा अशा-



अ) औद्योगिक क्रांतीसाठी लागणारा भांडवल संचय ब्रिटिशांच्या वसाहतवादी धोरणापुढे शक्य नव्हता. ब) व्यापारी वर्गाची उपक्रमशीलता जुजबी स्वरूपाची होती. क) तंत्रकौशल्याची वाणवा होती. ड) आर्थिक प्रगतीचा वेग मंद राहिल्यामुळे औद्योगिक क्षेत्रातील नव्या वर्गांना आपल्यातील सुप्त सामर्थ्यांचा अद्याप प्रत्यय आला नव्हता. इ) राजकीय पराभवामुळे जुने सरंजामदार निष्प्रभ झाले होते

हे खरे असले तरी ज्ञानोपासनेची परंपरा लाभलेल्या उच्चवर्णीयांनी नव्या काळाचा वेध लवकर घेऊन वैयक्तिक महत्त्वाकांक्षेसाठी का होईना पण प्राप्त परिस्थितीशी जुळते घेऊन इंग्रजी विद्या आत्मसात केली. यातूनच बुद्धीमंताचा नवा वर्ग उदयाला आला. महाराष्ट्रातील सामाजिक प्रबोधनाचा विचार करू जाता १८७० पर्यंत मुंबई हेच बहुतांशी शैक्षणिक, धार्मिक व सामाजिक सुधारणेच्या चळवळीचे केंद्र राहिल्याचे दिसते; जगन्नाथ शंकर सेठ, बाळशास्त्री जांभेकर, भाऊ महाजन, दादोबा पांडुरंग, राम बाळकृष्ण, भाऊ दाजी इत्यादी समाजसुधारकांनी या चळवळीचे हिरिरीने नेतृत्व केले. हिंदू-मुस्लिम, ख्रिस्ती, पारशी अशा अनेक धर्मांचे व जातीपंथाचे लोक समाजप्रबोधनाच्या कार्यात एकत्र आले होते. तथापि, त्यांच्या विचारांची व कार्याची मजल सुशिक्षित मध्यमवर्गाच्या पलीकडे गेली नाही, ही वस्तुस्थिती मान्य करावी लागते. एकोणिसाव्या शतकातील हे सुधारक विचारवंत हे बहुंशी उच्चजातीय असल्याने साहजिकच त्यांच्या जाणिवा आणि हितसंबंध यामुळे त्याचे समाज सुधारणेचे कार्य सीमित झाले होते.

हे सर्व सुधारक व विचारवंत भारताच्या भवितव्याचा विचार करीत असले तरी त्यांनी प्रत्यक्ष हाती घेतलेले प्रश्न प्रामुख्याने उच्चजातीयांच्या जीवनाशी निगडीत होते. मानवी कल्याणाचा, सामाजिक न्यायाचा विचार करणारी तत्त्वे त्यांनी प्रतिपादन जरी केली असली तरी या तत्त्वांना विशिष्ट काळी व विशिष्ट जागी प्रत्यक्षपणे अस्तित्वात असलेल्या समाज-संघटनेचे संदर्भ होते, हे विसरता येत नाही. जी तत्त्वे अक्षय वाटतात, त्यांचा अर्थही समाजाच्या निरनिराळ्या अवस्थांमध्ये एक असत नाही. उदा. म
नवाच्या समानतेचे तत्त्व घ्या. ग्रीक नगर राज्यात समान हक्कांचे तत्त्व गुलामांना लागू नव्हते. महान फ्रेंच क्रांतीतील 'स्वातंत्र्य-समता-बंधुता' चा अर्थ होता उगवत्या भांडवलदार वर्गाला सरंजामी मालकांबरोबर समानता आणि या वर्गातील व्यक्तींचे परस्परांशी बंधुत्व-वर्गबंधुत्व म्हणजेच सरंजामी जुलूम व नियंत्रणे याविरुद्ध एकमेकांना बंधुभावाची मदत. या तत्त्वत्रयीपैकी कोणतेही तत्त्व फ्रेंच समाजातील गुलामांना किंबहुना खुद्द फ्रांन्समधील जनतेच्या गरीब विभागांना लागू नव्हते.

म्हणून डॉ. बाबासाहेब आंबडेकरांनी आवर्जून म्हटले की ''स्वातंत्र्य-समता बंधुता'' ही तत्त्वे मी फ्रेंच राज्यक्रांतीकडून घेतली नाहीत तर ती बुद्धाकडून घेतलेली आहेत. त्यामुळे शाहूपूर्व काळ काय किंवा शाहूचां काळ काय, सुधारकांना सुधारणेसाठी कोणत्या समाजाचा कुठला पट आपल्या नजरेसमोर ठेवला, सामाजिक न्यायाची कल्पना कोणत्या समूहापर्यंत त्यांनी विस्तारीत केली हे पाहिल्याखेरीज फुले व शाहू महाराजांच्या कार्याचे मोठेपण लक्षात येत नाही.

शाहू महाराज गादीवर येण्याआधी महाराष्ट्रात १८४८ ते १८९४ या कालखंडात वेगवेगळे सामाजिक व राजकीय विचार-प्रवाह अस्तित्वात आलेले होते. लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख यांनी प्रामुख्याने ब्राह्मणांना आपली शैक्षणिक, सामाजिक, धार्मिक व औद्योगिक सुधारणा करून घेऊन कनिष्ठ वर्गाशी बंधुभावाने वागावे असा उपदेश केला. गोपाळ गणेश आगरकर काय किंवा न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे काय, यांची समाजसुधारणादेखील लोकहितवादी यांच्या प्रवाहातीलच होती. दुसऱ्या प्रवाहात म.ज्योतीराव फुले होते. यांनी स्त्रियांच्या व कनिष्ठ वर्गांच्या शिक्षणासाठी, सामाजिक समतेसाठी आणि समानतेच्या हक्कासाठी अहोरात्र संघर्ष केला. म.फुलेंच्या चळवळीचा भर सामाजिक समता प्रस्थापित करणे, जातिभेद नष्ट करणे व कनिष्ठ वर्गांची जातिव्यवस्थेच्या शोषणापासून मुक्ती करणे यावर होता. तिसरादेखील एक विचार प्रवाह होता तो म्हणजे विष्णूशास्त्री चिपळूणकर प्रेरित टिळक प्रवाह. हा प्रवाह समाजसुधारणेच्या विरोधात उभा होता.

या सगळ्या पार्श्वभूमीवर राजर्षी शाहूंच्या सामाजिक न्यायाचा विचार करावा लागतो. शाहू महाराजांच्या एकूण कार्यकर्तृत्वाकडे पाहिले तर एक गोष्ट सहज लक्षात येते की, शाहू महाराज हे

काही तत्त्वचिंतकाच्या भूमिकेत वावरले नाहीत. ते कृतिशील सुधारक म्हणूनच ठळकपणाने पुढे येतात. सामाजिक जीवनाच्या विविध क्षेत्रात प्रत्यक्ष सुधारणा घडवून आणण्यावर त्यांनी आपले लक्ष केंद्रित केले होते. त्यामुळे शाहूंनी आपले सामाजिक विचार सूत्ररूपाने ग्रंथबध्द केले असे घडलेले नाही. शाहू महाराज व सामाजिक न्याय याचा विचार करताना त्यांनी वेळोवेळी विविध भाषणातून, पत्रातून, राजाज्ञातून व्यक्त केलेल्या मतांचा यासाठी मागोवा घ्यावा लागतो. राजर्षी शाहू महाराजांनी २ एप्रिल १८९४ राजी कोल्हापूर संस्थानची सूत्रे हाती घेतली. त्याप्रसंगी आपल्या प्रजाजनांस उद्देशून काढलेला जाहीरनामा बोलका आहे. 'आमची सर्व प्रजा सतत तृप्त राहून सुखी असावी, तिच्या कल्याणाची सतत वृद्धी व्हावी व आमच्या संस्थानाची हर एक प्रकारे सदोदीत भरभराट होत जावी.' आमची प्रजा या शब्दांमधूनच सर्व जनतेला एका सूत्रात त्यांनी बांधल्याचे दिसते. त्यांच्या समाजवादी दृष्टीचा व प्रजेच्या कल्याणाविषयीच्या तळमळीचा प्रत्ययच या जाहीरनाम्यातून येतो. शाहू महाराजांनी राज्यकारभार हाती घेतला, तेव्हा संस्थानातील बहुसंख्याक प्रजाजनांची स्थिती अत्यंत दयनीय होती. मानसिक गुलामगिरी व आंधळ्या धार्मिक समजुतीत समाज गुरफटून गेला होता. यासाठी ज्यांचे शोषण होते त्यांना प्रथमतः जागे केले पाहिजे, ही जाणीव शाहू महाराजांना झाली. बहुजनांमध्ये शिक्षणाचे प्रमाण जवळपास नसल्यासारखेच होते. १८८१ ला ब्राह्मणांमध्ये (कोल्हापूर संस्थानात) साक्षरतेचे प्रमाण ७९.१ टक्के होते. ब्राह्मणेतरांची साक्षरता मात्र सरासरी ७ टक्के एवढीच होती.

ही कोंडी फोडणे आवश्यक होते. शिक्षणाद्वारे समतेचा मार्ग खुला होईल याचे सम्यक भान शाहू महाराजांना होते. गुणवत्ता धारण केल्याशिवाय ब्राह्मणेतरांना ब्राह्मणांशी स्पर्धा करता येणार नाही व खऱ्या अर्थाने सामाजिक न्यायाची लढाई यशस्वी होणार नाही, यांची जाणीव शाहू महाराजांना होती.

''शिक्षणाशिवाय कोणत्याही देशाची उन्नती झाली नाही'' असे इतिहास सांगतो.. अज्ञानात बुडून गेलेल्या देशात उत्तम मुत्सद्दी व लढवय्ये वीर कधीही निपजणार नाहीत. म्हणूनच सक्तीच्या मोफत शिक्षणाची, हिंदुस्थानला अत्यंत आवश्यकता आहे, अशी शाहू महाराजांची दृढ धारणा होती. न्यायाच्या दिशेने पाऊल टाकायचे तर शिक्षण अपरिहार्य होते. समतेवर आधारित समाजव्यवस्था निर्मितीसाठी शिक्षण प्रसार हे राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षणिक तत्त्वज्ञानच बनले. मानवाच्या ऐहिक सुखसमृध्दीचे व सर्वांगीण प्रगतीचे ज्ञानाइतके दुसरे प्रभावी साधन कोणतेही नाही. ज्ञान हे सामाजिक धन आहे. त्याचा सर्वांना उपयोग करून घेता आला पाहिजे म्हणून विद्येची मक्तेदारी ही युगधर्मांशी विसंगत आहे. याची जाणीव आधुनिक काळात महात्मा ज्योतीराव फुल्यांना पहिल्यांदा झाली. त्यातूनच त्यांनी सार्वत्रिक शिक्षणाची कल्पना पुढे आणली. महाराष्ट्रातील खेड्यापाड्यातील मागास व दलित वर्गियांमध्ये शिक्षणाचा प्रसार करण्याचे कार्य १८४८ पासून फुल्यांच्या सत्यशोधक समाजाने केले. शिक्षणाच्या साधनांमुळे सामाजिक ऐक्याची शक्ती जरी सावकाश वाढते तरी ती खात्रीने वृद्धींगत होत जाईल अशी त्यांची धारणा होती. फुले आणि शाहूंच्या विचारांतील हे साम्य होते. पुण्यातील ब्राह्मण विद्वानांनी वरिष्ठ वर्गाचे शिक्षण सुरू केले तर फुले व शाहू महाराज यांनी मागासवर्गीय व दलितांतील दलित यांमध्ये शिक्षणाचा प्रसार करण्यास आरंभ केला. कारण या दोघांचाही 'शिक्षण झिरपत जाईल' या कल्पनेवर विश्वास नव्हता. साहजिकच शाहू महारांची शिक्षणाकडे पाहण्याची एक वैशिष्टपूर्ण विचारधारा होती. त्यांच्या दृष्टीने–
१) शिक्षण ही बहुजनांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी पूर्वअट होती. २) समतेवर आधारित समाज निर्माण करण्यासाठी ज्ञानाचे समान वाटप झाले पाहिजे. ३) सामाजिक परिवर्तनाचे शिक्षण हे माध्यम आहे. ४) प्रशासकीय सुधारणा करण्यासाठी आधी जनतेला शिक्षित होणे आवश्यक आहे.

१९०५ ते १९२२ या १८ वर्षांच्या काळात शाहू महाराजांनी शिक्षणावर विशेष जोर दिल्याचे दिसते. शिक्षण प्रसाराच्या मोहिमेचे सूत्रसंचालन करताना शिक्षणविषयक गुंतवणूक ही मानवी भवितव्याच्या दृष्टीची गुंतवणूक आहे हे राजर्षी शाहूंच्या मनाशी असलेले घट्ट गणित होते. यासाठी त्यांनी खालील बाबीवर अधिक भर दिला.

१) शिक्षणविषयक सोयी सवलती उपलब्ध करणे. २) शिक्षण संस्थांची स्थापना करणे. ३) शिक्षण संस्थांना सर्वप्रकारे सहाय्य करणे. ४) शिक्षणासंबंधीच्या अनेकानेक उपक्रमांचे आयोजन करणे. ५) विविध जाती-जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहाची सोय करणे, जेणेकरून शिक्षणाचे मार्ग सुलभ होतील. ६) वसतिगृहात जातीविरहित वातावरण निर्माण करणे. ७) सामान्य व्यक्तीच्या मनात ज्ञानलालसा निर्माण करणे. ८) प्रथमच शिकून तयार झालेल्यांचा शिक्षणावरील विश्वास दृढ व्हावा म्हणून त्यांच्यासाठी रोजगाराची सोय करणे त्यांच्यासाठी नोकऱ्यात राखीव जागा ठेवणे. ९) सहशिक्षणाचा (स्त्री पुरुष एकत्रित) पुरस्कार करणे.

केवळ शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली म्हणजे कार्यभार आटोपत नाही. मुळात ही निखळ मुक्तीदायी बाब असत नाही. शिक्षणातून क्रांतिप्रवण मानसिकताच घडेल असेही काही नाही. उलट विषमतेवर आधारलेल्या समाजातील शिक्षण व्यवस्था ही प्रचलित शोषणाला अधिमान्यता देण्याचेच अधिक काम करते.

शिक्षणातून मुक्त माणूस घडण्याऐवजी व्यवस्थाशरण मानसिकताच बऱ्याचदा निर्माण होते. ही जाणीव शाहू महाराजांना नव्हती असे मुळीच नाही. तरीदेखील शिक्षणातून विचार करण्याची प्रक्रिया गतिमान होते. शोषणाची जाणीव होते हा भागही दुर्लक्षिता येण्यासारखा नाही. शिक्षणाच्या या परस्परविरोधी भूमिका असल्यामुळे शिक्षणाला समाज परिवर्तनाचे शस्त्र बनविण्यासाठी केवळ शिक्षण उपलब्ध करून दिल्याने भागेल असे खचितच नव्हते. शिक्षण म्हणजे काय? एवढेच कळून भागत नाही, त्यासाठी केवळ सोयी सवलती उपलब्ध होऊनही चालत नाही किंवा त्याद्वारे उठणाऱ्या प्रचाराच्या केवळ गदारोळाने साध्याच्या दिशेने प्रवास घडत नाही, तर त्यासाठी जी गोष्ट नेमके काय करू

शकते आणि तिचे हानीलाभ काय आहेत हे समजणे आवश्यक ठरते. शाहू महाराजांनी आखलेल्या शिक्षणाविषयक मोहिमेतून अशा रितीचा चैतन्यदायी प्रत्यय मनावर ठसविण्याचा सतत प्रयत्न होता, हे विशेषत्वाने लक्षात घ्यावे लागते. शिक्षण म्हणजे काय हेच मुळात ज्यांना ठाऊक नाही, त्या बहुजन समाजाच्या मनामध्ये शिक्षणासंबंधी आस्था रुजविणे, शिक्षणासंबंधी अभिरुची निर्माण करणे आणि शिक्षण हे समग्र परिवर्तनाचे क्रांतिकारी तत्त्व आहे याचे भान देणे ही अवघड बाब होती. राजर्षी शाहूंनी हे कार्य नेटाने केले. केवळ शिक्षण देणे आणि शिकलेल्या माणसांना 'आम्ही सुशिक्षित आहोत म्हणजे विशेष हक्कदार' म्हणवून घ्यायला संधी मिळवून देणे एवढाच काही राजर्षींच्या शिक्षण विषयक चळवळीचा भाग नव्हता, तर अज्ञान, अंधश्रद्धा व दारिद्र्य यांनी ग्रस्त झालेल्या सर्वसाधारण माणसाच्या परिवर्तनाची मुक्तीची ती चळवळ होती.

शिक्षणाच्या सोयी उपलब्ध करून दिल्या तरी समाज अज्ञ होता. शिक्षणाचे महत्त्व त्याला ठाऊक नव्हते. केवळ शाळा काढून काम भागणारे नव्हते तर मुलांना सक्तीने शाळेत ढकलावे लागणार होते, हे ओळखून सक्तीच्या व मोफत प्राथमिक शिक्षणाचे धोरण राजर्षी शाहूंनी आरंभले. १८८२ साली म.ज्योतीराव फुले यांनी पाहिलेले हे सक्तीच्या शिक्षणाचे स्वरूप १९१७ साली राजर्षी शाहू महाराजांनी पूर्ण करून दाखविले. आजारी माणसाची इच्छा नसतानाही तो आरोग्य संपन्न व्हावा म्हणून आपण त्याच्या शरीरात सुई टोचतो अगदी हीच गोष्ट दारिद्र्याने पिचलेल्या, आर्थिक दृष्टीने कमकुवत असलेल्या, रंजल्या-गांजल्या व दीनदुबळ्या लोकांना मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण देणे जरूर होते. राजर्षींच्या या शिक्षण विचारामागे विद्येची मत्तेदारी धुडकावून लावणे होते. पण अशा वेळीदेखील विरोधकांनी युक्तिवाद केला की, सार्वत्रिक व सक्तीच्या शिक्षणाऐवजी आहे त्या शिक्षणाच्या सोयी वाढविणे आवश्यक आहे. या आक्षेपास शाहू महाराजांनी दिलेले उत्तर अत्यंत मार्मिक होते. 'प्राथमिक शिक्षण सक्तीचे करण्याच्या अगोदर सध्या उपयोगात असलेली शाळागृहे विस्तृत व हवेशीर केली पाहिजेत व तिकडे खर्च करण्याची जास्त जरुरी आहे हे 'केसरी' चे प्रतिपादन कोणीही सरळ बुद्धीच्या माणसास चीड आणील 'No Cake to a few until all are served with bread.' हे इंग्लंडातील मजूर पक्षाचे धोरण आहे. पण शेकडा ९० लोक उपाशी आहेत व दहा लोक खात आहेत. उपाशी लोकांना कोंड्याच्या भाकरीचीही सोय करण्याअगोदर या दहाच्या पोळीवर साजूक तूप वाढा, असा ओरडा करणाऱ्यांना रयतेची कळकळ कितपत आहे हे उघड होत आहे.' शाहू महाराजांनी सक्तीचे व मोफत प्राथमिक शिक्षणाचे धोरण अवलंबिलेले त्यामागे त्यांची भूमिका स्वच्छ होती. खालच्या वर्गाच्या लोकांच्या बुद्धी व ज्ञानावर हे जड जुलमी जू लादलेले आहेत ते झुगारून देण्याची शक्ती समाजाच्या अंगी येण्यास सक्तीच्या व मोफत प्राथमिक शिक्षणाची फार जरुरी आहे, असे त्यांना वाटे. मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची योजना सरकारी पातळीवर राबविताना राजर्षी शाहूंनी खाजगी शिक्षण संस्थांच्या प्राथमिक शाळांनादेखील आपल्या संस्थानामार्फत आर्थिक मदत केली. प्राथमिक शिक्षण शाहू महाराजांना अत्यंत महत्त्वाचे वाटत होते. सक्तीच्या शिक्षणाची व्याप्ती जसजशी वाढली तसा आर्थिक बोजादेखील वाढला. प्राथमिक शिक्षण की राजाराम कॉलेज असे द्वंद्व निर्माण झाले; परंतु सार्वत्रिक प्राथमिक शिक्षणाचा प्रसार पडेल ती किंमत देऊन करण्याचा शाहूंनी निर्णय घेतला.

शाहू महाराजांनी स्त्री शिक्षणासाठी राजमार्ग घालून देण्याचे महत्तम कार्य केले. करवीर राज्यात स्त्री शिक्षणासाठी एक खास अधिकार पद निर्माण करण्यात आले होते. मिस एच.लिटल यांची नेमणूक स्त्री शिक्षण अधीक्षिका म्हणून केली होती. त्यानंतर रखमाबाई केळवकरांनी १९२२ पर्यंत हे पद भूषविले. शाहूंना तळाच्या थरापर्यंत स्त्री शिक्षणाचा प्रसार व्हावा असे सातत्याने वाटत होते. त्यांनी ३५४ क्रमांकाची हुजुराज्ञा ६ ऑक्टोबर १९१९ रोजी काढली. ती अशी ''तमाम लोकांस जाहीर करण्यात येते की; ज्यांच्यात पडदा पाळण्याची रीत नाही आणि ज्यांच्यातील मुलींना व स्त्रियांना शिक्षण घेण्याची इच्छा आहे, अशा मागासलेल्या वर्गातील लोकांनी अप्पासाहेब तथा मामासाहेब सुर्वे यांच्याकडे तसे अर्ज द्यावेत म्हणजे त्या त्या विद्यार्थिनीची राहण्याजेवण्याची व शालेय फी पुस्तकांची वगैरे सारी सोय सरकारी खर्चाने करण्यात येईल'' स्त्री पुरुष दोघांनाही समाजामध्ये समान स्थान असले पाहिजे या विचाराचे शाहू महाराज समर्थक होते. त्या काळात लोकमान्य टिळक यांनी स्त्री शिक्षणाला विरोध दर्शविला होता. ही बाब लक्षात घेतली पाहिजे शाहू महाराजांनी मुलीच्या शिक्षणासाठी विविध रितीने प्रयत्न केले; परंतु मुलांच्या शिक्षणाच्या बाबतीत जसे त्यांना यश आले तसे मुलीच्या शिक्षणाबाबत आले नाही. खेड्यातून शहरात शिकण्यासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांना राहण्याची कुठल्याही प्रकारची सोय होत नसल्याचे पाहून शाहू महाराजांनी त्यांच्यासाठी वसतिगृहांची सोय केली. ब्रिटिश पार्लमेंटला 'मदर ऑफ पार्लमेंटस'(Mother of Parliament) असे मोठ्या अभिमानाने इंग्रजी व इतर लोक म्हणतात. त्याप्रमाणे कोल्हापुरास 'मदर ऑफ बोर्डिंग हाऊसेस'(Mother of Boarding houses) म्हणजे विद्यार्थी वसतिगृहांची माता असे सार्थ यश मिळाले होते.

व्यावसायिक शिक्षणाचा पायादेखील शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात घालून दिला. १९०३ मध्ये त्यांनी कोल्हापूरमध्ये ओब्रायन टेक्निकल स्कूलची स्थापना केली. तेथे वेगवेगळ्या उद्योगांसाठी त्यांनी शिक्षणाची व्यवस्था केली. व्यावसायिक शिक्षण सर्वांना मिळाले तरच समाजाची आर्थिक प्रगती होईल, असे त्यांचे मत होते. पुढे छत्रपती राजाराम औद्योगिक मंदिर सुरू झाल्यावर तर संस्थानात अनेकांना व्यावसायिक शिक्षणाची पर्वणीच लाभली. शाहूंनी शिक्षण क्षेत्रात प्रयोगही केले. खेडेगावातील पाटील लोकांना सरकारी कामकाज करण्याच्या पद्धतीचे शिक्षण देणारी 'दिल्ली दरबार पाटील पाठशाला' नांवाची अभिनव शाळा काय किंवा विविध धार्मिक संस्कार धर्मशास्त्राप्रमाणे कसे दिले पाहिजे याचे शिक्षण देणारी सत्यशोधक शाळा असो, हे शाहूंचे शैक्षणिक प्रयोगच होते.

•••



# कामगार अन शेतकऱ्यांचेही तारणहार : डॉ. आंबेडकर

फेब्रुवारी १९३८ मध्ये दलित कामगार परिषदेस संबोधित करताना डॉ.बाबासाहेब आंबेडकर



डॉ.सूर्यनारायण रणसुभे

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य केवळ दलित प्रश्नांसंबंधीच नव्हते तर त्यांनी आपल्या जीवनात कामगार आणि शेतकऱ्यांच्या संघटनेसाठीदेखील कार्य केले होते. कामगारांच्या संघटनेसंबंधी त्यांनी दोन भाषणे दिलेली आहेत. यात व्यक्त विचारांची घोर उपेक्षा झालेली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर केवळ श्रेणीबद्ध समाजरचनेच्या विरोधात संघर्ष करीत नव्हते, तर ते वर्गीय समाजरचनेच्या विरोधातदेखील होते. यासंदर्भात येथील तत्कालीन मार्क्सवाद्यांशी त्यांचे गंभीर मतभेद होते. पण ते मार्क्सवादी विचारांच्या विरोधात नव्हते. सुरुवातीपासून ते शेवटपर्यंत ते समाजवादी विचारांचे समर्थक होते. कामगारांच्या संघटनेच्या संदर्भात त्यांनी दिलेली दोन भाषणे खूप महत्त्वाची आहेत.

पहिले भाषण १२, १३ फेब्रुवारी १९३८ ला जी.आर.पी. रेल्वेच्या दलित कामगार परिषदेसमोर मनमाड येथे त्यांनी दिलेले आहे. दुसरे भाषण ८ ते १७ सप्टेंबर १९४३ च्या दरम्यान ऑल इंडिया ट्रेड युनियन वर्कर्स स्टडी कॅम्पच्या समारोप समारंभात दिलेले आहे. ही दोन्ही भाषणे मराठीत पुस्तिका स्वरुपात बॅकवर्ड क्लास सिनिअर इंजिनिअर्स अँड ऑफिसर्स असोसिएशनने ऑक्टोबर २००६ ला प्रकाशित केलेली आहेत. २०११ ला याची दुसरी आवृत्ती निघालेली आहे. या दोन भाषणांच्या आधारावर कामगारांशी संबंधित त्यांचे विचार सार रूपात येथे देत आहे.

१) मनमाडच्या त्या प्रसिद्ध भाषणात ते सुरूवातीलाच आनंद व्यक्त करीत म्हणतात की, येथे तुम्ही लोक अस्पृश्य म्हणून नव्हे तर कामगार म्हणून एकत्र आलात. पुढे ते म्हणतात, ''या देशात कामगारांचे दोन प्रमुख शत्रू आहेत. एक- ब्राह्मणवाद, दोन- भांडवलशाही. या दोन्हींशी तुम्हाला लढायचे आहे. ब्राह्मणवाद या शब्दाद्वारे मला ब्राह्मण जातीची सत्ता, अधिकार आणि त्यांचे हितसंबंध यासंदर्भात बोलायचे नाही. ब्राह्मणवादाचा मी नेहमी अर्थ घेतोय स्वातंत्र्य, समता आणि बंधुभावाचा अभाव. याशिवाय हा ब्राह्मणवाद काही विशिष्ट वर्गाची समानतादेखील नाकारतोय. हा ब्राह्मणवाद एवढा सर्वव्यापी आहे की, तो आर्थिक सोयीशी संबंधित क्षेत्रावरही आपले अधिकार गाजवतो.''? पुढे ते म्हणतात, जीवनाच्या अनेक क्षेत्रांत जातीमुळे गुणवत्ता असूनदेखील अनेक उद्योग-व्यवसायात, नोकरीत माणसे नाकारली जातात. उदाहरणादाखल ते म्हणतात की, मुंबई आणि अहमदाबाद येथील वस्त्रोद्योगात, कापडगिरण्यात विणकर विभागाचे दरवाजे अस्पृश्यांसाठी बंद आहेत. ते केवळ सूतकताई विभागातच काम करू शकतात. १९३८ च्या सुमारास कापड गिरण्यातील कामगारात मार्क्सवादी विचारांचा बराच प्रचार झालेला होता. पण मार्क्सने जे काही सांगितलेले आहे, त्यास त्याचे भाष्यकार नीटपणे कामगारात घेऊन जाऊ शकले नाहीत, ही त्यांची व्यथा होती.

२) मार्क्सवाद स्पष्ट करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर असे म्हणाले की, कोणत्याही समाजात नोकर आणि मालक असे दोनच वर्ग असतात, असे मार्क्सने कोठेच म्हटलेले नाही. संपूर्ण

समाजात फक्त आणि फक्त दोनच वर्ग असतात– असे समजणे आणि समजावणे चुकीचे आहे. लक्षात ठेवा की, मार्क्सने जे काही म्हटलेले आहे, ते केवळ युरोपच्या संदर्भातच खरे आहे– असे समजणेदेखील पूर्ण चुकीचे आहे. सामाजिकदृष्ट्या श्रेष्ठत्वाची आणि उच्च-नीचतेची भावना बाळगणे आणि प्रत्यक्ष आचरणात तसे जगणे कामगार संघटनेच्या दृष्टीने खूप घातक आहे. दुसऱ्या शब्दात ब्राह्मणवाद किंवा असमानतेची संकल्पना कामगारांच्या मनातून समूळ नष्ट केली पाहिजे.

३) कामगारांच्या हितासाठी म्हणून तुम्ही सर्वजण संघटित झाले पाहिजे; परंतु एवढ्यावरच भागणार नाही. तुम्हा कामगारांना राजकीय उद्देश ठेऊनदेखील संघटित झाले पाहिजे. कामगार संघटनांनी राजकारणातदेखील आपली उपस्थिती नोंदवली पाहिजे. कारण सत्तेच्या अभावात कामगारांच्या हितांचे संरक्षण अशक्य आहे. संघटनेच्या ताकदीला कायद्याची ताकद मिळाली पाहिजे. कायद्याची ताकद मिळवणे म्हणजेच राजकारणात सक्रीय होणे असते.

४) जो राजकीय पक्ष वर्गहितासाठी वर्गभावनेच्या पायावर उभा आहे, त्याच राजकीय पक्षात तुम्ही कामगार सक्रीय झाले पाहिजेत. त्याच्याशीच तुम्ही संबंधित झाले पाहिजेत.

५) जगात जर कामगारांची सत्ता निर्माण करायची असेल तर त्याच्या मुळात (पायाभरणीत) लोकतांत्रिक मूल्यांचे असणे केवळ गरजेचेच नव्हे तर अनिवार्यदेखील आहे. हुकूमशहाकडून झालेली क्रांती ही कधीच कायद्याची (स्थायी) नसते.

१७ सप्टेंबर १९४३ या दिवशी त्यांनी जे भाषण दिलेले आहे, ते आजदेखील प्रासंगिक वाटते. मागील ७० वर्षांपासून आम्ही भारतीय लोकशाही व्यवस्थेत जगत आहोत. युरोपात तर ही राजकीय व्यवस्था मागील १००-१५० वर्षांपासून चालत आलेली आहे. डॉ. बाबासाहेबांचे निरीक्षण असे आहे की, संसदीय लोकशाही पद्धतीने आर्थिक विषमतेकडे कधीच गांभीर्याने लक्ष दिलेले नाही. लोकशाही व्यवस्थेची शपथ ज्यांनी घेतलेली आहे, त्या राष्ट्रातदेखील आर्थिक विषमता कमी झालेली नाही. संक्षेपाने मी हे सांगू इच्छितो की, देशातील सर्वसाधारण जनतेस सुख, संपत्ती आणि स्वातंत्र्याचा फायदा या व्यवस्थेतून पूर्ण रुपात मिळालेला नाही आणि जर हे खरे असेल तर संसदीय लोकशाहीच्या अयशस्वीतेच्या कारणांचा शोध घेतला गेला पाहिजे. त्यांचे हे कथन ७० वर्षांच्या भारतीय संसदीय लोकशाही व्यवस्थेलाही जसेच्या तसे लागू होते. आपल्या पुढील विवेचनात ते त्या कारणांचा शोध घेऊ लागतात, ज्यामुळे ही व्यवस्था आर्थिक विषमता दूर करू शकलेली नाही. त्यांच्या मते, याचे एक महत्त्वाचे कारण असे की, आपण सामाजिक आणि आर्थिक समतेची स्थापना करू शकलो नाहीत. 'सामाजिक आणि आर्थिक समता नसेल तर राजनीतिक समतेला कसलाच अर्थ नसतो.'

तिसरे कारण ते हे सांगतात की, भले आपण लोकतंत्रास लोकांचे तंत्र म्हणून संबोधित असू, तरीदेखील वास्तवात हे तंत्र एका वर्गाची दुसऱ्या वर्गावर पारंपारिक रूपाने चालत असलेली सत्ताच असते.

६) प्रस्तुत भाषण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्टडी कँपमध्ये दिलेले होते. शिक्षित कामगारांनी जगात कामगारासंबंधी जे चिंतन चाललेले आहे, जे पुस्तकरूपात आहे ते वाचावयास देणे असा आग्रह ते करतात. केवळ कामगारांनीच नव्हे तर समाज परिवर्तनाची आकांक्षा ज्यांच्यात आहे आणि जे या दिशेने सक्रिय आहेत, त्या सर्वांनी ही पुस्तके वाचलीच पाहिजेत, यावर ते भर देतात. आपल्या या भाषणात ते म्हणतात,

''रूसोचे सामाजिक करार, मार्क्सचे कम्युनिस्ट घोषणापत्र, कामगारांची अवस्था आणि जॉन स्टुअर्ट मिल लिखित स्वातंत्र्य – समाजरचनेशी संबंधित ही चार मूलगामी पुस्तके प्रत्येक कामगाराने वाचलीच पाहिजेत, असा त्यांचा आग्रह आहे.'' डॉ. आंबेडकरांचे अनुयायी सतत असे म्हणतात की, आंबेडकर हे मार्क्सविरोधी होते. त्या मंडळींनी हे लक्षात घ्यावयास हवे की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सतत म्हणत होते की, भारतीय सामान्यजनांचा सगळ्यात खतरनाक घटक भांडवली व्यवस्था आहे. त्यामुळे ते प्रत्येक कामगारास आग्रह करीत होते की, त्यांनी मार्क्सचे 'कम्युनिस्ट' घोषणापत्र वाचावे.

त्यांची हीच तर व्यथा होती की, तत्कालीन भारतीय कम्युनिस्टांचे मार्क्सवादाचे आकलनच चुकीचे होते. ते कामगारांना समजावून सांगत होते की, ज्ञानाअभावी तुम्ही संघर्षशील होऊच शकत नाही. कामगारांचे आंदोलन केवळ आर्थिक मागण्यांपुरते मर्यादित न राहता ते अधिक व्यापक व्हावयास हवे. स्वातंत्र्य, समता आणि बंधुभाव हेच आंदोलनाचे मुख्य सूत्र असावयास हवे. समता अर्थातच आर्थिक आणि सामातिक समता.

कामगारांनी सत्ता प्राप्त करण्याच्या दिशेने प्रयाण केले पाहिजे. त्याच दिशेने त्यांचा प्रवास असावयास हवा. हाच या दोन्ही भाषणांचा सारांश आहे. या उद्देशाच्या प्राप्तीसाठीच त्यांनी रिपब्लिकन पार्टीच्या स्थापनेचा निर्णय घेतला. हा पक्ष या देशातील सर्व श्रमिकांचा, कामगारांचा, शेतकऱ्यांचा, शोषितांचा, पीडितांचा, वंचितांचा झाला पाहिजे, असे त्यांचे स्वप्न होते. या पार्टीच्या स्थापनेसाठी म्हणून त्यांनी मृत्यूपूर्वी १९५६ मध्ये या देशातील समाजवादी नेत्यांना पत्रे पाठवली होती. त्यात राममनोहर लोहिया व एस.एम. जोशी प्रमुख होते. ही मोठी विचित्र परिस्थिती आहे की, त्यांच्या मृत्यूनंतर रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाची स्थापना झाली जरूर, पण ही पार्टी श्रमिकांची होण्यापेक्षा एका जातीची झाली आणि आता तर महाराष्ट्रात या पार्टीचे जवळपास १२-१५ तुकडे झालेले आहेत. तिकडे उत्तरेतदेखील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव घेऊन जी पार्टी तयार झाली, तीदेखील श्रमिकांची, शेतकऱ्यांची, शोषितांची न होता एका जातीपर्यंतच मर्यादित झाली. डॉ. बाबासाहेबांच्या विचारांना, त्यांच्या स्वप्नांना त्यांच्या अनुयायांनीच मूठमाती दिलेली आहे.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय कामगारांसाठी केलेले कार्य** : महाराष्ट्रातील एक अभ्यासक डॉ. प्रल्हाद लुलेकर यांनी डॉ. आंबेडकरांच्या विचारांचा अभ्यास गांभीर्याने केलेला आहे. आपल्या

अभ्यासातून ते हे सिद्ध करतात की, डॉ. बाबासाहेबांच्या विचारांना व त्यांच्या कार्यांना केवळ दलित समाजापर्यंत मर्यादित करणे म्हणजे त्यांच्यावर घोर अन्याय करणे आहे. आपल्या अज्ञानाचे प्रदर्शन करणे आहे. मुळात त्यांचे चिंतन हे सर्व वर्गांसंबंधी होते व आहे. केवळ सर्वहारा वर्गच नव्हे तर संपूर्ण समग्र समाजासंबंधी होते व आहे. त्यामुळे डॉ. लुलेकरांनी मराठीतून एक पुस्तकच लिहिलेले आहे - दलितांचे उद्धारक डॉ. बाबासाहेब आंबेडकर. तत्कालिन इतर कोणत्याही नेत्यापेक्षा डॉ. बाबासाहेब हे कामगारांच्या प्रश्नांशी बांधिलकी पत्करून होते. एके ठिकाणी ते लिहितात, ''मी स्वतः कामगार वर्गातून आलेलो आहे. मी मुंबईला इम्प्रूव्हमेंट चाळीत (कामगारांची वस्ती) राहतो. इतर बॅरिस्टरांप्रमाणे मीदेखील बंगल्यात राहू शकलो असतो.'' या चाळीत राहताना कामगारांचे विश्व जवळून पाहू शकलो आणि त्यामुळे त्यांचे शोषणविरोधी विचार अधिक प्रखर झाले. ते मुंबई प्रदेश कौन्सिलचे सदस्य असताना १५ सप्टेंबर १९३५ ला ट्रेड डिस्प्यूट बिलावर ते तीन तास सलग बोलले होते. परळ येथील कामगार मैदानावर सर्व पक्षांद्वारे आयोजित कामगार परिषदेत १६ ऑक्टोबर १९३८ रोजी पन्नास हजार कामगारांसमोर त्यांनी कामगारांच्या प्रश्नांवर प्रदीर्घ भाषण दिलेले आहे. याच मैदानावर नोव्हेंबर १९३८ मध्ये दीड लाख कामगारांसमोर त्यांनी त्यांच्या प्रश्नांवर प्रदीर्घ भाषण दिलेले आहे. या दोन्ही भाषणांच्या अभ्यासानंतर कामगारविषयक त्यांचे विचार स्पष्ट केले जाऊ शकतात.

७) ब्रिटिश सरकारच्या व्हाईसरायनी केंद्रात अर्थमंत्री म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची निवड केली. या पदावर राहून त्यांनी कामगारांच्या हिताचे अनेक निर्णय घेतलेले आहेत. हे निर्णय कार्यान्वित करण्यासाठी म्हणून त्यांनी अनेक कायदे केलेले आहेत. कामगारांशी संबंधित धोरणे ठरवताना त्यात कामगारांचा सहभाग असायलाच हवा यासाठी त्यांनी तशी कायदेशीर व्यवस्था केली. जी आजदेखील प्रचलित आहे. या देशातील आताच्या पिढीस याची कल्पना नाही की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे श्रममंत्री होण्यापूर्वी या देशातील कारखान्यात, गिरण्यात व इतर उत्पादक व्यवसायात कामाचा वेळ सूर्योदयापासून ते सूर्यास्तापर्यंत होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पहिल्यांदा ही प्रथा कायमची संपवून टाकली व कामाची वेळ आठ तासांची केली. त्यासाठी कायदा केला, जो कायदा आजदेखील सर्व क्षेत्रांना लागू आहे.

८) कमीत-कमी पगाराचा कायदा त्यांच्याच कार्यकाळात लागू झाला. याशिवाय कारखान्यात, कापड गिरण्यात कामगारांसाठी उपाहारगृहाची व्यवस्था, महागाईनुसार महागाई भत्ता, कामगारांसाठी योग्य दरात अन्नधान्यांचे विक्री केंद्र अर्थात, रेशन दुकाने, जास्त काम करणाऱ्यास जास्त अन्नधान्य, प्रॉव्हिडंट फंडची नियमावली यासंबंधीची प्रदीर्घ अशी चर्चा आणि त्या चर्चेतून या सर्वांसंबंधीचे कायदे त्यांच्याच काळात लागू झाले.

कामगारांना काम करताना अपघात झाला तर त्याचा मुआबजा देण्यासाठी म्हणून त्यांनी कामगारांसाठी विमा संरक्षण योजना लागू केली. कायमस्वरुपी कामगारास आठवड्यातून ४८ तास (रोज ८ तास) आणि हंगामी स्वरुपातील (अस्थायी) कामगारांना आठवड्यातून ५४ तास काम हे त्यांनीच लागू केलेले आहे. विशेष म्हणजे, स्त्री-पुरुषांच्या वेतनात या आधी जी तफावत होती, ती संपवून त्यांनी त्यात समानता आणली.

९) ९ डिसेंबर १९४३ ला ते धनबाद (बिहार) येथील खाणीत काम करणाऱ्या कामगारांची स्थिती पाहण्यासाठी म्हणून गेले. कोळसा कसा फोडला जातो, खाणीत मजूर कसे काम करतात हे पाहण्यासाठी म्हणून ते खाणीत ४०० फुटाखाली गेले. तेथे एक गर्भवती स्त्री कोळसा फोडण्याचे काम करीत असलेली पाहून ते संतप्त झाले. तेथील कामगार स्त्री-पुरुषांना त्यांनी अनेक प्रश्न विचारले. दिल्लीला परतल्यानंतर त्यांनी कायदाच केला की, स्त्री जर गर्भवती असेल तर तिला खाणीबाहेरचे काम द्यावे. तिला खाणीत उतरून काम करण्याचे काम यापुढे देण्यात येऊ नये. त्याशिवाय कामगार स्त्रीस बाळंतपणापूर्वी दहा आठवडे आणि बाळंतपणानंतर चार आठवडे भरपगारी सुट्टी देण्यात यावी. हा कायदा त्यांनी १९४३ साली तयार केला व लागूही केला. स्वातंत्र्यानंतरच्या सरकारने या भरपगारी सुट्टीचा काळ वाढवला आणि हा कायदा सर्वच क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या सर्व स्त्रियांसाठी लागू केला. याची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केली होती. याची जाणीव या देशातील सवर्ण व सर्व जाती-धर्मातील स्त्रियांनी ठेवावयास हवी व त्यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करावयास हवी. ८ फेब्रुवारी १९४६ ला त्यांनी 'भारतीय खाण कामगार सुधार कायदा' केंद्रीय विधिमंडळात ठेवला आणि तो मंजूर करून घेतला.

१०) कामगार विभागातंर्गत येणाऱ्या रोजगार विनीमय केंद्राची स्थापना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्त्वामुळे झालेली आहे. श्रममंत्री या नात्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कामगारांच्या हक्कांचे संरक्षण, त्यांना त्यांच्या कामाची सुरक्षितता, त्यांच्या मुलांना शिक्षणाची व्यवस्था यासंबंधी महत्त्वाचे निर्णय घेतलेले आहेत. त्यासाठी त्यांनी अनेक कायदे केलेले आहेत. त्या कायद्यांना राबवलेले आहे. या देशातील कामगारविषयक धोरणे त्यांनीच निश्चित केलेली आहेत.

वरील सर्व विवेचनावरून हे सिद्ध होते की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे केवळ दलितांचे नेते नव्हते, तर ते कामगारांचेदेखील नेते होते. सर्वच स्त्रियांच्या शोषणाविरूद्ध ते उभे होते. त्यांचे हे कार्य केवळ दलित-कामगार किंवा दलित स्त्रियांपर्यंतच मर्यादित नव्हते. भारतातल्या कामगारांना, बुद्धिवाद्यांना, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अनुयायांना, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना दलितांपर्यंत मर्यादित करणाऱ्या सर्वच पक्षातील नेत्यांना ते केवळ आपलेच नेते आहेत, हा अहंकार बाळगणाऱ्या दलितांना हे सर्व जाणून घेणे गरजेचे आहे. यासाठी आमच्या डोळ्यावर चिटकवलेली 'दलितांचे उद्धारक : डॉ. आंबेडकर' ही पट्टी कायमची काढून टाकावी लागेल. त्यानंतरच हे स्पष्ट होईल की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे या देशातील शोषितांचे, पीडितांचे, वंचितांचे, श्रमिकांचे, शेतकऱ्यांचे अर्थात सर्व वर्गाचे महान नेते होते. ●●●

# तो फार विचार करतो

सत्य हे सत्ताधाऱ्यांना कधीही प्रिय नसते. त्यांची सत्ता षड्‌यंत्रातून आलेली असते. असत्य हाच तिचा पाया असतो. त्यामुळे सत्ताधारी आणि सत्याचा आग्रह धरणारे यांचा संघर्ष अटळ असतो. सॉक्रेटिसच्या मृत्यूनंतर सत्यासाठी आग्रह धरणाऱ्या विचारवंतांची एक मोठी फळी उभी राहिली. ते सर्व इहवादी होते.



बी.जी.वाघ

जगाच्या सांस्कृतिक, धार्मिक व राजकीय इतिहासाकडे पाहिले तर प्रबोधनाच्या सर्व चळवळी या लेखक, विचारवंत वा तत्त्वज्ञ मंडळींनी घडविल्या आहेत; परंतु त्यासाठी सत्ताधाऱ्यांशी त्यांना प्रचंड संघर्ष करावा लागला आहे. त्यात असंख्य लोक मृत्यूमुखी पडले आहेत. सत्ताधाऱ्यांनी त्यांना सुळावर चढवले आहे, जिवंत जाळले आहे किंवा तुरुंगात त्यांचे हाल केले आहेत. भारतात बौद्ध अनुयायांची मोठ्या प्रमाणात कत्तल झाल्याचे दिसून येते. बौद्ध हे प्रबोधनाचे अग्रदूत होते. तो एक सांस्कृतिक, धार्मिक संघर्ष होताच; परंतु तो राजकीयदेखील होता. क्षत्रिय आणि ब्राह्मण वर्गाची अभद्र युती देशातल्या जात्यंध, सरंजामी व्यवस्थेचे बलस्थान होते. बुद्धाचे सारीपुत्त, महामोग्गलनसारखे शिष्यदेखील मारले गेले. बुद्धालादेखील मारण्याचे प्रयत्न झाले. पुढे प्रतिक्रांती होऊन देशातल्या तत्कालीन सत्ताधाऱ्यांनी धर्माच्या माध्यमातून बौद्ध धर्माला संपवले. हा संघर्ष जवळजवळ हजार वर्षे चालू होता. इतिहासकारांनी बौद्ध धर्माचा पाडाव झाला असे लिहिले; परंतु ती देशातल्या पुरोगामी चळवळीची हार होती. विचार जिवंत राहिला तर चळवळ जिवंत राहते, म्हणून विचार संपवला जातो. त्यासाठी विचारवंतांचीच हत्या केली जाते. भारतात कबीर, रोहिदास, तुकारामांपर्यंतच्या विद्रोही विचारवंतांच्या हत्या झाल्या. त्यास धार्मिक संघर्षाचे रूप दिले असले तरी तो संघर्ष होता, पुरोगामी आणि प्रतिगामी या शक्तींमधील. पुरोगामी का हरले आणि का जिंकले ते मुळापासून तपासले पाहिजे. ताकद असते ती चळवळीची. ती क्षीण होते. प्रतिगाम्यांच्या पाठीमागे राजकीय शक्ती उभी राहते. सामान्य माणसांना चांगले काय आणि वाईट काय ते कळत नाही. ते सत्ताधाऱ्यांच्या दडपणाखाली स्वतःच्याच हिताचा बळी देऊन प्रतिगामी शक्तींना सामील होतात. याचा अर्थ, प्रतिमागी विचार जनतेला आवडू लागतात. कारण त्यांची विवेकशक्ती राज्यकर्त्यांच्या नियंत्रणाखाली येऊन क्षीण झालेली असते. तत्त्वज्ञानाचा इतिहास पाहता सत्ताधाऱ्यांना अनुकूल असा विचार नसेल तर तो नष्ट करण्यासाठी ते सर्वशक्तीनीशी प्रयत्न करतात. आपण पाश्चात्य तत्त्वज्ञानाचे पितामह सॉक्रेटिसचे उदाहरण घेऊ या. त्याच्यावर आरोप होता, तो प्रचलित देव-देवतांना मानत नाही. तो स्वतः खूप विचार करतो आणि तरूणांना विचार करायला लाऊन त्यांची माथी भडकवतो. त्याला मृत्यूदंडाची शिक्षा झाली. त्यावेळी त्याने केलेले भाषण वाचण्यासारखे आहे. तो म्हणतो की, मी सत्ताधाऱ्यांना चांगलं म्हणणार नाही, मी खरे बोलणार. मला खरे बोलण्याची देवानेच आज्ञा केली आहे. मी माझ्या मतांसाठी स्वर्गात गेलो तर देवाशीपण भांडणार आहे. सत्याचा आग्रह हेच सॉक्रेटिसच्या मृत्यूचे कारण होते. सत्य हे सत्ताधाऱ्यांना कधीही प्रिय नसते. त्यांची सत्ता षड्‌यंत्रातून आलेली असते. असत्य हाच तिचा पाया असतो. त्यामुळे सत्ताधारी आणि सत्याचा आग्रह धरणारे यांचा संघर्ष अटळ असतो. सॉक्रेटिसच्या मृत्यूनंतर सत्यासाठी आग्रह धरणाऱ्या विचारवंतांची एक मोठी फळी उभी राहिली. ते सर्व इहवादी होते. ईश्वराचा खरा प्रणेता बुद्धच. पाश्चात्य तत्वज्ञांनी (Philosophers) बुद्धापासून बरेच काही उचलले आहे. धर्म आणि इहवाद यांच्यातील संघर्ष पुढे हजारो वर्षे चालू राहिला. इहवाद सांगतो की, या जगाचा कुणी निर्माता नाही, ईश्वर नाही. बुद्धाचेच विचार अनॅक्सा गोरसने मांडले आहेत. तो म्हणतो, जर ईश्वर आहे तर तो लोकांना दुःखमुक्त का करीत नाही? तो शक्तिमान असूनही लोकांना दुःखी ठेवत असेल तर तो दुष्ट आहे. अनॅक्सा गोरस ईश्वरास षंढही म्हणतो. संघर्ष आहे तो तथाकथित श्रद्धा आणि विवेकामध्ये. ख्रिश्चन धर्म आणि विज्ञान यातील संघर्षही शास्त्रज्ञांचा बळी घेणारा ठरला. धर्मग्रंथांतील सत्य अंतिम मानण्याचा हव्यास आजही आहे. तो येतो धार्मिक व सांस्कृतिक सत्ताकांक्षेमुळे. लोकांनी धर्मग्रंथांना मानलेच नाही तर त्यांची सत्ता तात्काळ संपुष्टात येईल. लोक मूर्ख असतात आणि त्यांना सतत मूर्खच बनवले पाहिजे अशी सत्ताधाऱ्यांची मनोमन इच्छा असते. जगातल्या कुठलाही सत्ताधाऱ्यांना सामान्य माणसे शहाणी झालेली नको असतात. त्यामुळेच सत्ताधाऱ्यांना समाजात विचारवंत लोक नको असतात. येशू ख्रिस्ताचा बळी गेला तो त्याने तत्कालीन सत्ताधाऱ्यांना आव्हान दिले म्हणूनच. मुळात येशू ख्रिस्तावरही बुद्धाचा प्रभाव होताच. 'माझ्या मानवी संस्कृतीचा अर्थ' या पुस्तकात मी सविस्तरपणे लिहिले आहेच. कुठल्याही प्रज्ञावंत, प्रतिभावंत माणसाचा सत्ताधाऱ्यांशी संघर्ष होणारच. तसा येशू ख्रिस्तांचाही झाला. ज्यू धर्मात अनेक रानटी प्रथा होत्या. ज्यूंच्या देवदेवता अतिशय हिंसक होते. धर्मनिंदेच्या आरोपाखाली

कठोर शिक्षा दिल्या जात. या पार्श्वभूमीवर दया, क्षमा, शांती, सहिष्णुता यांचा संदेश देणारा येशू ख्रिस्त विद्रोही ठरलाच. सत्ताधारी यहुद्यांनी त्याला क्रूरपणे मारले. प्रश्न निव्वळ धार्मिक कधीच नसतात. त्यामागे आर्थिक, राजकीय व सांस्कृतिक सत्ता असतात, ज्यांना परिवर्तन नको असते. धर्मदेखील एक सत्ताच आहे. तीदेखील राजकीय सत्ता हस्तगत करण्याचा प्रयत्न असते. यूरोपमध्ये जी शेकडो धार्मिक युद्धे झाली त्यामागे सत्ताकारण आणि अर्थकारणच होते. गॅलिलिओचा छळ झाला. ब्रुनोला जिवंत जाळण्यात आले. अनेक विचारवंतांना, शास्त्रज्ञांना, कलावंतांना देशोधडीस पळावे लागले. त्यामुळे विचारवंत आणि सत्ताधारी यांच्यातील संघर्ष हा सत्य आणि असत्य यातील संघर्ष असतो. तो मूलतः समतेचा, स्वातंत्र्याचा, सामाजिक न्यायाचा संघर्ष असतो. पुढे ख्रिश्चन धर्मातील पुरोहितांचे प्रस्थ वाढले. धर्मनिंदेच्या आरोपाखाली त्यांनीही हजारो लोकांना कठोर शिक्षा दिल्या. एका महिला विचारवंताला जिवंत जाळले. संघटित धर्म हे सत्ताकांक्षी असतात आणि म्हणूनच ते अधिकच कर्मठ, उग्र, हिंसक असतात. धर्माच्या नावाने सत्ता आणि मालमत्ता मिळवणे हा त्यांचा मुख्य उद्देश असतो. धर्मसत्ता आणि राजसत्ता एकत्र आल्यानंतर पाशवी सत्तांना एक धार्मिक चेहरा प्राप्त होतो. त्यामुळे त्यांच्या आज्ञा धर्मआज्ञा होतात. विचारवंतांना, विद्रोहींना मारणे मग एक धर्मसंमत कर्तव्य बनून जाते. ‘खबरदार, आमच्या धर्माविषयी बोलाल तर आम्ही तुम्हाला मारून टाकू’ हे त्यांचे घोषवाक्य असते. धर्म आमच्या श्रद्धेचा प्रश्न आहे. आम्ही कायदा किंवा घटना मानत नाही. कारण त्या माणसाने निर्माण केल्या आहेत. आमचे वेद, धर्मग्रंथ, कुराण किंवा बायबल हे सर्व ईश्वरी आहे, असा या सर्व धर्मांध शक्तींचा दावा असतो; परंतु माणसाला सद्सद्विवेकबुद्धी असते. तिला मानायचे की नाही? धर्माच्या नावाने जे मानवविरोधी कारस्थान किंवा दहशत तुम्ही निर्माण करता तिला विरोध करायचा का नाही, हे मूलभूत प्रश्न आहेत. देश-वदेशातील विचारी जनतेने सत्ताधाऱ्यांना ते विचारले आहेत. त्याची प्रतिक्रिया म्हणून सत्ताधाऱ्यांनी त्यांचा अनन्वित छळही केला आहे. विचारवंतांचे हे नैतिक कर्तव्यच असते की, सामान्य माणसाचा आवाज होणे, मूक मानवतेवरील अत्याचारांना प्रतिरोध करणे. मार्ग हिंसक की अहिंसक हे सत्तेच्या स्वरुपावरून ठरत असते.

लेनिन, मार्क्स यांच्या विचारधारा वेगळ्या आहेत. फ्रेंच राज्यक्रांती हिंसक होती; परंतु त्या क्रांतीमागे प्रेरणा होती ती रुसो, व्हाल्टेअर, डिडेरोंसारख्या विचारवंतांची. डिडेरोला जिवंत जाळण्यात आले. व्हाल्टेअरने धर्मसत्ता व राज्यसत्तेवर प्रचंड प्रहार केले. व्हाल्टेअरचा प्रभाव डॉ. आंबेडकरांवरही आहे. त्यांनी सत्ताधाऱ्यांच्या मूर्खपणावर, विषम व्यवस्थेवर, अनिर्बंध सत्तेवर हल्ले केले. त्यातूनच रक्तरंजित क्रांती होऊन स्वातंत्र्य, समता, बंधुता, सामाजिक न्याय ही तत्त्वे जगभर मान्य झाली; परंतु त्यांची अंमलबजावणी करण्यासाठी जगभरच्या प्रागतिक संस्था संघर्ष करीत असतात. आपल्या राज्यघटनेने स्वीकारलेल्या आणि जगभर मान्य असलेल्या या तत्त्वांना भारतात प्रचंड विरोध होत आहे. ही एक प्रकारची प्रतिक्रांतीच आहे. भांडवलशाही आणि धर्मवाद एकत्रित आल्यानंतर प्रागतिक चळवळी ठेचणे फार सोपे जाते. आंधळी धर्मसत्ता, आंधळा राष्ट्रवाद व भांडवलशाही म्हणजेच फॅसिझम. त्याचे मूळ असते असत्याभाषी प्रचारात. त्याला आपण पोस्ट ट्रूथ (ीीी ीीीीह) म्हणतो. सामान्य माणसाला रोजच्या जीवनात राष्ट्राच्या प्रश्नांशी काही देणे घेणे नसते. तो क्षीण विवेकी असतो. तो सहज प्रचाराला बळी पडतो. सत्ताधाऱ्यांकडे प्रचारकांची प्रचंड फौज, साधनसामग्री आणि बुद्धीमान माणसे असतात. त्यामुळे सामान्य जनता प्रचाराला, भुलथापांना बळी पडते. विचारवंत या संस्कृतीचा वा संस्थेचा ऱ्हास होत चालला आहे. त्यांचे जनमाणसावरील प्रभुत्व कमी झाले आहे. मुख्य म्हणजे विचारवंतही भयग्रस्त आहेत. झारची सत्ता उलथवून टाकण्याचे काम विचारवंतांनी केले; परंतु त्याआधी विचारवंतांना झारने सैबेरियात पाठवले. काहींना फासावर चढवले. ते निर्भयतेने लढले, म्हणूनच रशियात क्रांती होऊ शकली. जर्मनी, इटलीतील विचारवंतांनी प्रबोधनाच्या चळवळी चालवल्या. जगातल्या प्रतिभावंतांनो तुम्ही कुणाबरोबर आहात, असे मॅक्झीम गोर्कीने विचारले. आजही तो प्रश्न संयुक्तिकच आहे. सत्ताधारी जर कुणाला घाबरत असतील तर ते विचारवंतांना आणि बुद्धीजीवितांनाच. पत्रकार, लेखक, कवी, वकील, शास्त्रज्ञ यांना हवे असते मुक्त अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य. ते स्वातंत्र्य नष्ट होत असताना ते जर गप्प राहणार असतील तर त्यांच्याइतके मूर्ख तेच. हजारो विचावंतांनी आपले जीवन देऊन ज्या स्वातंत्र्याची स्थापना केली, त्यांना ते सांभाळता आले नाही, असा त्याचा अर्थ होईल. एक निर्भय हुंकार या व्यवस्थेला हलवू शकतो हे सॉक्रेटिसपासून आपण पाहात आलो आहोत. घटनात्मक मूल्यांबाबत जर श्रद्धा नसेल तर अविवेकाचे साम्राज्य पसरायला वेळ लागणार नाही. भारतात ती परिस्थिती निर्माण झाली आहे.

शेक्सपिअरच्या ज्यूलियस सिझर या नाटकात सिझर अँटॉनीला म्हणतो, ‘कॅशियसची मला भीती वाटते ‘He thinks too much. Such men are dangerous’ पुढे तो म्हणतो, ‘तो क्वचितच हसतो. त्याच्या हसण्यातही तुच्छता दिसते. सत्ताधाऱ्यांविषयीची बेफिकिरी दितसे. त्यांना पुढचे दिसत असते. अशा माणसांची मला भीती वाटते.’

सत्ताधारी आणि विचारवंतांतील हा संघर्ष कायम राहिलेला आहे. विचारवंत कायम अस्वस्थ आणि अशांत असतो. म्हणूनच सत्ताधारी त्याला घाबरतात. कारण हीच अशांतता तो समाजातही निर्माण करत असतो. ते त्याचे कर्तव्यच असते.

हा विचारवंतांचा आणि सत्ताधाऱ्यांचा संघर्ष म्हणजे मानवी संस्कृतीचा विकास आहे. हा प्रवास प्रबुद्धतेकडे जाणारा आहे. समाज आणि व्यक्ती कोणत्या पद्धतीने विचार करतात, यावरच हा प्रवास अवलंबून असतो. मी विचार करतो म्हणून मी आहे, हे प्रसिद्ध विधान आहे. आपण आहोत हे सिद्ध करण्यासाठी दुसरे कुठलेही प्रमेय उपयोगाचे नाही. •••

# जातिभेद अन् हिंसाचाराबाबत कोडगा बनत चाललाय समाज



✍ प्रो. सुखदेव थोरात

लोकशाहीवादी व्यवहारांसाठी कायदे लोकांचे ज्ञान किंवा माहिती आणि सामाजिक व आकलनात्मक कौशल्यांमध्ये वाढ करत नाहीत, त्यांना बळकटी आणत नाहीत. १९५५ च्या अस्पृश्यताविरोधी कायद्याची आणि अशा प्रकारच्या लिंग-संबंधित इतर कायद्यांची अंमलबजावणी सुरू आहे. तरीही लिंगभेद आणि हिंसाचार यांच्याप्रमाणेच अस्पृश्यता अद्यापही टिकून आहे. अ-लोकशाहीवादी मूल्ये आणि व्यवहार शिकले जाऊ नयेत यासाठी शिक्षण मदत करू शकते. कायदेशीर संरक्षण आणि त्याबरोबरच विद्यार्थ्यांकडच्या माहितीत किंवा ज्ञानात आणि त्यांच्या सामाजिक व वैयक्तिक क्षमतांमध्ये वाढ करण्यासाठी नागरी अध्ययन, अशा दुहेरी दृष्टिकोनाची आपल्याला लिंगभेद, जातिभेद व हिंसाचार यांची हाताळणी करण्यासाठी गरज आहे.

दिल्लीत सन २०१२ मध्ये तरुणीवर झालेला हिंस्र लैंगिक अत्याचार आणि जवाहरलाल नेहरू युनिव्हर्सिटीतील (जेएनयूमधील) विद्यार्थिनीवर या वर्षी कॅम्पसमध्येच झालेला क्रूर, निर्दयी हल्ला ही तीव्र हिंसाचाराची फक्त दोन उदाहरणे असून त्यामुळे संपूर्ण देश हादरला. सार्वजनिक संतापाची आणि कायदेशीर कारवाईची भीती असूनही लैंगिक हिंसाचाराच्या कृती सर्वसामान्य बनल्या आहेत. त्याचप्रमाणे २०१२ मध्ये बंगळुरूच्या ईशान्येकडच्या राज्यांतील नागरिकांचे सामूहिक स्थलांतर हाही तितकाच त्रस्तता निर्माण करणारा भाग होता. जातिभेद आणि हिंसाचार यांच्या घटना नियमितपणे घडत असून आपण आता त्यांबाबतीत खूपच कोडगे बनत चाललो आहोत.

जात, लिंग, वंश आणि धर्म यांच्या आधारावर केल्या जाणाऱ्या भेदभावाच्या घटना पूर्णपणे वेगळ्या नाहीत, तर आपला समाज कशा प्रकारे चालतो त्या मार्गाचे ते प्रतिबिंब आहे. लोकशाहीवादी मूल्यांच्या आणि व्यवहारांच्या विरोधात असलेली पारंपरिक मूल्ये कुटुंबातील आणि समाजातील सामाजिकरणाच्या माध्यमातून सातत्याने आपल्या मुलांच्या आणि प्रौढांच्या जडणघडणीच्या काळात त्यांच्या वर्तनाला आकार देत आहेत. या अनौपचारिक शिक्षणावर सार्वजनिक धोरण केवळ अत्यल्प प्रभाव टाकू शकते आणि ते समता आणि वैविध्याविषयी, भिन्नतेविषयी आदर या तत्त्वांपासून दूर आहे.

शिक्षण हे बदलाचे साधन असू शकते; परंतु राष्ट्राच्या उभारणीसाठी शिक्षणात सुधारणा, लोकशाहीवादी नसलेली मूल्ये न शिकणे या गोष्टी लोकशाहीवादी मूल्ये शिकण्याइतक्याच महत्त्वाच्या असतात. दुर्दैवाने, सध्याचे अभ्यासक्रम आणि अध्यापनशास्त्र यांच्यासह आपली शिक्षण संस्था पुरुष आणि स्त्रिया यांना आकार देऊन चांगले नागरिक घडवण्याच्या दृष्टीने नागरी शिक्षणाच्या आणि लोकशाहीवादी गुंतवणुकीच्या मार्गांचा विचार करता फारसे काही देऊ शकत नाहीत. याचा अर्थ, आपल्याकडे शिक्षणविषयीची, राष्ट्रीय एकात्मतेच्या शैक्षणिक धोरणाविषयीच्या चर्चेची, समता आणि सामाईक संस्कृतीच्या विकासाविषयीची उद्दिष्टे नाहीत असे इथे म्हणायचे नाही. निवडकपणे काही नागरी शिक्षण हे मानवी हक्क आणि लिंग यांविषयीच्या अभ्यासक्रमांच्या माध्यमातून घडते; परंतु हे सगळे शाळा आणि उच्च शिक्षण यांच्या परिघावरच राहिलेले आहे. आपल्या शाळा आणि उच्च शिक्षण अध्ययन संस्थांमध्ये फक्त नोकरीच्या बाजारपेठेसाठी विद्यार्थ्यांची तयारी करून घेण्यावरच प्रामुख्याने लक्ष केंद्रित केलेले असते. नागरी शिक्षण आणि लोकशाहीवादी गुंतवणूक हा आपल्या अध्यापनाच्या प्रमुख गाभ्याचा घटक राहिलेला नाही.

आफ्रो-अमेरिकन शिक्षणतज्ज्ञ जे.ए. बँक्स याने असे निरीक्षण नोंदवले आहे की, 'लोकशाहीवादी आणि न्याय्य समाज विकसित करेल आणि टिकवेल अशा प्रकारची माहिती घेणे, काळजी घेणे आणि कार्य करणे यासाठी विद्यार्थ्यांची तयारी करवून घेणे ही एकविसाव्या शतकातील शिक्षणाची भूमिका असली पाहिजे. तसेच वैयक्तिक, सामाजिक आणि नागरी कृतीशी बांधिलकी विकसित करणे आणि त्याचबरोबर प्रभावी नागरी कृतीमध्ये सहभागी होण्यासाठी आवश्यक असलेली माहिती आणि कौशल्ये विकसित करणे हीसुद्धा शिक्षणाची भूमिका असली पाहिजे'.

समाजांमधील वैविध्य हाताळताना नागरी अध्ययन निर्णायक असते. अमेरिका हे अशा प्रकारचे एक उदाहरण आहे. १९९५ च्या सुरुवातीला अमेरिकेने नागरी अध्ययन आणि वचनबद्धता यांसाठी महाविद्यालयांमधील आणि विद्यापीठांमधील अभ्यासक्रमांमध्ये आणि अध्यापनशास्त्रात सुधारणा करून शैक्षणिक धोरण विकसित केले. वैविध्यासाठीच्या शिक्षणाचे चार घटक असतात : माहिती, मूल्ये, कौशल्ये आणि कृती. माहितीतील सुधारणेत वैविध्य, विषमता, वंशवाद, लिंगवाद, धार्मिक दडपशाही, वर्गवाद, ज्यूंविरोधी द्वेषभाव आणि समलिंगी व्यक्तींविषयीचा द्वेषभाव आदी गोष्टी हाताळणाऱ्या मध्यवर्ती कल्पनांसह नवीन अभ्यासक्रमाचा समावेश असतो. वैयक्तिक क्षमता आणि कौशल्ये विकसित करण्यासाठी या धोरणाद्वारे नवीन अध्यापनशास्त्रीय पद्धती सुरू करण्यात आल्या. त्यांमध्ये आंतर-गट संवाद, संमिश्र पिअर गट या पद्धतींचा समावेश होता. या पद्धतींमध्ये वैविध्यपूर्ण गटांमधील विद्यार्थी एकमेकांशी आंतरक्रिया करत होते आणि एकमेकांमधील फरकांचा आदर राखण्यास शिकत होते. कुटुंबातून आणि समाजातून ग्रहण केलेल्या अनेक गोष्टी त्यांनी नवीन माहिती आणि कौशल्ये यांच्या माध्यमातून सोडून दिल्या आणि त्याबरोबरच वैविध्य आणि फरक हाताळण्यासाठी आवश्यक असलेली कौशल्ये आणि क्षमता यांचा त्यांनी लोकशाहीवादी पद्धतीने विकास केला. विद्यार्थ्यांना कृतीसाठी प्रेरित करणे हा तिसरा घटक होता. या सुधारणांमुळे वाढत्या नागरिकत्वासाठी तरुणांमधील नागरी भांडवलात वाढ होणे अपेक्षित होते. सोळा वर्षांनंतर २०११ मध्ये घेण्यात आलेल्या आढाव्यातून फक्त नागरी अध्ययनात आणि गुंतवणुकीतच नव्हे, तर त्यांच्या शैक्षणिक कामगिरीतही सकारात्मक फलिते मिळाल्याचे दिसून आले.



**जातीय हिंसाचाराच्या घटनांमध्ये देशात अव्वलस्थानी असलेल्या उत्तर प्रदेशातील ही एक प्रातिनिधीक स्वरूपाची जातीय हिंसाचाराची घटना.**

**शिक्षणात उद्दिष्ट नसणे :** भारतातील उच्च शिक्षणाचे परिसर किंवा कॅम्पस हे तुलनेत एकसंध असण्याऐवजी अधिक भिन्न बनत गेले आहेत. व्यापक आणि सूक्ष्म पातळ्यांवरच्या आकडेवारीतून हे स्पष्ट होईल. सन २००८ मध्ये उच्च शिक्षणातील एकूण विद्यार्थ्यांपैकी ४५ टक्के विद्यार्थी ग्रामीण परिसरातून आले होते आणि उर्वरित नागरी परिसरातील होते. त्यांच्यात ४२ टक्के महिला आणि ५८ टक्के पुरुष होते. सामाजिक रचनेचा विचार करता चार टक्के अनुसूचित जमातीचे, १३.५ टक्के अनुसूचित जातींचे, ३५ टक्के इतर मागास प्रवर्गाचे आणि उर्वरित ४८ टक्के होते. हिंदू विद्यार्थ्यांचे प्रमाण ८५ टक्के होते. त्या खालोखाल ८ टक्के मुस्लिम विद्यार्थी आणि ख्रिश्चन व इतर तीन टक्के होते. बहुसंख्य विद्यार्थी हे तुलनेत सुस्थितीतील असले तरी त्यांच्यामध्ये गरीब विद्यार्थीही होते. सुमारे एक चतुर्थांश विद्यार्थी खासगी संस्थांतून आले होते आणि उर्वरित विद्यार्थी सरकारी आणि खासगी अनुदानित संस्थांमधून आले होते. सुमारे निम्मे विद्यार्थी स्थानिक भाषांच्या माध्यमातून शिकले होते आणि उर्वरित विद्यार्थी इंग्रजी माध्यमातून शिकलेले होते. जेएनयू हे सूक्ष्म पातळीवरच्या भारतीय वैविध्याचे प्रतिनिधित्व करते. सन २०१३ मध्ये शिकणाऱ्यांमध्ये सुमारे निम्म्या मुली होत्या. ४१ टक्के विद्यार्थी ग्रामीण पार्श्वभूमीतून आणि ५९ टक्के विद्यार्थी शहरांतून व मोठ्या गावांतून आलेले होते. जातींच्या किंवा वांशिक रचनेचा विचार करता आठ टक्के एसटी, १५ टक्के एससी, ३२ टक्के ओबीसी आणि ४२ टक्के इतर होते. सुमारे २६ टक्के कमी उत्पन्न गटातील, १९ टक्के मध्यम उत्पन्न गटातील आणि ५४ टक्के उच्च उत्तम गटातील होते. सुमारे २१ टक्के सार्वजनिक शाळांतून आणि उर्वरित इतर शाळांतून आले होते. याखेरीज ते २६ राज्यांतून आणि २३५ विद्यापीठांतून किंवा महाविद्यालयांतून आले होते आणि विविध भाषिक आणि सांस्कृतिक पार्श्वभूमींचे प्रतिनिधित्व करत होते. या व्यापक वैविध्यात कनिष्ठ जातीचे, गरीब, महिला आणि विविध धार्मिक, प्रादेशिक, ग्रामीण आणि भाषिक पार्श्वभूमीचे विद्यार्थी उच्चवर्णीय, नागरी आणि सधन पुरुषांच्या सान्निध्यात रहात होते. अनेक वर्षे अशा पुरुषांचेच उच्च शिक्षणातील परिसरावर वर्चस्व होते. मोठ्या प्रमाणातील वैविध्याबरोबरच विद्यार्थ्यांनी त्यांच्याबरोबर तत्त्वप्रणाली, विचारसरणी, मूल्ये आणि इतरांशी वागण्याचे भिन्न मार्गही आणले होते. वैविद्यामुळे विद्यार्थ्यांना एकाच छताखाली वैविध्यातील समृद्धी अनुभवण्याची अद्वितीय संधी मिळाली असली तरीही सामाजिकदृष्ट्या समावेशक मार्गाने जगण्याची आव्हानेही त्यांच्यासमोर होती. यामुळे ओळखींभोवती सामाजिक

आणि पिअर गट तयार होऊ लागले आणि सामाजिक संबंधांमध्ये तफावत विकसित होऊ लागली. जात, वंश, वर्ग या आधारावर आणि त्याबरोबरच भाषिक, प्रांतिक आणि धार्मिक धर्तीवर या तफावती विकसित झाल्या. वगळणुकीच्या वर्तनातून कनिष्ठ जातीं आणि महिलांच्या संदर्भात भेदाभेद, मानसिक आणि शारीरिक हिंसाचारही आले होते. अशा प्रकारे शैक्षणिक परिसरांतही देशाच्या दीर्घकालीन जातीय, लिंगविषयक आणि वर्गीय भेदांच्या प्रतिकृती निर्माण झाल्या होत्या. उच्च शिक्षण पुढे सरकत असताना ते जात, लिंग आणि वर्ग यांच्यातील तफावतींच्या सामाजिक व्यासपीठांवरूनच पुढे सरकते. प्रो. मेरी थॉर्नटन आणि इतरांनी २०१० मध्ये भारतातील आणि अमेरिकेतील पाच उच्च शैक्षणिक संस्थांचा अभ्यास केला. त्यात त्यांना असे आढळून आले की, 'अभ्यास करण्यात आलेल्या उच्च शिक्षण कॅम्पसेसमधील उच्च शिक्षणातील गटांचा विचार करता, हा विभक्तपणा व्यापक आणि विश्वव्यापी होता. यांपैकी काही विभक्तपणा हा साहाय्यकारी कारणांसाठी, सोईसाठी किंवा निष्क्रियतेपोटी होता, तर काही वेळा हा विभक्तपणा वंश, प्रांत, राष्ट्रीयत्व, जात, वर्ग, धर्म, वय किंवा लिंग यांच्यातील उघड भेदामुळे होता. सन २०१३ मध्ये सॅम्सन ओव्हीचेगनने भारतातील प्रतिष्ठित विद्यापीठांतील दलितांच्या अनुभवांचा अभ्यास केला. त्याने असे निरीक्षण नोंदवले की, हे विद्यापीठ म्हणजे जातिभेदाचा व्यवहार केला जाणारा, जातिभेद सातत्याने अस्तित्वात असलेला आणखी एक आखाडा आहे. विद्यापीठातील वातावरण दलित आणि दलितेत्तर यांच्यातील विभक्तपणा लादते आणि ते टिकवून ठेवते. दलित विद्यार्थ्यांना या प्रमुख विद्यापीठातही जातीवर आधारित उघड आणि छुप्या भेदभावांचा खरोखरच अनुभव येतो.

**निर्णायक क्षण** : आज भारतातील उच्च शिक्षणात, नागरिकत्वाची उभारणी करण्यासाठी आवश्यक असलेल्या आकलनात्मक माहिती, सामाजिक कौशल्ये, नागरी अध्ययन आणि लोकशाहीवादी अभिवचनासाठी मूल्ये आणि कृती यांना प्रोत्साहन देणाऱ्या क्षमतेचा आणि सक्षमतेचा अभाव आहे. 'अ क्रुशियल मोमेंट ... कॉलेज लर्निंग अँड डेमॉक्रसीज फ्युचर' या शिक्षणावरच्या ए.यू.एस. अहवालातून असे दिसून आले आहे की, ....'स्वातंत्र्याप्रमाणे नागरी माहिती किंवा ज्ञान आणि क्षमता या जन्मजात प्राप्त झालेल्या नसतात. त्या सर्व पातळ्यांवरच्या शिक्षणाने आणि इतरांचे दृष्टिकोन गांभीर्याने विचारात घेऊन कष्टाने मिळवाव्या लागतात.' लोकशाहीवादी अंतर्दृष्टी आणि पुरेसे ज्ञान व क्षमता या गोष्टी नेहमीच वाढत जाणाऱ्या असतात, नेहमीच अपूर्ण असतात. म्हणून नागरी अध्ययन हा माध्यमिक विद्यालयापासून पदवीच्या शिक्षणसंस्थेपर्यंतच्या शिक्षणाच्या प्रत्येक पातळीचा अविभाज्य घटक असला पाहिजे.' यासाठी उच्च शिक्षणाचा आणि त्याच्या मार्गाचा 'लोकशाहीवादी मूल्ये, आदर्श आणि प्रक्रिया यांचे वाहक' म्हणून आणि राज्यघटनेतील आदर्श व आपल्या लोकांच्या दैनंदिन जीवनातील वास्तविकता यांच्यातील तफावत कमी करण्यासाठी वापर करून घेण्याचा हाच निर्णायक क्षण आहे. वैविध्याची, भेदभावाची आणि लैंगिकतावादाची हाताळणी करण्यासाठी आपण आता कुठे सुरुवात केली आहे. त्या पार्श्वभूमीवर भारतासाठी ही एक निर्णायक चळवळ आहे.

**पुढाकार** : जेएनयू आणि दिल्ली विद्यापीठ यांना लैंगिक हिंसाचार आणि लैंगिकतावाद हाताळण्याच्या यंत्रणेला बळकटी आणण्यास भाग पाडण्यात आले आहे. ही चांगली पावले असली तरीही याच्या दिशेवर चांगला विचार करण्याची गरज आहे. कायदेशीर सुरक्षितता आणि लिंग संवेदनशीलता व अध्ययन या लिंगभेद आणि जातिभेद हाताळण्याच्या दोन मार्गांपैकी पहिल्या मार्गावर आतापर्यंत भर देण्यात आला आहे. ही गोष्ट आवश्यक असली तरीही कायदेशीर संरक्षणाला नागरी शिक्षणाच्या आणि अभिवचनाच्या बळकट घटकाने पाठबळ आणि पूरकता देण्याची गरज आहे. अ-लोकशाही वर्तनात सुधारणा करण्याच्या उपाययोजनांना त्यांच्या मर्यादा आहेत. कायदे चुकीच्या गोष्टींना परावृत्त करतात; परंतु अ-लोकशाहीवादी वर्तनाचे स्रोत दुरुस्त करतातच असे नाही. लोकशाहीवादी व्यवहारांसाठी कायदे लोकांचे ज्ञान किंवा माहिती आणि सामाजिक व आकलनात्मक कौशल्यांमध्ये वाढ करत नाहीत, त्यांना बळकटी आणत नाहीत. १९५५ च्या अस्पृश्यताविरोधी कायद्याची आणि अशा प्रकारच्या लिंग-संबंधित इतर कायद्यांची अंमलबजावणी सुरू आहे. तरीही लिंगभेद आणि हिंसाचार यांच्याप्रमाणेच अस्पृश्यता अद्यापही टिकून आहे. अ-लोकशाहीवादी मूल्ये आणि व्यवहार शिकले जाऊ नयेत यासाठी शिक्षण मदत करू शकते. कायदेशीर संरक्षण आणि त्याबरोबरच विद्यार्थ्यांकडच्या माहितीत किंवा ज्ञानात आणि त्यांच्या सामाजिक व वैयक्तिक क्षमतांमध्ये वाढ करण्यासाठी नागरी अध्ययन, अशा दुहेरी दृष्टिकोनाची आपल्याला लिंगभेद, जातिभेद व हिंसाचार यांची हाताळणी करण्यासाठी गरज आहे. माहिती देणे आणि करिअरची तयारी यासंदर्भातील उच्च शिक्षणाच्या उद्दिष्टाची, माहितीपूर्ण आणि वचनबद्ध नागरिकत्वाच्या वाढीला साहाय्य करण्याच्या तिसऱ्या राष्ट्रीय उद्दिष्टाशी सांगड घालणे, तसेच नागरी भांडवलातील राष्ट्रीय तूट कमी करणे हे उच्च शिक्षणाचे उद्दिष्ट आहे. क्रुशिअल मोमेंट अहवालात, लोकशाही आणि नागरी जबाबदारीसाठी अंशतः मध्यवर्ती किंवा परिघावरच्या नव्हे, तर सर्वव्यापी वातावरणाच्या उभारणीच्या मुद्द्यांवर भर देण्यात आला आहे. यासाठी लिंगसमानता आणि जातसमानता, स्वातंत्र्य आणि बंधुता यांविषयी अधिक संवेदनशीलता असलेली आणि या सर्व गोष्टींच्या वाढीसाठी काम करणारी, तसेच कायदेशीर संरक्षणावरचे अवलंबित्व कमी करणारी पिढी तयार करण्यासाठी आपल्या शिक्षण यंत्रणेत सुधारणा करणे गरजेचे आहे. •••

**(प्रो. सुखदेव थोरात हे जवाहरलाल नेहरू विद्यापीठाचे प्राध्यापक आणि इंडियन कौन्सिल ऑफ सोशल, सायन्स रिसर्चचे अध्यक्ष आहेत.)**

भाग २

# मुस्लिमांचे नोकऱ्यांमध्ये कमी प्रतिनिधीत्व

अजय के. नाईक,
खलिद खान, आशुतोष वर्मा


धार्मिक गटांमधील एकआकडी वर्गीकरणावर आधारित औद्योगिक गटांच्या वाट्याचा विचार करता, मुस्लिमांमध्ये हिंदूंच्या तुलनेत, उत्पादन आणि व्यापार उद्योगांमधील रोजगाराचे केंद्रीकरण उच्च आहे. (आलेख ३ आणि तक्ता ६ व ७ पहा.) मुस्लिमांमध्ये एकूण नोकऱ्यांपैकी या दोन उद्योगांचा वाटा सुमारे ५७ टक्के आहे, तर हिंदूंमधील हा वाटा ४१ टक्के आहे. एकूण नोकऱ्या करणाऱ्या मुस्लिमांपैकी ३२ टक्के मुस्लिम उत्पादन क्षेत्रात आहेत आणि हिंदूंमधील हे प्रमाण २२ टक्के आहे. व्यापारातील मुस्लिमांचा वाटा २४.८ टक्के आणि हिंदूंचा १८.८ टक्के आहे. सार्वजनिक प्रशासन आणि शिक्षण यांसारख्या क्षेत्रांतील मुस्लिमांचा वाटा हिंदूंच्या तुलनेत खूपच कमी आहे. औद्योगिक गटांची रचनाच सरकारी नोकऱ्यांतील आणि खासगी क्षेत्रातील नियमित नोकऱ्यांतील मुस्लिमांच्या कमी प्रतिनिधित्वाचे अंशतः स्पष्टीकरण देते. उत्पादन आणि व्यापारासह स्वयंरोजगार आणि हंगामी रोजंदारी यांमधील उच्च केंद्रीकरणातून अत्यल्प खेळत्या भांडवलासह मुस्लिमांचा खासगी उद्योगांमधील मोठा वाटा सूचित होऊ शकतो.

मग कमी दर्जाच्या रोजगारांमध्ये मुस्लिमांचे उच्चतर केंद्रीकरण आहे. त्याचे स्पष्टीकरण काय आहे? दोन महत्त्वाची कारणे अशी आहेत : हिंदूंच्या तुलनेत मुस्लिमांमध्ये असलेली शिक्षणाची कमी पातळी आणि गरीब आर्थिक पार्श्वभूमी.


मुस्लिमांच्या संदर्भात करण्यात आलेल्या काही थोड्या अभ्यासांपैकी डिसूझा आणि इतर (२०१६) यांनी केलेल्या एका अभ्यासातून हिंदूंच्या तुलनेत मुस्लिमांमध्ये कमी शिक्षण असल्याचे दाखवून देण्यात आले आहे. शैक्षणिक पातळीनिहाय विविध धार्मिक गटांमधील रोजगाराच्या वाटपातूनही मुस्लिमांमधील कमी उच्च शिक्षणावर आणि उच्च शिक्षणातील नोकऱ्यांमधील त्यांच्या कमी वाट्यावर शिक्कामोर्तब होते. शहरी भागांमध्ये मुस्लिमांमधील निरक्षरांचे प्रमाण हिंदूंच्या तुलनेत अधिक आहे. मुस्लिमांमध्ये रोजगारात असलेले सुमारे २४ टक्के कामगार निरक्षर होते, तर हिंदूंमधील हे प्रमाण १३ टक्के होते.

प्राथमिकपर्यंत शिक्षण घेतलेल्या मुस्लिम कामगारांचे प्रमाण उच्चतर म्हणजे २८ टक्के होते. हिंदूंमधील हे प्रमाण १८ टक्के होते. त्याउलट, उच्च शिक्षणातील रोजगारातील त्यांचा वाटा हिंदूंच्या तुलनेत कमी होता. हिंदूंमध्ये सुमारे २४ टक्के नोकरदार पदवीधर आणि त्याहून अधिक शिकलेले होते. मात्र मुस्लिमांमधील हे प्रमाण ८.६ टक्के होते. हे प्रमाण ख्रिश्चन आणि शीख यांसारख्या इतर धार्मिक अल्पसंख्याकांमध्येही उच्चतर होते या गोष्टीची नोंद घेणे आवश्यक आहे. विविध शैक्षणिक पातळ्यांवर असलेल्या विविध धार्मिक गटांच्या प्रतिनिधित्वाच्या संदर्भात, शिक्षणाच्या पातळीनुसार कामाच्या विभागणीचे विश्लेषण करणेही शक्य आहे. वर उल्लेख केल्याप्रमाणे शहरी भागात एकूण नोकरी करणाऱ्यांमध्ये हिंदूंचे प्रमाण ७८.२ टक्के आणि मुस्लिमांचे प्रमाण १५.८ टक्के आहे, परंतु हे प्रमाण अशिक्षितांमध्ये आणि मध्यम शालेय स्तरापर्यंतचे शिक्षण घेतलेल्यांमध्ये उच्चतर आहे. मात्र मुस्लिमांमध्ये ते माध्यमिक, उच्च माध्यमिक आणि त्याहून अधिक शिक्षण घेतलेल्यांमध्ये कमी आहे. उदाहरणार्थ, रोजगार करणाऱ्या निरक्षरांमधील मुस्लिम निरक्षरांचे प्रमाण २६.३ टक्के आहे. मात्र उच्च शिक्षणातील रोजगारांमधील त्यांचा

**आलेख ३ : शहरी भारतातील हिंदू आणि मुस्लीम यांच्यातील औद्योगीक गटांचा वाटा : २०११**



**आलेख ४ : शहरी भारतातील अशिक्षित आणि उच्च शिक्षित यांचे हिंदू आणि मुस्लीम यांच्यातील प्रमाण : २०११**




वाटा फक्त ६.१ टक्के आहे.

खराब आर्थिक पार्श्वभूमी हासुद्धा कमी दर्जेदार नोकरीला किंवा रोजगाराला कारणीभूत असलेला एक महत्त्वाचा घटक आहे. रोजगारितांमध्ये आर्थिकदृष्ट्या दुर्बल पार्श्वभूमी असलेल्या मुस्लिमांचे प्रचंड प्रतिनिधित्व असल्याचे एनएसएस माहितीतून स्पष्ट होते. (आलेख ५ आणि तक्ता १० व ११ पहा.) आहार खाण्याच्या प्रमाणानुसार ('एमपीसीई'नुसार) धार्मिक गटनिहाय रोजगारांचे वितरण असे दर्शवते की, रोजगारित मुस्लिम कामगारांपैकी सुमारे एक चतुर्थांश कामगार आहाराच्या निकषाच्या तळातील गटात येतात, तर याच निकषांवरचे सुमारे १२.९ टक्के कामगार हिंदू होते. दुसरीकडे, या निकषाच्या सर्वोच्च पातळीत सुमारे एक चतुर्थांश हिंदू कामगार आणि ८.६ टक्के मुस्लिम कामगार येतात. त्याप्रमाणेच आहार खाण्याच्या बाबतीत तळातील भागात मुस्लिमांचे अतिरिक्त प्रतिनिधित्व आणि सर्वोच्च उत्पन्न निकषावर अत्यंत कमी प्रतिनिधित्व होते. नोकरदारांपैकी २६.३ टक्के तळाच्या भागात, तर ६.१ टक्का लोक सर्वोच्च पातळीत होते. या संदर्भातील हिंदूंचे प्रमाण अनुक्रमे ७०.६ टक्के आणि ८५.९ टक्के होते. अशा प्रकारे कामगार बाजारपेठ उपलब्ध असण्याचा विचार करता या माहितीवरून मुस्लिमांची दुर्बल अवस्था दिसून येते. निरक्षरांमध्ये आणि दुर्बल कामगार दलांमध्ये त्यांचे केंद्रीकरण उच्चतर आणि अधिक चांगल्या दर्जाच्या रोजगारांमधील त्यांचे केंद्रीकरण खूप कमी आहे.

**भेदभावाचे अनुभव : सूक्ष्मस्तरीय विश्लेषण**


आधीच्या विभागातील दुय्यम माहितीच्या विश्लेषणातून असे दिसून येते की, कमी दर्जाच्या रोजगारातील अधिक केंद्रीकरणामुळे शहरी कामगार बाजारेपेठेतील मुस्लिमांची स्थिती दुर्बल आहे. मात्र तरीही शहरी कामगार बाजारपेठेतील मुस्लिमांच्या सहभागाविषयीच्या अभ्यासांमधून मुस्लिमांच्या बाबतीत धमधिारित पूर्वग्रह असल्याचे सूचित होते. पूर्वग्रह आणि भेदभाव यांच्या अस्तित्वाचे परीक्षण करण्यासाठी आणि त्यामागे असलेल्या भेदभावाचे स्वरूप व प्रक्रिया समजून घेण्यासाठी दिल्लीच्या नॅशनल कॅपिटल रिजनमधील गृह वसाहतींमध्ये प्राथमिक क्षेत्रीय अभ्यास करण्यात आला. सखोल मुलाखती, काही केस स्टडीज यांची कागदोपत्री नोंद करण्यात आली. त्यांमधून मुस्लिमांच्या बाबतीत भेदभाव केला जात असल्याचे सूचित झाले. क्षेत्रीय अभ्यासातून हिंदू आणि मुस्लिम या दोहोंचे दृष्टिकोन विचारात घेतले गेले. कामगार बाजारपेठ उपलब्ध होण्यात पूर्वग्रह असल्याचे या प्रतिसादांमधून निश्चित झाले. सखोल मुलाखतींमधून समोर आलेल्या प्रमुख निरीक्षणांची पुढे चर्चा करण्यात आली आहे.

**कामाचे स्वरूप आणि दुर्बलता**

अनौपचारिक क्षेत्रात काम करणाऱ्या हिंदू आणि मुस्लिम या दोहोंमध्ये कामाची अनिश्चितता आहे. तीन मुस्लिम आणि चार हिंदू अशा सात प्रतिसादकर्त्यांच्या प्रतिसादांतून, कामाच्या प्रतिकूल स्थिती आणि रोजंदारीचे वेतन देण्यात दिरंगाई करणे किंवा ते नाकारणे हे अनौपचारिक शहरी कामगार बाजारपेठेतील सहभागाचे महत्त्वाचे सामाईक अनुभव असल्याचे समोर आले. या लोकांनी एक आठवडा ते चार महिन्यांपर्यंत काम केले होते. त्या सर्वांनीच असे सांगितले की, त्यांचा गावप्रमुख (सरपंच) त्यांना वेळेवर वेतनही देत नव्हता किंवा ठरवलेली रक्कमही देत नव्हता. त्यांच्या कामाच्या परिस्थिती दारुण होत्या. तिथे नेहमीच टोकाच्या अमानवी स्थिती होत्या. त्यांमध्ये पाणी नसणे, अन्न नसणे इ.चा समावेश होता. त्यांना फक्त वेतनच नाकारले गेले नव्हते, तर सरपंचाने कामगारांना धमक्या दिल्या होत्या आणि त्यांच्यापैकी काही जणांना मारहाणही केली होती. एका प्रतिसादकर्त्याने असे सांगितले की, ज्या ज्यावेळी त्याच्या मालकाची माणसे त्याला रस्त्यांवर पहात असत त्या त्यावेळी ती त्याला मारहाण करत. तसेच त्याला देय असलेली २०,००० रुपयांची रक्कमही नाकारण्यात आली होती.

सर्वेक्षण करण्यात आलेल्या भागात घराची देखभाल करणारे १२ कर्मचारी होते. त्यांच्यापैकी तिघांच्या मुलाखती घेण्यात आल्या. ते सगळे हिंदू होते आणि बहुतेक जण पश्चिम बंगालमधील होते. आश्चर्याची बाब म्हणजे त्यांच्यापैकी सर्वांनाच एका सामाईक मध्यस्थामार्फतच कामाविषयीची माहिती समजली होती आणि त्यांना पश्चिम बंगालमधून गुरुग्रामला आणण्यात आले होते. मुलाखत घेण्यात आलेल्या तीन कर्मचाऱ्यांपैकी दोघे जण

**आलेख ५ : शहरी भारतातील हिंदू आणि मुस्लिम यांचे तळातील आणि सर्वोच्च थरातील प्रमाण : २०११**





**मुस्लिमांमध्ये शिक्षणाचे कमी प्रमाण असल्यामुळे कमी दर्जाच्या व्यवसायात त्यांचे अधिक प्रमाण असल्याचे संशोधनातून सिद्ध होते.**

त्यांना मिळणारे लाभ व त्यांचे हक्क यांविषयी पूर्णपणे अनभिज्ञ होते. त्यांच्या कंत्राटात त्यांना सुट्टी घेण्याचा पर्याय उपलब्ध होता, परंतु या पर्यायाचा अर्थ काय होतो आणि त्याचा वापर कसा करून घ्यायचा असतो हे त्यांना माहीत नव्हते. हे दोन्ही प्रतिसादकर्ते निरक्षर होते आणि त्यांची जात किंवा सामाजिक गट यांविषयी त्यांना कसलीच माहिती नव्हती. कामातून मिळणारे समाधान आणि वैयक्तिक श्रद्धा यांविषयीच्या बहुतेक प्रश्नांना त्यांनी दिलेल्या उत्तरांमधून गुरगावसारख्या महानगरांमध्ये उपलब्ध असलेल्या शक्यतांविषयी त्यांना एक तर बिलकूल माहिती नव्हती किंवा त्यांना मिळू शकत असलेल्या कामांपैकी त्यांना देण्यात आलेले काम उत्तम होते यांवर त्यांना विश्वास ठेवण्यास भाग पाडण्यात आले होते. कौशल्य प्रशिक्षण किंवा व्यावसायिक शिक्षण इ. संदर्भात कोणताही पुढाकार घेण्याची त्यांना इच्छा नव्हती. मात्र उत्तर प्रदेशातून आलेल्या आणि घराची देखभाल करणाऱ्या कर्मचाऱ्यांमध्ये अधिक तरुण असलेल्या तिसऱ्या कर्मचाऱ्याला त्याला मिळू शकणाऱ्या विविध संधींच्या बाबतीत माहिती मिळवण्याची जिज्ञासा होती. तो नुकताच सहा महिन्यांपूर्वी या कामावर रुजू झाला होता. खालील संभाषणातून त्याची जिज्ञासा स्पष्ट होते.

**तुझ्या कौशल्य पातळीचा किंवा शैक्षणिक स्तराचा विचार करता, तुला चांगलं काम मिळालं आहे असं तुला वाटतं का? :** होय. मी निरक्षर आहे, त्यामुळे मला मिळालेलं काम चांगलंच आहे. परंतु मला पुढे जाता यावं यासाठी माझ्याकडे अधिक क्षमता असावी, यासाठी मी कोणतंही कौशल्य शिकू शकतो. घरगुती देखभालीच्या कामातील माझं कौशल्य वाढवण्याचाही मी प्रयत्न करत आहे. शिवाय ऑटोरिक्षा चालवणं किंवा पेंटिंग अगर यांत्रिकी कामासारखी नवीन कौशल्यं शिकण्याचाही मी प्रयत्न करत आहे.

हा तरुण नव्यानेच भरती झाला होता. इतर दोन कामगारांच्या प्रतिसादांच्या तुलनेत त्याचा दृष्टिकोन खूपच भिन्न होता. त्यांच्या वयात फारसा फरक नव्हता. तरीही ते काम करत असलेल्या कालावधीत बराच मोठा फरक होता. इतर दोघे जण साडेतेरा वर्षे काम करत होते. यावरून असे वाटते की शहरी कामगार बाजारपेठेत नव्यानेच स्थलांतरित म्हणून आलेल्या नवीन प्रवेशकर्त्यांच्या मनात कारकीर्दीत प्रगती करण्याची आणि आपली भविष्यातील मिळकत वाढवण्यासाठी नवीन कौशल्ये शिकण्याची जोरदार इच्छा असते. मात्र ते जितका अधिक काळ या व्यवसायात राहतात, तितकी त्यांची परिस्थिती अधिक निराशाजनक आणि निराशावादी बनत जाते. त्यांच्या कौशल्याच्या विकासातून किंवा वैविध्यीकरणातून त्यांच्या कामाची स्थिती सुधारण्याची अत्यल्प शक्यता असल्याचे किंवा अजिबातच शक्यता नसल्याचे त्यांना वाटू लागते.

धर्माधारित पूर्वग्रह अस्तित्वात असल्यामुळे हिंदू कामगारांच्या तुलनेत मुस्लिम कामगारांना अनौपचारिक शहरी बाजारपेठांमध्ये काम करणे भाग पडते. लाँड्रीकाम करणाऱ्या हिंदू कर्मचाऱ्याच्या मुलाखतीतून मुस्लिमांविषयीचा धर्माधारित पूर्वग्रह खोलवर रुजल्याचे स्पष्ट झाले. तो पाचवीपर्यंत शिकला होता आणि २१ वर्षे काम करत होता. त्याच्या कामाची सुरुवात बालकामगार म्हणून झाली होती. या लाँड्री व्यावसायिकाने स्पष्टपणे असे सांगितले की, मुस्लिमांना वेगळ्या प्रकारे वागवण्यावर त्याचा विश्वास नव्हता; परंतु त्याच्या बोलण्यात आणि कृतींमध्ये मोठी तफावत होती. शिवाय त्याच्या कृती खोलवर रुजलेल्या पूर्वग्रहांनुसार पार पडत होत्या आणि त्याच्या काही कृती तर द्वेषमूलक होत्या, असेही दिसत होते. दिवसभर बहुतेक ड्रायव्हर त्याच्याबरोबर बसले होते, बोलत होते आणि त्याच्याबरोबर खातही होते. तो सतत त्या सर्वांबरोबरच खूपच आनंदात वागत होता. मात्र त्याच्या दुकानाच्या जवळपास एकही मुस्लिम ड्रायव्हर किंवा दुकानदार

येत-जात नव्हता. ज्यावेळी ते तिथून जात होते, त्यावेळी तो त्यांच्या जाण्या-येण्याची दखल घेत नव्हता. मुस्लिम कामगारांबरोबर कोणत्याही प्रकारचे संभाषण तो करत नव्हता. त्याच्या हिंदू कामगारांमध्येही त्याचा हा पूर्वग्रह झिरपलेला होता. ते सगळे एकत्र बसत होते, आराम करत होते, खात होते, पत्ते खेळत होते. कामाच्या ठिकाणचे या गटातील वातावरण हे मुस्लिमांचे स्वागत न करणारे होते. यावरून असे दिसते की, भेदभाव हा फक्त रोजगाराच्या अटी आणि उत्पन्न यांच्याशीच संबंधित नाही, (मुलाखती घेण्यात आलेल्या कामगारांच्या नमुन्यातील सूचक शोधांतून असे स्पष्ट होते की, भेदभावामुळे मुस्लिम कामगारांना वार्षिक सुमारे २० टक्के उत्पन्न कमी मिळते.) तर तो कामगार बाजारपेठेतही शिरला असून कामाच्या ठिकाणच्या सामाजिक परिस्थितीतही झिरपलेला आहे.

घराची देखभाल करणाऱ्या पर्यवेक्षकाच्या मुलाखतीमधूनही भेदभावाचा आणखी एक रुचिपूर्ण प्रसंग दिसून आला. त्याने अगदी निःसंकोचपणे मुस्लिमांच्या विरोधातील त्याचे पूर्वग्रह मान्य केले. त्या पर्यवेक्षकाने सांगितले की, 'हिंदू आणि मुस्लिम यांच्यातील खाण्या-पिण्याच्या सवयी वेगवेगळ्या असल्यामुळे ते मुस्लिम कामगारांना कामावर बिलकूल ठेवत नव्हते.' त्याने पुढे असेही सांगितले की, आधी दोघा मुस्लिमांना कामावर ठेवण्यात आले होते; परंतु ते त्यांच्यामध्ये मिळून मिसळून वागू शकले नाहीत आणि त्यामुळे काम सोडून निघून गेले. ते स्वेच्छेने काम सोडून गेले होते, त्यांना काढून टाकण्यात आले नव्हते. त्यानंतर मात्र घराच्या देखभालीसाठी एकाही मुस्लिम कामगाराला घेण्यात आले नव्हते. दुसऱ्या एका मुस्लिम दुकानदाराचा अनुभव संमिश्र स्वरूपाचा होता. त्यामधून धर्माधारित भेदभाव ही प्रक्रिया त्याच्या दृष्टीने अलीकडची असल्यासारखे वाटत होते. त्याला भेदभावाचा अल्प अनुभव होता. त्या परिसरात त्याला फक्त एकदाच तसा अनुभव आला होता. परिसरातील रहिवासी कल्याण संघटनेने ते दुकान मुस्लिम व्यक्ती चालवत असल्याने तिथून हटवावे, अशी मागणी केली होती; परंतु त्याच्या दुकानातून दर्जेदार सेवा दिली जात असल्यामुळे बहुतेक रहिवाशांचा या मागणीला विरोध होता. त्यामुळे त्याला परिसरातून दूर करण्याची योजना फळली नव्हती. मात्र दुकानदारांना तीव्र भेदभावाला तोंड द्यावे लागल्याच्या घटनाही घडल्या होत्या. आधीच्या विभागात नमूद करण्यात आल्याप्रमाणे एकाच ठिकाणच्या लाँड्रीचालक आणि ड्रायव्हर यांनी मुस्लिम कामगारांशी आंतरक्रिया करण्यास नकार दिला होता आणि म्हणून त्या दुकानदाराच्या दुकानातील सामाजिक वातावरण फारसे मैत्रीपूर्ण, सलोख्याचे नव्हते.

क्षेत्रीय मुलाखतींमधून समोर आलेला आणखी एक स्वारस्यपूर्ण शोध म्हणजे शहरी अनौपचारिक कामगार बाजारपेठांत नव्यानेच आलेल्या लोकांना (विशेषतः स्थलांतरितांना) अधिक प्रमाणात भेदभावाला तोंड द्यावे लागत होते. मात्र कालांतराने समान अनुभव घेतल्यानंतर आणि सामाजिकीकरण झाल्यानंतर भेदभावात्मक वर्तनाचे असे अनुभव आणि पद्धती कमी होत होत्या आणि नष्टही होत होत्या. भेदभावाचे बळी असलेल्या लोकांनी या भेदभावाला जीवनमार्ग म्हणून स्वीकारून तिकडे लक्ष देणे व त्याविषयी तक्रार करणे थांबवल्यामुळे हे घडत होते, की समाजांमध्ये सामाईक अनुभव वाटून घेतले जात होते आणि कालौघात सामाजिकीकरण घडत होते, म्हणून भेदभाव पूर्णपणे नष्ट होत होते हे सांगणे अवघड आहे. या क्षेत्रीय कामकाजातून आगामी संशोधनाचा हा एक आकर्षक विषय मात्र समोर आला आहे.

**महिला कामगारांची असुरक्षितता :** महिला कामगारांच्या सहभागात काही प्रमाणात वाढ झाली असली तरीही शहरी कामगार बाजारपेठेतील कामांमध्ये महिलांचा कमी सहभाग असल्याचे दुय्यम माहितीतून दिसून येते. (भल्ला आणि कौस, २०११). सहभागाचा विचार करता महिला कमी गुणवत्तेच्या कामांमध्ये केंद्रित झाल्याचे दिसून येते. (दास, २००३.) घरगुती कामे करणाऱ्या मुस्लिम महिलांच्या विशेषतः कामगारांच्या बाजारपेठेतील त्यांच्या प्रवेशाचे आणि त्यांच्या धार्मिक पार्श्वभूमीमुळे त्यांना तोंड द्यावे लागत असलेल्या कामाच्या ठिकाणच्या वातावरणाचे विश्लेषण करण्यासाठी मुलाखती घेण्यात आल्या. हे बहुतांश घरगुती कामगार पश्चिम बंगालच्या नादिया जिल्ह्यातून स्थलांतरित झालेले होते आणि अपार्टमेंट कॉम्प्लेक्सच्या (त्यांच्या कामाच्या ठिकाणाच्या) मागे झोपडपट्टीवजा घरांमध्ये भाड्याने राहत होते. त्यांच्या प्रतिसादांमधून असे दिसून आले की, त्यांच्यापैकी बहुतेक जणींना विविध प्रकारच्या भेदभावांचा अनुभव आला होता आणि अनेकांना काम आणि वेतन नाकारण्यात आले होते. मात्र 'नाव बदल' ही एक स्वारस्यपूर्ण प्रक्रिया या सगळ्या मुलाखतींमधून समोर आली होती. मुलाखती घेण्यात आलेल्या सर्व मुस्लिम स्थलांतरित घरगुती कामगारांकडे अशा स्वरूपाच्या कथा होत्या आणि त्यांचा अधिक तपशीलवार अभ्यास करणे शक्य आहे. एखाद्या विशिष्ट समाजाचा कामगार दुसऱ्या सांस्कृतिक समाजातील नाव लावत असल्याचे दिसून आले. या प्रक्रियेलाच नाव बदल प्रक्रिया असे म्हणतात. उदाहरणार्थ, एक मुस्लिम कामगार 'इशिता' हे नाव लावत होती. हे पूर्णपणे हिंदू नाव असून विशिष्ट घरांमध्ये साशंकता निर्माण होऊ नये आणि अधिक चांगला रोजगार मिळावा यासाठी ती हे करत होती. कामाच्या ठिकाणी मुस्लिम स्थलांतरित लोक हिंदू नावे वापरत असल्याची काही प्रकरणे होती. सुरुवातीला त्यांना काम मिळवण्यासाठी खूपच संघर्ष करावा लागला होता. मात्र नावे बदलल्यानंतर त्यांना झटपट आणि अधिक चांगल्या कामांची संधी मिळाली होती. काही वर्षे सातत्याने काम केल्यानंतर आणि कामाच्या ठिकाणी आदर व ओळख मिळवल्यानंतर या घरगुती कामगारांना आपली खरी ओळख देणे सहजशक्य होत होते. आपल्याला काम गमवावे लागेल अशी भीती नंतर त्यांना बाळगावी लागत नव्हती. हेसुद्धा पुन्हा एकदा प्रवेशादरम्यानच्या भेदभावाचे आणखी एक उदाहरण आहे. यावरूनही कामगारांना सांस्कृतिकदृष्ट्या अस्वस्थ वाटण्याजोग्या उपाययोजना करणे भाग पडते असे दिसून येते.

•••

# बहुजनांच्या दुरवस्थेला इंग्रजच जबाबदार असल्याचा नेमाडेंना साक्षात्कार



नागनाथ कोत्तापल्ले

भालचंद्र नेमाडे यांनी देशीवाद आकाराला येण्याचे कारण वसाहतवाद होय किंवा इंग्रजांची गुलामगिरी होय हे सांगिल्याचे यापूर्वीच निर्देशिलेले आहे. याशिवाय स्वातंत्र्यानंतर आंतरराष्ट्रीयवाद फोफावण्यासाठी तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू कसे कारण आहेत हेही पाहिलेले आहे.

मा.स. गोळवलकर लिखित 'विचारधन' या पुस्तकाचा प्रारंभच मुळी आंतरराष्ट्रीय वादापासून होतो. आंतरराष्ट्रीय असणे अत्यंत धोकादायक आहे, असे श्रीगुरूजींना वाटते. ते म्हणतात –

''आजकाल आपल्या देशातील अनेक लोकांना असे वाटते की, आपण जे कोणते कार्य हाती घेऊ ते देश, धर्म, जात आदी संकुचित मर्यादा ओलांडून संपूर्ण विश्वाला व्यापक करणारे आणि समस्त मानवजातीचे हित साधणारे असले पाहिजे. आपल्या या विचारांच्या समर्थनार्थ त्यांच्यापैकी काही जण असे प्रतिपादन करतात की, रॉकेट व क्षेपणास्त्रांच्या आजच्या युगात अंतर नावाची वस्तूच राहिली नाही; देशाच्या सीमा हा शब्दप्रयोग आता अर्थविहीन झाला आहे. ... त्यांच्या या विचारातून व प्रतिपादनातून ओघानेच निघणारा निष्कर्ष असा की, आंतरराष्ट्रीय भूमिकेतून विचार करणारे जे आधुनिक वाद आहेत, केवळ त्यांच्या आधारेच जागतिक ऐक्याचे उद्दिष्ट साध्य होईल.

अशा परिस्थितीत आपल्यासमोर स्वाभाविकपणेच असा प्रश्न उभा राहतो की, हिंदूचे राष्ट्रीय जीवन सुसंघटित करण्याचे जे कार्य राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने हाती घेतले आहे, ते जागतिक ऐक्य आणि संपूर्ण भानवजातीचे हित या भावनांशी कितपत सुसंगत आहे?

एक गोष्ट सुरुवातीलाच स्पष्ट केली पाहिजे की, आधुनिक विचारवंत हेच काही जागतिक ऐक्य व विश्वकल्याण या भूमिकेतून विचार करणारे पहिले विचारवंत नव्हते. फार प्राचीन काळी म्हणजे आजच्या तथाकथित युगाचा उदय होण्यापूर्वीही कितीतरी काळ आधी, आपल्या या भूमीतील द्रष्ट्या ऋषीमुनींनी असा विचार केला.'' (विचारधन, प्रकरण १, पृ-३).

'विचारधन' आणि 'देशीवादा' वरील नेमाडे यांचे लेखन यात किती साम्य आहे पहा. विचारधनाचा प्रारंभ जसा आंतरराष्ट्रीयत्वाने होतो आहे, तसाच देशीवादावरील लेखाचा प्रारंभही आंतरराष्ट्रीयत्वाच्या मुद्याने होतो आहे. देशीवादावरील लेखात 'कित्येक मराठी विद्वान आणि साहित्यिक' असा मोघम उल्लेख येतो. उपरोक्त उताऱ्यातही 'अनेक लोक' असा मोघम उल्लेख केला आहे. दुसरी गोष्ट म्हणजे, आंतरराष्ट्रीय पातळीवरून विचार करण्याला दोन्ही ठिकाणी विरोध करण्यात आलेला आहे. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे, नेमाडे ज्या आधुनिकतेला कडोनिकडीचा विरोध करीत आहेत, त्याचा उगमही येथे आहे. या संदर्भातील दोन्ही परिच्छेदांची तुलना केल्यास अधिक बरे होईल. भालचंद्र नेमाडे भारतीय ऋषीमुनींचा उल्लेख करीत नसले तरी भारतीय परंपरा, हिंदुत्व या गोष्टी त्यांच्या लेखनामध्ये येतातच.

'विचारधन'मध्ये आणखी काही ठिकाणी आंतरराष्ट्रीयत्वाचा उल्लेख येतो. 'विचारधन'मध्येच पुढे म्हटले आहे –

'आंतरराष्ट्रीयता', 'जागतिक ऐक्य' आदी कल्पनांच्या नशेत आपला देश कोणत्या हास्यास्पद आणि भयानक अवस्थेकडे वाहवत चालला आहे त्याचे हे चित्र आहे. या घोषणांनी आपण इतके बेहोष होऊन गेलो आहोत की, 'जागतिक शांतता', 'आंतरराष्ट्रीय एकता' यांसारखे मुखवटे धारण केलेल्या परकीय राष्ट्रांचे आक्रमक हेतू आपल्या ध्यानातच येत नाहीत. (विचारधन- पृ. २४१)

अर्थात, या आंतरराष्ट्रीयत्वाच्या विचारामागे कोण आहे, याचा निर्देश म.सा. गोळवलकर करीत नाहीत; परंतु या ग्रंथाला प्रस्तावना लिहिणाऱ्या एम.ए. व्यंकटराव यांनी मात्र नेहरूंना दोष दिला आहे. ते लिहितात –

''खुद्द महात्मा गांधींनीही आपला राजकीय वारस म्हणून कोणाची निवड केली? तर मानव, राष्ट्र आणि परमेश्वर या संबंधीच्या त्यांच्या विचारांशी ज्यांच्या विचारांचे यत्किंचितही साम्य नव्हते अशा जवाहरलाल नेहरूंची. नेहरूंच्या मनाची जडणघडण बव्हंशी परदेशात झालेली आहे. त्यांनी 'डिस्कव्हरी ऑफ इंडिया' हा ग्रंथ लिहिला असला तरी भारतीय संस्कृतीच्या उज्ज्वल स्वरूपाचे मर्म त्यांना कधीही आकलन झाले नाही. त्यामुळेच पंतप्रधान आणि राष्ट्राच्या पुनरूज्जीवन कार्याचे नेतृत्व करणारी व्यक्ती या नात्याने स्वतंत्र भारताच्या नवरचनेचा जो आराखडा आपल्या डोळ्यांसमोर ठेवला, तो 'समाजवादी समाजरचनेचा'. आपल्या येथील प्राचीन मूलभूत जीवनदर्शांच्या संदर्भात विचार करता ही समाजरचना अतिशय संदिग्ध, अनावश्यक गोष्टींची गर्दी असलेली, यंत्रासारखी

निर्जीव व अखंड वर्गविग्रहाला आमंत्रण देणारी आहे.'' (विचारधन, दु.आ. १९८०, प्रस्तावना, पृ. १०)

पंडित जवाहरलाल नेहरू यांना कशासाठी विरोध याच्या कारणाची नोंद येथे स्पष्टपणे करण्यात आलेली आहे. नेहरूंना 'येथील प्राचीन जीवनादर्श' कळत नव्हते, हे एक कारण ते देतात. दुसरे कारण अधिक महत्त्वाचे आहे. ते म्हणजे, 'समाजवादी समाजरचना' सर्वसामान्य माणसाच्या पदरात काही पडावे असे वाटत असेल तर समाजवादी समाजरचना आवश्यक आहे, हे जगभर मान्य झालेले तत्त्व आहे. म्हणजे गोळवलकर, एम.ए. राव आणि भालचंद्र नेमाडे यांचा नेहरूविरोध कशासाठी ते आता स्पष्ट झाले आहे. आधुनिकता, व्यापक आंतरराष्ट्रीय दृष्टिकोन आणि समाजवादी समाजरचना या तीन गोष्टी आहेत. आता भारतातील जनसामान्यांनी, लेखक-कलावंतांनी स्वतःच्या सद्सद्विवेकबुद्धीला स्मरून निर्णय घ्यायचा आहे की उपरोक्त गोष्टींनी आमचे जीवन बदलले आहे की नाही? उपरोक्त गोष्टी महत्त्वाच्या आहेत की नाहीत? - निदान नेमाडे समर्थक तरी आपली सद्सद्विवेकबुद्धी जागवतील, असे वाटत नाही! सरसंघचालक मा.स. गोळवलकर यांच्या 'विचारधन' या पुस्तकातील दुसरे प्रकरण आणि भालचंद्र नेमाडे यांचा 'देशीवादा'वरील तो 'सुप्रसिद्ध' लेख यांच्यामध्ये आणखीही काही साम्यस्थळे आहेत. त्यांचा निर्देश करणे उचित होईल, असे वाटते.

अमेरिकन राष्ट्राचा जन्म कसा झाला हे सांगताना युरोपियन लोकांनी तेथील मूळच्या रेड इंडियन लोकांचा छळ केला, हे मा.स. गोळवलकर सांगतात. खरं म्हणजे, जेव्हा एखादी आक्रमक शक्ती दुसऱ्या ठिकाणी जाते, तेव्हा सत्ताप्रस्थापनेसाठी तेथील लोकांचा छळ करतेच. भारतामध्ये जेव्हा आर्य आले, तेव्हा त्यांनी अनार्यांना नेस्तनाबूत केले नाही का? त्यांना देशोधडीला लावले नाही का? परंतु त्यांच्याकडे लक्ष जाऊच नये अशा पद्धतीने ते अमेरिकेचे उदाहरण देतात. ते म्हणतात, ''अमेरिकन राष्ट्राच्या जन्माचा इतिहास हे अशा अमानुषतेचे ढळढळीत उदाहरण आहे. भौतिक समृद्धीच्या आणि सुखाच्या शोधात युरोपातील विविध देशांचे लोक त्या खंडात गेले आणि तेथे त्यांनी आपल्या वसाहती स्थापन करण्याचा सपाटा सुरू केला. हळूहळू त्यांनी तेथील मूळ रहिवाशांना नष्ट करून टाकले. या तथाकथित गोऱ्या लोकांनी त्या लोकांवर केलेल्या अमानुषी अत्याचारांची आणि वंशविच्छेदनाची वर्णने वाचून अंगावर शहारे येतात. तेथील मूळच्या रेड इंडियन रहिवाशांपैकी जे थोडे अजूनही कसेबसे जिवंत राहिले आहेत! तेथील मूळ रहिवाशांवर अशाच प्रकारचे अत्याचार केले आहेत.'' (पृ. १३, विचारधन)

आपण आपल्या देशातील अस्पृश्यांना अगदी इंग्रज आल्यावरही कसे वागवले ते न सांगता गोळवलकर एकदम रेड इंडियनांकडे जातात. नेमके नेमाडेही तेच करीत आहेत. ते रेड इंडियनांचा देशीवाद सांगताना म्हणतात, '' अमेरिकेत तर बाहेरून म्हणजे प्रायः युरोपातून आलेल्या उपऱ्या गोऱ्या लोकांनी अमेरिकेतल्या मूळच्या संस्कृतीचा नायनाट केल्यामुळे आता देशीवाद म्हणजे...'' (टीकास्वयंवर, पृ. ८१)

''.... म्हणजे अमेरिकेतल्या पंचमहाभूतांना पूजणाऱ्या रेड इंडियनांना महत्त्व द्यावे की आपल्या देदीप्यमान शास्त्रीय प्रगतीने तीच पंचमहाभूते पादाक्रांत करणाऱ्या युरोपी गोऱ्या लोकांचे कौतुक करावे? ... वाजवणारा फाटका गुराखी कुठे!'' (टीकास्वयंवर, पृ. ८४)

येथे युरोपियन गोऱ्या लोकांबद्दलची भूमिका सारखीच आणि सारखीच उदाहरणे देऊन व्यक्त केली जात आहे. गोळवलकर आपल्या विवेचनात 'वंशविच्छेदन' असा शब्द वापरतात. थोडा बदल करून तोच शब्द भालचंद्र नेमाडे यांनाही वापरावासा वाटलेला आहे. हा काही निव्वळ योगायोग आहे, असे म्हणणारा भाबडाच असला पाहिजे. भालचंद्र नेमाडे म्हणतात, ''हिंदुस्थानात पुरातनकाळी जनच्छेद झाल्याच्या खुणा इतिहास पुराणात आढळतात. त्याहूनही भयंकर पर्याय म्हणून एखाद्या वंशाच्या लोकांना जन्मानेच दास ठरवून किंवा अस्पृश्यतेचा अदृश्य तुरूंगच उभारून गुलामीचे जिणेही लादलेले दिसते.'' (टीकास्वयंवर, पृ. ८१)

असा जनच्छेदाचा नेमाडे उल्लेख करतात, अस्पृश्यतेचा उल्लेख करतात आणि याच परिच्छेदाच्या शेवटी भारतीय माणसाला जात आणि प्रदेश या अक्षांश-रेखांशावर मानाने जगता येते असे म्हणतात. या साऱ्या विवेचनात काही संगती आहे, असे म्हणता येईल का? इतिहासामध्ये नेमके काय घडले याची संगती लावण्याची इच्छा नेमाडेंना होत नाही. ती का होत नाही आणि पुन्हा जातीचेच संवर्धन झाले पाहिजे असे ते का म्हणतात, ते काहीच कळत नाही. किंबहुना त्यांना सोयीचे ते ते महत्त्वाचे, असे त्यांना वाटत असले पाहिजे!

या देशामध्ये मध्ययुगापासून स्पष्टपणे जात आणि कूळ या दोन्ही गोष्टींमुळे माणसाचा कोंडमारा होत होता, याचे स्पष्ट उल्लेख संत साहित्यात सापडतात; परंतु जात, व्यवसाय आणि उपजीविका यांची एक अतूट मोट बांधली गेली होती. त्यापासून सुटका होणे शक्य नव्हते. मुस्लिम राजवटीनेही या व्यवस्थेला स्पर्श केला नाही; परंतु या देशात इंग्रज आले आणि या स्थिर व्यवस्थेमध्ये हालचाल सुरू झाली. इंग्रजांच्या पाठोपाठ येथे हळूहळू औद्योगिकीकरण आले म्हणजे यंत्रयुग आले. मुंबई आणि सुरत येथे कापडाचे कारखाने सुरू झाले. भारतभर रेल्वेचे जाळे टाकण्याच्या कामास प्रारंभ झाला. म्हणजे प्रवास सुकर झाला. औद्योगिकीकरणामुळे रोजगार बदलणे शक्य झाले. याशिवाय इंग्रज सरकारने दोन गोष्टी फार महत्त्वाच्या केल्या. एक म्हणजे सर्वांना सार्वत्रिक आणि खुले शिक्षण दिले. विशेष म्हणजे, या शिक्षणामध्ये गणित, विज्ञान असे विषयही शिकविले जाऊ लागले. शिवाय हळूहळू तंत्रशिक्षण, अभियांत्रिकी आणि वैद्यकीय या ज्ञानशाखांचेही शिक्षण सुरू झाले. तीन विद्यापीठांची निर्मिती करण्यात आली.

दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे, स्वतंत्र अशी न्यायव्यवस्था निर्माण करण्यात आली. पूर्वी एक तर जातपंचायती न्याय देण्याचे कार्य करीत तसेच 'मनुस्मृती'च्या आधारे न्याय दिला जात असे. 'मनुस्मृती'मध्ये जातीप्रमाणे शिक्षा सांगितलेल्या आहेत. किंबहुना संपूर्ण जीवनाचाच आधार मनुस्मृती होती. म्हणजे कोणत्या

जातीला कोणते अधिकार असतील, तसेच त्यांनी कसे राहावे हे मनुस्मृतीप्रमाणे ठरे. आता इंग्रजांनी गुन्हा कोणीही केलेला असो, त्यास गुन्ह्याप्रमाणे शिक्षा असे धोरण अवलंबिले. क्वचित इंग्रज माणसाकडे ही न्यायव्यवस्था सहानुभूतीचे धोरण बाळगे, नाही असे नाही; परंतु हा अपवाद झाला; परंतु न्यायासनासमोर सर्व सारखे असतील हे महत्त्वाचे तत्त्व स्वीकारण्यात आले.

इतरही अनेक गोष्टी इंग्रज राजवटीने केल्या; परंतु या दोन महत्त्वाच्या गोष्टी होत. त्यामुळे भारतीय समाजात सर्वच गोष्टींचा पुनर्विचार सुरू झाला. धर्माचाही पुनर्विचार सुरू झाला. कर्मकांडांची निरर्थकता जाणवू लागली आणि यातून धर्मविषयक आणि सामाजिक चळवळी सुरू झाल्या. मध्ययुगातून आपला देश आधुनिक युगात आला. इंग्रजांचे शोषण आणि गुलामगिरी या दोन गोष्टी मान्य करूनही त्यांच्यामुळे आपला देश बदलला, हे मान्य करावे लागते. आपल्या देशाचा फार पूर्वीपासून परदेशाशी व्यापार होता हे मान्य करूनही इंग्रजांच्या काळात प्रथमतः आपला देश जागतिक नकाशावर आला. त्याला एक आंतरराष्ट्रीय परिमाण प्राप्त झाले. म्हणून नेमाडे (आणि गोळवलकर) या आंतरराष्ट्रीयत्वाचा विचार करतात. या आंतरराष्ट्रीयत्वामुळे आमच्या समाजजीवनात काय झाले ते सांगतात; परंतु जमेच्या बाजू मात्र सांगत नाहीत.

म्हणूनच आंतरराष्ट्रीयतेच्या मुद्द्याला स्पर्श करतानाच इंग्रज, इंग्रज राजवट, इंग्रजी आणि इंग्रजांनी सुरू केलेल्या व्यवस्था यांचा विचार करावाच लागतो.

साधारणतः या देशात जे जे काही वाईट झाले, मग ती कुठलीही गोष्ट असो, ती इंग्रजांमुळे झाली असा एक सूर भालचंद्र नेमाडे यांचा आहे. जणू या देशातील जातिव्यवस्था, अस्पृश्यता, हिंदू-मुस्लिम प्रश्न, एवढेच काय बहुजनांची दुःस्थिती यासाठी केवळ इंग्रजच कारण आहेत, त्यांनीच जातीय तेढ निर्माण केली इत्यादी. आता नेमाडेंच्याच भाषेत सांगायचे तर ''बाबा रे, येथे शतकानुशतके भेद होते, क्रूर वागणूक होती, बौद्धांचे शिरकाणही येथे झाले. त्याही फार आधी काय काय घडले.... नुसते इंग्रजांना दोष देऊन भागणार नाही.''

आता भालचंद्र नेमाडे यांचे इंग्रजांबद्दलचे आकलन त्यांच्या समीक्षासदृश्य लेखनात कोठे कोठे आले आहे, ते प्रामुख्याने भारतीयांच्या इंग्रजी लेखनाच्या अनुषंगाने. इंग्रजीमध्ये लेखन करणाऱ्या भारतीय लेखकांना ते उपहासाने 'टेम्पेस्ट' नाटकातल्या कॅलिबनची उपमा देतात. हे ''धूर्त हिंदू कॅलिबन धडाक्याने इंग्रजी शिकून-बोलून-लिहून द्विभाषिक होऊ लागले. हे हिंदू कॅलिबन त्या परभाषेत पंडित म्हणून मिरवू लागले'' (टीकास्वयंवर, पृ. ४७) असे लिहितात. खरे म्हणजे भालचंद्र नेमाडे यांना माहीत असेल की, शिक्षणाचा जेव्हा इंग्रजांनी प्रारंभ केला तेव्हा त्यांनी तेथील प्रादेशिक भाषांमध्ये शिक्षण देण्याचे धोरण अवलंबिले होते. त्यासाठी प्रादेशिक भाषांमधून शास्त्रावरील व गणितावरील उत्तमोत्तम पुस्तके निर्माण झालेली होती. मराठीतही अशी पुस्तके निर्माण झालेली होती. त्या निमित्ताने खूप पारिभाषिक शब्दही निर्माण झाले होते; परंतु पुढे पुढे भारतीयांनीच इंग्रजीची मागणी केली. उदाहरणार्थ, राजा राममोहन रॉय यासारख्या समाजसुधारकाने इंग्रजी शिक्षणाची मागणी केलेली होती, असे दिसते. त्यामुळे ''युरोपियन-अमेरिकन मिशनऱ्यांनी आणि इंग्रजी साम्राज्याचा पाया रोवणाऱ्या बेथेमच्या तत्त्वज्ञानाने भारलेल्या कंपनीच्या अधिकाऱ्यांनी परोपकार म्हणून हिंदी लोकांना इंग्रजी शिक्षण देणे सुरू केले.'' (टीकास्वयंवर, पृ. ४७) हे नेमाडेंचे म्हणणे सपशेल खोटे ठरते आणि परोपकार म्हणायचे तर इंग्रजांनी सार्वजनिक खुली शिक्षण व्यवस्था सुरू केली. हे भारतीयांवरील परोपकार आहेतच. म्हणून तर महात्मा फुले यांनी इंग्रज आहेत तोपर्यंत शिकून घ्या, असा बहुजन समाजाला उपदेश केलेला होता.

मेकॉले यांच्यामुळे येथे शिक्षण सुरू झाले. त्याबद्दल नेमाडे म्हणतात, ''आपण इंग्रजी राज्यकर्ते आणि या आपल्या करोडो प्रजाजनांमध्ये दुभाष्यांची भूमिका करणारा एक मधला वर्ग तयार करणे एवढेच शिक्षणाचे कार्य उरले. साहजिकच भाषा घोकून हा वर्ग तयार होऊ लागला. हिंदुस्थानात धंदे, शिक्षण इत्यादी नकोच होते. देशी भाषा समृद्ध करून त्याच्यातून करोडो लोकांची ज्ञानसंवर्धनाची सोय करण्याची गरज वाटेनाशी झाली... फार काय स्वातंत्र्य मिळाल्यावरही देशी भाषा हा नियोजनाचा विषय होऊ शकतो, याची आपल्या कोणत्याच सरकारला कल्पना नाही. इस्त्रायल, रशिया, अमेरिका यांची उदाहरणे कोणी समोर ठेवली नाहीत.'' (टीकास्वयंवर, पृ. ४८)

स्वातंत्र्यानंतर जे व्हायला पाहिजे होते, असे नेमाडे म्हणतात, तो मुद्दा महत्त्वाचा आहे; परंतु ते का होऊ शकले नाही याचाही गंभीरपणे विचार करावा लागेल. हा मुद्दा बाजूला ठेवला तरी वेगवेगळ्या विज्ञान विषयांचा समावेश इंग्रजांनी आपल्या शालेय शिक्षणात काय फक्त दुभाष्ये निर्माण करण्यासाठी केला? ऐतिहासिकदृष्ट्या नेमाडे यांचे म्हणणे टिकणारे नाही. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे, तंत्रशिक्षण, वैद्यकीय शिक्षणही इंग्रजांनी सुरू केले होते, याकडे भालचंद्र नेमाडे पूर्ण दुर्लक्ष करतात. शिवाय मेकॉलेवर हिंदुत्ववादी जे आरोप करतात, तेच मुळात कसे गैरसमजावर आधारित आहेत, हे रावसाहेब कसबे यांनी त्यांच्या 'देशीवाद : समज आणि साहित्य' या ग्रंथात सांगितले आहे. त्याची येथे पुनरावृत्ती करण्याचे कारण नाही. इंग्रजांनी शिक्षण व्यवस्था सुरू करून येथील स्वत्वाला मारून टाकले असा त्यांचा एकूण सूर आहे. येथील जातीय भावनांच्यामागेही इंग्रजच आहेत, असेही ते सांगतात. विशेषतः जनगणमधून जाती पक्क्या झाल्या, असे त्यांचे म्हणणे असते. पूर्वी मराठा नव्हतेच, इंग्रजांमुळे मराठा जात अस्तित्वात आली, हा जावईशोधही त्यांनी त्यामुळेच लावलेला आहे. याचे विवेचन अन्यत्र केलेले आहेच. एकूण काय की, भारतीयांच्या अंगभूत दोषांनाही इंग्रजच कारण आहेत तर! नेमका हाच मा.स. गोळवलकर यांचा दृष्टिकोन आहे. तो त्यांच्या 'विचारधन'मध्ये अनेक ठिकाणी व्यक्त झाला आहे. ''त्यानंतर इंग्रज आले. ते अधिक धूर्त आणि मायावी होते. उघडपणे विध्वंसक व अत्याचारी कृत्ये करण्याऐवजी त्यांनी आपल्या कावेबाज प्रचाराने राष्ट्राची पुरातन श्रद्धास्थाने व एकता यांनाच सुरूंग लावण्याचं कार्य सुरू केलं. त्यांनी एक विशेष प्रकारची शिक्षणपद्धती येथे रूढ केली.

•••

# अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या लढाईतील महायोद्धा

✍ प्रकाश खंडेलोटे



अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या रक्षणासाठी उघड भूमिका घेत सत्तेविरूद्धही बंडखोर विचार मांडणारे ज्येष्ठ अभिनेते, साहित्यिक, चित्रपट आणि नाट्यकलावंत गिरीश कर्नाड यांनी अलीकडेच इहलोकीची यात्रा संपवली. त्यांची ही 'एक्झिट' कोणत्याही सहृदयी माणसाच्या जीवाला हुरहूर लावणारी आहे. स्वतंत्र प्रज्ञेचे चिंतनशील आणि प्रयोगशील लेखक, दिग्दर्शक आणि हरहुन्नरी कलावंत गिरीश कर्नाड यांनी चित्रपट आणि नाट्यसृष्टीबरोबरच दूरदर्शनच्या छोट्या पडद्यावरही आपल्या सृजनशील प्रतिभेचा अमिट ठसा उमटवला होता.

गिरीश कर्नाड यांचा जन्म १९३८ साली महाराष्ट्रात माथेरान इथं झाला. त्यांची आई कृष्णाबाई मानकीकर ही एका मुलासह तरूण विधवा होती. ती परिचारिकेचं प्रशिक्षण घेत असताना बॉम्बे मेडिकल सर्व्हिसेसमध्ये कार्यरत असलेल्या डॉ. रघुनाथ कर्नाड यांच्याशी तिची भेट झाली. विधवा पुनर्विवाहास त्यावेळी मान्यता नसल्यामुळे या दोघांना ५ वर्षे लग्न करता आलं नव्हतं. शेवटी आर्य समाजाच्या अनुमतीने त्यांचं लग्न झाले. कृष्णाबाई आणि डॉ. रघुनाथ कर्नाड यांना चार मुलं झाली. त्यापैकी गिरीश हे तिसरे आपत्य होत.

गिरीश कर्नाड हे मद्रासमध्ये ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेसमध्ये काम करत असताना त्यांची सरस्वती गणपती यांच्याशी एका समारंभात भेट झाली होती. त्यांनी लग्नाचा निर्णय घेतला; परंतु लग्नाची औपचारिकता पूर्ण करण्यासाठी त्यांना १० वर्षे लागली. ४२ व्या वर्षी गिरीश कर्नाड यांचा विवाह झाला. त्यांना पत्रकार मुलगा रघू कर्नाड आणि मुलगी राधा अशी दोन मुले आहेत. गिरीश कर्नाड यांचे शालेय शिक्षण पुण्यात झालेले असले तरी त्यांची पुढची कारकीर्द मात्र बंगळूर आणि धारवाडमध्येच बहरली. असिम प्रतिभेच्या या कलासक्त भाष्यकाराने नाट्यलेखन, अभिनय, ललित लेखन अशा विविध क्षेत्रात वावरतानाच परखड विचारवंत आणि अजोड चित्रपट दिग्दर्शक अशा भूमिकाही तेवढ्याच तन्मयतेने पार पाडल्या. कर्नाटक विद्यापीठांतर्गत धारवाड इथल्या कर्नाटक कला महाविद्यालयातून १९५८ मध्ये त्यांनी पदवी मिळवली. त्यानंतर ते पुढील शिक्षणासाठी इंग्लंडमध्ये गेले. ऑक्सफर्ड इथल्या मॅग्डॅलेन कॉलेजमधून तत्त्वज्ञान, राजकारण आणि अर्थशास्त्रात पदव्युत्तर पदवी त्यांनी प्राप्त केली. त्यानंतर तत्कालीन मद्रासमध्ये (आताचे चेन्नई) ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेसमध्ये नोकरी पत्करली. त्यावेळी त्यांना त्यांच्यातला लेखक स्वस्थ बसू देत नव्हता. त्यामुळे ७ वर्षे नोकरी केल्यानंतर पूर्णवेळ लिखाणासाठी म्हणून त्यांनी नोकरीचा

## जागतिक रंगभूमीचे राजदूत

युनेस्कोच्या वतीने गिरीश कर्नाड यांची जागतिक रंगभूमीचे राजदूत म्हणून निवड करण्यात आली होती. ते १९७४ ते १९७५ या काळात पुण्यातील भारतीय चित्रपट आणि दूरदर्शन संस्थेच्या संचालकपदी कार्यरत होते. १९७६ ते १९७८ दरम्यान ते कर्नाटक साहित्य अकादमीचे अध्यक्ष होते. १९८८ ते १९९३ अशी पाच वर्षे त्यांनी नाटक अकादमीचे सभापती म्हणून काम पाहिले. त्यांना कर्नाटक विद्यापीठाने डॉक्टरेट देऊन सन्मानित केले होते.

# पुरस्कार आणि सन्मान

गिरीश कर्नाड यांना वाङ्मय, सिनेमा आणि इतर अनेक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्यासाठी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले होते. साहित्य क्षेत्रातील कामगिरीबद्दल १९७२ मध्ये संगीत नाटक अकादमी पुरस्कार, १९७४ मध्ये पद्मश्री, १९९२ मध्ये पद्मविभूषण तर १९९४ मध्ये त्यांना साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला. आतापर्यंत कन्नड साहित्यासाठी ज्या सात लेखकांना ज्ञानपीठ पुरस्कार प्रदान करण्यात आला त्यात गिरीश कर्नाड हे हा पुरस्कार मिळवणारे (१९९८) सहावे लेखक होते. याच वर्षी त्यांना कालिदास सन्मान प्राप्त झाला. राज्योत्सव पुरस्कारानेही त्यांना गौरवण्यात आले. २०११ मध्ये लॉस एंजेलिस येथील दक्षिण कॅलिफोर्निया विद्यापीठातर्फे त्यांना मानद पदवी प्रदान करण्यात आली. सिनेमाक्षेत्रातील कामगिरीबद्दल त्यांना १९७१ ते १९९९ दरम्यान १० राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार मिळाले. त्याचबरोबर ४ फिल्मफेअर पुरस्कानेही त्यांना सन्मानित करण्यात आले. गोधुली, आशा आणि तेरी कसम या तीन हिंदी चित्रपटातील कामगिरीबद्दलही त्यांना गौरविण्यात आले. त्याचबरोबर त्यांना पाच वेळा कर्नाटक राज्य चित्रपट पुरस्कार देण्यात आले. नाट्यक्षेत्रातील कामगिरीबद्दल गुब्बी विराना पुरस्कार देऊन त्यांना गौरविण्यात आले. टाटा लिटरेचर लाईव्हचा जीवनगौरव पुरस्कार तसेच इतर अनेक पुरस्कारांनी या गुणी कलावंतांचा सन्मान करण्यात आला होता.



**टाटा लिटरेचर लाईव्हचा जीवनगौरव पुरस्कार स्वीकारताना गिरीश कर्नाड**

राजीनामा दिला. त्यावेळी मद्रासमधल्या 'द मद्रास प्लेअर्स' या स्थानिक हौशी थिएटर ग्रुपमध्ये ते सहभागी झाले. १९८७ ते ८८ हे एक वर्ष त्यांनी शिकागो विद्यापीठात व्हिजीटिंग प्रोफेसर म्हणून काम केलं. याच काळात ते नाट्यलेखन करत होते. त्यांच्या शिकागो इथल्या वास्तव्यात नागमंडल या मूळ कन्नड नाटकाच्या कर्नाड यांनी केलेल्या इंग्रजी भाषांतराचा वर्ल्ड प्रिमियर शो अमेरिकेतल्याच मिन्नियापोलिस शहरातील एका थिएटरमध्ये झाला होता.

वयाच्या २३ व्या वर्षी त्यांनी लिहिलेलं ययाती हे नाटक प्रचंड गाजलं. बहुभाषिक व्यक्तिमत्व लाभलेल्या कर्नाड यांची नाटकं मराठी, इंग्रजी, हिंदीसह अनेक भाषांमध्ये अनुवादित झाली आहेत. ययाती, हयवदन, नागमंडल यांसारख्या त्यांच्या नाटकांची खूप चर्चा झाली. रंगभूमीवर १९६४ साली आलेल्या तुघलक नाटकाने त्यांचे नाव देशभर गाजले. पौराणिक आणि ऐतिहासिक कथानकांवर आधारित नाटकांमधून समकालीन वास्तवाचे दर्शन घडवणारे नाटककार अशी विशेष मुद्रा गिरीश कर्नाड यांनी भारतीय रंगभूमीवर उमटवली होती.

गिरीश कर्नाड यांची अनेक नाटकं भारतीय मिथकांवर असली तरी ती कालसुसंगत राहिली आहेत. कलाकृतीमधून एखादा विचार मांडायला ते कधीही घाबरले नाहीत. त्यांनी स्वतःचे अभिव्यक्ती स्वातंत्र्य कायम जपले. लोकशाहीचे हे मुल्य त्यांनी वारंवार सिद्ध करून दाखवले.

यू.आर.अनंतमूर्ती यांच्या कादंबरीवर आधारित संस्कार चित्रपटातून अभिनयास प्रारंभ केलेल्या कर्नाड यांनी श्याम बेनेगल दिग्दर्शित निशांत, मंथन या चित्रपटांमध्येही भूमिका केल्या. उंबरठा या मराठी चित्रपटात त्यांनी केलेली भूमिका अविस्मरणीय ठरली. एक था टायगर आणि टायगर जिंदा है या चित्रपटातील त्यांच्या भूमिकाही गाजल्या. वंशवृक्षद्वारे त्यांनी दिग्दर्शन क्षेत्रात पाऊल टाकले. चार कन्नड चित्रपटांसह उत्सव आणि गोधुली या हिंदी चित्रपटांचे दिग्दर्शनही त्यांनी केले.

त्यांची भूमिका असलेली दूरदर्शनवरील मालगुडी डेज ही मालिका प्रेक्षकांनी डोक्यावर घेतली होती. त्यांच्या 'आडाडता आयुष्य' या कन्नड भाषेतील आत्मचरित्राचा 'खेळता-खेळता आयुष्य' हा मराठी अनुवाद खूप गाजला. नाटक, कला, साहित्य अशा सर्वच क्षेत्रात बहुमोल योगदान दिलेल्या या कलावंताने विचारस्वातंत्र्य जपण्यासाठी वेळोवेळी कणखर भूमिका घेऊन आपण बिनकण्याचे कलाकार नसल्याचे दाखवून दिले. एक यशस्वी कलावंत, साहित्यिक म्हणून विशिष्ट उंची प्रस्थापित करूनही त्यांचे पाय जमिनीवर राहिले. नवीन नाटककारांना सहकार्यासाठी सदोदीत तयार असणारा कलावंत असा त्यांचा लौकीक होता.

चांगल्या विचारांना प्रवृत्त करणारा पारदर्शक व्यक्तिमत्वाचा आणि अतिशय समृद्ध दृष्टी लाभलेला हा कलावंत होता. आधुनिकतेचा आणि विचार स्वातंत्र्याचा प्रवक्ता असलेला हा कलावंत म्हणूनच भारतीय रंगभूमीवरील आंतरराष्ट्रीय ख्यातीचा एकमेव कलाकार ठरला. अभिव्यक्ती स्वातंत्र्यांच्या लढाईतील या महायोद्ध्यास भावपूर्ण श्रद्धांजली.

•••


ग्रंथ परिचय

# समाजभानी विज्ञान कथा



मिलिंद कसबे

डॉ.संजय ढोले यांचा ‘डिंभक’ हा कथासंग्रह म्हणजे मानवी जीवनात वास्तव आणि कल्पना यांच्या सीमारेषेवर उभ्या असलेल्या मनाचे सुंदर आणि अद्‌भूत खेळ टिपणारा आहे. डॉ. ढोले हे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात प्राध्यापक आहेत. आंतरराष्ट्रीय स्तरावर त्यांचे विज्ञान संशोधन नावाजलेले आहे. त्यांनी शेकडोहून अधिक विज्ञानकथा लिहिल्या आहेत. मराठी साहित्यात विज्ञान कथा लेखक म्हणून ते सर्वपरिचित आहेत. ‘प्रेमाचा रेणू’,’ अश्मजीव’,’ संकरित’ हे त्यांचे विज्ञान कथासंग्रह प्रसिद्ध आहेत.




वास्तव आणि कल्पना यांच्यातल्या ऊन सावलीच्या खेळात माणसाच्या मनातली आंदोलने कसे हिंदोळत असतात याचा प्रत्यय डॉ. ढोले यांच्या या संग्रहातील कथा वाचताना येतो.

मानवी मनाला काही प्रश्नांनी सतत भुरळ घातली आहे. मृत्यूबद्दल माणसाच्या कल्पना एकीकडे वास्तवाचे बोट धरून निघालेल्या असतात हे खरे आहे; परंतु मृत्यूच्या अनामिक भीतीने त्या कधी वास्तवाचं बोट सोडून कल्पनेच्या विस्तीर्ण प्रदेशात जातात हे माणसालाही कळत नाही. आपण अमर राहावं, आपल्यापासून मृत्यूला अनंत काळ दूर कसे ठेवता येईल यासाठी तो जसा आध्यात्माचा आधार घेतो तसाच तो विज्ञानाचाही आधार घेतो. विज्ञान आणि आध्यात्म यांच्या टकरावात विज्ञान बाजी मारू शकेल, या शक्यतेवर माणूस आता उभा आहे असे दिसते. जागतिकीकरणाने माणसाच्या दैवी कल्पनांना उभा आडवा छेद दिला आहे, हे कसे नाकारता येईल?आधुनिकीकरणात उभा असलेला तंत्रज्ञानी माणूस आपल्याला जे हवं आहे ते आता आधुनिक वैज्ञानिक शोधांच्या रूपाने मिळविण्याच्या प्रयत्नात आहे, असे सूत्र डॉ. ढोले यांच्या कथांचे आहे.

मृत शरीर गोठवून ठेवायचे व नंतर वैज्ञानिक तंत्रज्ञानाच्या साह्याने हेच गोठवलेले मृतदेह नॅनो टेक्नॉलॉजीच्या सहाय्याने उपचार करून जिवंत करायचे अशा अद्‌भूत गोष्टीने या कथासंग्रहाची सुरुवात होते. नॅनो टेक्नॉलॉजी हे मानवी जीवनाला मिळालेले वरदान आहे असे जगभरातले संशोधन सांगते.आज माणसाच्या नित्याच्या भौतिक जीवनात अनेक सुखसोयी आणण्याचे काम या तंत्रज्ञानाने केले आहे. वाहन उद्योग, इलेक्ट्रॉनिक साधने, संगणक प्रणाली, वैद्यकशास्त्र यांसारख्या अनेक क्षेत्रांत या तंत्रज्ञानाने मानवी जीवनाला गतिमान आणि सुखकर केले आहे. खिडक्यांच्या काचा, अंगावरचे कपडे न धुता आपोआप स्वच्छ होतात, हा अनुभव या तंत्रज्ञानामुळे जगभरातला माणूस घेऊ लागला आहे. एकूणच काय तर माणूस या भौतिकी विज्ञानाने आमुलाग्र बदलतो आहे. जे तंत्रज्ञान भौतिक गोष्टींबद्दल उपयोगाचे आहे. तेच जर माणसाच्या पेशींवर उपयोगात आणले तर मृत माणूस जिवंत होऊ शकतो, अशा कल्पनेवर या पुस्तकाची ‘अभय’ ही पहिलीच कथा आधारलेली आहे. अर्थात हे विज्ञानाने अद्याप केलेले नाही किंवा तशी शक्यता नसली तरी डॉ. ढोले यांची ही कथा वाचकाला अचंबित करते. माणसाला मृत्यूवर मात करता येईल या कल्पनेनेच त्याला सुखावून सोडते.

‘भूतदया’ ही या संग्रहातील अशीच एक अद्‌भूत कथा आहे. डॉ. शंकर भवाने हा या कथेतील नायक आहे. विज्ञानाच्या संशोधनात झपाटलेला हा शास्त्रज्ञ मानवी प्राण्यांच्या भावभावनांवर संशोधन करत असतो. रस्त्याने अपघातात मरण पावलेल्या एका कुत्र्याच्या पिल्लाला डॉ. भवाने घरी आणतात आणि त्यांचा प्रयोग सुरू होतो. मरणावस्थेत असलेल्या रुग्णावर प्राण्यांचे अवयव रोपण करण्याचे अनेक प्रयोग करताना त्यांना समाजाच्या रोषाला सामोरे जावे लागलेले असते. डॉ. भवानेंचे आपल्या पत्नीवर अतिशय प्रेम होते. या प्रेमाखातर त्यांच्या पत्नीचे बाद झालेले हृदय त्याने जपून ठेवले. काही दिवसांपूर्वीच त्याची पत्नी हृदयविकाराने मृत्यू पावली होती. त्यानंतर त्याने पत्नीचे हृदय बदलून त्याजागी एका माकडीणीच्या हृदयाचे रोपण केले होते व पत्नीच्या मृत शरीराला अनेक उपकरणे लावून ते शीतगृहात ठेवले होते. भवानेंनी पुढच्या प्रयोगात मानवी मेंदू आणि कुत्र्याच्या मेंदूतील साम्ये शोधून काढली. कुत्र्याचा मेंदू माणसाच्या मेंदूपेक्षा खूपच प्रगत असल्याचे त्यांना दिसले. मग त्यांनी घरातील डॉली कुत्रीच्या मेंदूत त्याच्या पत्नीच्या मेंदूतील मायनस ७७ अंश तापमानित कोशात जपून ठेवलेल्या मेंदूपेशी टाकल्या आणि त्याला अचंबित करणारा परिणाम दिसला. काही दिवसातच डॉली कुत्री माणसासारखा विचार करू लागली. एके दिवशी डॉक्टर भावनेंच्या गाडीखाली डॉलीची लहान पिल्ले आली आणि त्या अपघातात ती मेली; परंतु डॉलीने मात्र डॉक्टर भावनेंलाच आपल्या पिलांच्या मृत्यूला जबाबदार धरले. अगदी माणसासारखा विचार करत तिने डॉक्टर भावनेंवर हल्ला करून त्याला ठार केले. पशू, पक्षी आणि

माणूस यांच्या नात्यांचे पुढे काय होईल याविषयी विज्ञानवेध घेत ही कथा पृथ्वीवरील जीवसृष्टीचा अन्वयार्थ लावते. या संग्रहातील ढोले यांची 'भविष्य' ही कथा तर एच.जी. वेल्स यांच्या 'द टाईम मशीन' या कादंबरीची आठवण करून देते. याशिवाय 'सोनियाची खाण' हीही त्यांची एक मजेशीर कथा आहे. सोने कुणाला नको आहे? ते सौंदर्याचं आणि श्रीमंतीचं प्रतीक आहे. माणसाला श्रीमंत होण्यासाठी प्रयोगशाळेत सोने बनवता आले तर? या प्रश्नाच्या शक्यता आणि कल्पना या दोन्ही बाजूंना कवेत घेऊन ढोले यांनी ही कथा लिहिली आहे. न्यूट्रॉन्सच्या प्रक्रियेतून शिशाच्या अणूचे सोन्यात रूपांतर करण्यात या कथेतील शास्त्रज्ञ डॉ. मानशिंदे यांना यश आले खरे; परंतु अमाप संपत्ती मिळवल्याने माणूस आतून-बाहेरून कसा पोखरतो आणि शेवटी आत्महत्येला प्रवृत्त होतो हे ही कथा सांगते.माणूस निसर्गाच्या विरोधी गेला की त्याचे जैविक आणि सामाजिक जीवनही धोक्यात येते हा संदेश ही कथा देते.

'डिंभक' ही या संग्रहातील शीर्षक कथा आहे. डी.एन.ए. संशोधनाचा अभ्यास करता करता पृथ्वीवरील सूक्ष्म अंडा कोशांसोबत आकाशातून उलकेबरोबर आलेल्या डिंभकालाही बाटलीत वाढवले असता तो डिंभक इतर डिंभकांच्या तुलनेत भराभर मोठा होतो आणि त्याच्याबरोबरच्या सजीवांसह निर्जीव वस्तूलाही खाऊ लागतो.अगदी त्याला बंदिस्त केलेल्या काचेच्या बाटलीलाही तो खातो, शेवटी त्याला पकडून बंदिस्त पेटीसह मातीत पुरण्यात कथेच्या शास्त्रज्ञ नायकाला यश येते आणि मानवी सृष्टी अबाधित राहील याचे मोठे समाधान मिळते. 'रिपोर्टर' हीही एक अचंबित करणारी कथा या संग्रहात आहे. ही कथा वाचताना वाचकांना रजनीकांतच्या रोबो सिनेमाची आठवण नक्कीच येईल. मानवी क्लोन शक्य आहे का आणि ते शक्य झाले तर अतिरेकी त्यांना हवे ते दहशतवादी कृत्य घडवून आणण्यासाठी क्लोनिंग या अनैसर्गिक शास्त्राचा वापर करून समाजात मोठा विध्वंस घडवू शकतात याकडे लक्षवेध करते. याशिवाय 'सुगावा' ही वनस्पतींच्या भावभावना टिपणारी कथाही यात आहे. कॅन्सरसारख्या जीवघेण्या आजारावरही भविष्यात रामबाण उपाय शोधणे विज्ञानाला शक्य आहे, असा आशावाद सांगणारी ढोले यांची 'विळखा' ही कथाही मुळातून वाचण्यासारखी आहे. या संग्रहातील सगळ्याच कथा नाविन्याच्या शोधात रमणाऱ्या आणि वाचकांची उत्सुकता वाढविणाऱ्या आहेत. अचंबित करून धक्कादायक अशा काल्पनिक वळणावर नेऊन वास्तवाचा विचार करायला लावणाऱ्या आहेत.

**ढोलेंच्या लेखनाचे वेगळेपण :** विज्ञान कथालेखनाच्या वाटचालीबद्दल जगभर भरपूर लिहिले गेले आहे. इंग्रजीत जुल्स वर्न, एच.जी.वेल्स, हिंदीत अंबिका दत्त व्यास, केशव प्रसाद, राहुल सांस्कृत्यायन, माया प्रसाद त्रिपाठी तसेच मराठीत दि.बा. मोकाशी, निरंजन घाटे, जयंत नारळीकर, सुबोध जावडेकर, बाळ फोंडके, लक्ष्मण लोंढे, शुभदा गोगटे ते सुधा रिसबूड आणि डॉ. संजय ढोले यांसारख्या अनेक लेखकांच्या विज्ञान लेखनाचा उल्लेख करता येईल. जुल्स वर्न यांच्या 'Five weeks in a balloon' , 'A journey to the centre of the earth, 'Around the moon' या कादंबऱ्यांनी जशी मोहिनी घातली तशीच एच.जी. वेल्सच्या 'The Time Machine', 'The Invisible man' या जगप्रसिद्ध कादंबऱ्यांनी वाचकांना मंत्रमुग्ध केले आहे. मराठी वाचकांना तर जयंत नारळीकरांच्या 'अंतराळातील भस्मासुर', 'यक्षांची देणगी', 'टाइम मशीनची किमया', 'व्हायरस'आणि 'कृष्णविवर' या पुस्तकांनी एका वेगळ्याच विश्वात नेऊन ठेवलेले दिसते. 'सायबर कॅफे', 'चिरंजीव लोक' हे बाळ फोंडके यांचे कथासंग्रह तसेच 'भविष्यवेध', 'मृत्यूदूत' ही निरंजन घाटे यांची पुस्तके मराठी वाचकांसाठी विज्ञानाला दिसलेलं नवं जग घेऊन अवतरलेली आहेत. सुबोध जावडेकर आणि डॉ. संजय ढोले हे काहीसे वेगळे कथाकार आहेत. आधुनिक विज्ञानाच्या हाका ऐकत ऐकत जावडेकर यांची कल्पनाशक्ती जशी वेगळी आहे, तशीच संजय ढोले यांचीही कल्पनाशक्ती निराळी आहे. या संग्रहातल्या प्रत्येक कथेच्या शेवटी विज्ञानाचे बोट न सोडता जो अनपेक्षित धक्का ढोले वाचकांना देतात तो अफलातून आहे.

**प्रबोधनाच्या पाऊलखुणा.. :** विज्ञान कथा का लिहायची? आपल्या कथालेखनाचा सामाजिक अन्वयार्थ काय? आपल्या विज्ञान कथेतून सामान्य माणसाच्या मनातील अज्ञानाला सत्याकडे कसे नेता येईल? असे अनेक प्रश्न मनात घेऊन संजय ढोले यांच्या कथालेखनाचा प्रवास सुरू होतो. या अगोदरची त्यांची 'अश्मजीव' आणि 'प्रेमाचा रेणू' ही पुस्तके पाहिली तरी त्यांच्या या भूमिकेचा प्रत्यय येतो. 'डिंभक' या कथासंग्रहाने तर त्यांच्या सामाजिक भूमिका अधिक ठळक केल्या आहेत. समाजातून अंधश्रद्धा हद्दपार होवो, समाज अधिक निसर्गप्रेमी बनो, माणसाने आत्मसात केलेल्या विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा उपयोग त्याने स्वतःच्या आणि समाजाच्या भल्यासाठी करावा, तो संहारासाठी करू नये, दहशतवाद आणि जाती-धर्मांमधली जीवघेणी तेढ ही आजची मोठी समस्या आहे. यासारख्या सामाजिक प्रश्नांना विज्ञानाच्या आधारे कसे सोडवता येईल आणि विज्ञान तंत्रज्ञानाचा आधार घेऊन विध्वंसक बनू पाहणाऱ्या मानवी प्रवृत्तीला कसे थांबवता येईल? अशा अनेक प्रश्नांना हात घालण्याचे महत्त्वाचे काम हा कथासंग्रह करतो आहे. या कथा वाचताना डॉ. ढोले हे केवळ विज्ञानाच्या नजरेनेच समाजातल्या प्रश्नांकडे पहातात असे वाटत नाही तर त्यांच्या व्यक्तिमत्त्वातला विज्ञान शास्त्रज्ञ नकळतपणे समाजशास्त्रज्ञ बनून एका लढाऊ कार्यकर्त्याची भूमिका बजावतो हे त्यांच्या लेखनाचे वैशिष्ट्य आणि वेगळेपण आहे. विज्ञानाने सिद्ध केलेले वास्तव, विज्ञान विश्वाने लावलेले शोध आणि भविष्यात सिद्ध होऊ पाहणाऱ्या गोष्टी हे सारे सर्वसामान्य माणसाच्या मनात आत्मीयतेने पोहोचवण्याचे काम ढोले यांचे कथालेखन करताना दिसते.

●●●

**'डिंभक'** लेखक : डॉ. संजय ढोले
मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे (२०१९)
पृष्टे : १५४. किंमत : १९५
(विक्रीसाठी उपलब्ध : सनय प्रकाशन, शिवाजी शिंदे ९८६०४२९१३४)

# यू टू ब्रूट अनिधीबाई!



विचारांची, मूल्यांची, सामाजिक जाणिवांची तूट म्हणजे डिफिशियन्सी असूनही जिचं नाव निधी आहे तिनं थेट राष्ट्रपिता महात्मा गांधींनाच हात घातला. खरं तर, हे पेटंट हिंदुत्ववाद्यांनी केव्हापासून घेतलं आहे? गांधी हत्येनंतर पुण्यात पेढे वाटण्याचं कामही त्यांनीच केलं होतं. महात्मा गांधी पुन्हा जिवंत होतील या भयानं अस्वस्थ झालेली ही जमात पुन्हा पुन्हा गांधींना शिव्या घालते. त्यांचा द्वेष करते. पुतळा जिवंत आहे या भावनेतून पुतळ्यालाही गोळ्या घालते. त्यांना देशद्रोही ठरवते आणि त्यांची हत्या करणाऱ्या गोडसेला देशभक्त ठरवते. त्याच्यावर नाटक करते. त्याची जयंतीमयंती करते. त्याचा पुतळा बांधण्याचा संकल्प करते. एका अर्थानं ही गांधींना धमकी असते. पुतळ्यातच गप्प बसा नाही तर गोडसे येईल, असं सांगण्याचा प्रयत्न असतो. तो करणाऱ्यांच्या कळपात ही निधी चौधरी नावाची बाई कशी गेली? २०१२ ला भाजपचं सरकार नसतानाही कशी गेली आणि ज्याचा गुन्हा सिद्ध झाल्याबद्दल फाशी झाली त्या नथुरामचं अभिनंदन तिनं कसं केलं? खरं तर, प्रचंड बहुमतानं विजयी झालेल्या सरकारचं तिनं अभिनंदन करायला हवं होतं; पण मध्येच गोडसेच्या मागं राष्ट्रभक्तीचं आणि बापूजींच्या मागं ते फेल झाल्याचं प्रमाणपत्र घेऊन कसं धावली?

मुंबई महापालिकेच्या उपायुक्त पदावर असणाऱ्या आणि 'रामायण' महापालिकेतील पात्रांचा वापर करून गाजत राहणाऱ्या निधी कोणी सामान्य बाई नाहीय आणि आय.ए.एस. झालेले कधी सामान्य असतंच नाहीत. निधीच्या घरात आय.ए.एस. बहीण आहे. आय.पी.एस. भाऊ आहे. चांगले मार्क घेऊन पास होण्याची परंपरा आहे आणि आपल्या समाजात मार्कवाल्याला विद्वान म्हणण्याची एक कूपरंपरा आहे. बापूजींची १५० वी जयंती जगभर सुरू असताना त्यांच्याविषयी दोन चांगले शब्द उच्चारण्याऐवजी या निधीनं म्हणजे खरं तर अनिधीनं 'बापूजी हटाव' मोहिमेला शोभावी अशी वाक्ये तयार केली. वाक्यरचनेत आय.ए.एस.वाले तसं खूप पटाईत असतात. प्रशासकीय स्क्रिप्ट किंवा प्रशासकीय लिंग्विष्टिक म्हणतात त्याला. तसं या अनिधीनं बापूजींचा चेहरा चलनी नोटावरून हटवा, त्यांचे पुतळे हटवा, रस्ता आणि चौकाला दिलेली नावं हटवा असं म्हटलं. असं जर होत असंल तर तीच गांधींना श्रद्धांजली आणि हो धन्यवाद गोडसे. तीस जानेवारी १९४८, असं म्हटलं आहे. जेव्हा या गोष्टीला आक्षेप घेतला गेला तेव्हा ती नरमली. माझ्या ट्विटमुळे काहींचा गैरसमज झाला. माझी टाइमलाईन पाहिली की मी गांधीजींचा अनादर करू शकत नाही, स्वप्नातही नाही, अशी सारवासारव करण्याचा प्रयत्न केला. गांधीप्रेमाचं सोंग ब्यूटिपार्लरमध्ये जाऊन घेतलं. म्हणजे 'सौ चुवे खा के बिल्ली चली हज...' किंवा 'बिल्ली चले काशी' असंच म्हणावं लागेल. शासकीय अधिकारी म्हणून सवलतीच्या दरात मिळणारा चिखल एखाद्याच्या तोंडावर फेकायचा. अनवधानानं चिखल फेकला म्हणायचं आणि चेहरा साफ करण्यासाठी 'स्वच्छ भारत' अभियानांतर्गत मिळणारी गंगा डिटर्जंट पावडर वाटायची, असा हा प्रकार आहे. खरं तर, मला व्यंग करायचं होतं. म्हणजे उपरोधानं काही तरी म्हणायचं होतं, अशीही सारवासारव अनिधीनं केली. मग घटनात्मक प्रश्न निर्माण होतो आणि तो म्हणजे असा हक्क तर या बाईला कुणी दिला? आय.ए.एस. झाल्यावर असे काही अधिकार मिळतात असाही तिचा गैरसमज झाला असावा; पण हेही पटत नाही. रिझर्व्ह बँक, ऑडिट डिपार्टमेंट, सीईओ असा प्रवास करत अतिक्रमण निर्मूलन विभागात आलेल्या अनिधींना वास्तव, व्यंग, उपरोध, द्वेष, सनसनाटीपणा यातील फरक कळत नाही, असं म्हणण्याचं धाडस कोणीही करणार नाही. तुलनेनं समाजशास्त्रात मार्क कमी का पडले, असंही कोणी विचारणार नाही. बापूजींची कळ काढण्याचा प्रयत्न तिनं मुद्दामच केला. रिस्क घेऊन केला. आपण सनदी अधिकारी असतानाही हे करतोय हेही तिला ठाऊक असावंच. असणारच! मग असं ती का म्हणाली आणि ऊठसूट राष्ट्रद्रोहाचं हत्यार उपसणारं किंवा तशी तंबी देणारं सरकार गप्प का, गांधीवादी गप्प का, त्यांच्या नावानं सत्ता मिळवणारी काँग्रेस गप्प का, असे प्रश्न आहेत.

गेल्या काही दिवसांत गांधीद्वेषाची एक लाट आली. अर्थातच हिंदुत्ववाद्यांनी ती तयार केली आहे. सर्वप्रथम पांडे नावाच्या बाईनं पुतळ्याला गोळ्या घालून त्यातून खोटं रक्त बाहेर काढलं. मग प्रज्ञा साध्वी आल्या. त्यांनीही गांधींना देशद्रोही ठरवलं. मग या तिसऱ्या बाई आल्या. अनिधी! काय हा योगायोग असेल? राजकीय की धार्मिक? या साखळीत जबाबदार पदावरच्या अनिधी कशा काय शिरल्या? अनवधानानं, अज्ञानाने की जाणतेपणानं, असेही काही प्रश्न तयार होतील. शंका तयार होतील. राष्ट्राला जुळवून ठेवणारं धर्मनिरपेक्षतेचं तत्त्व सांभाळण्याची, त्याचा प्रसार करण्याची जबाबदारी ज्यांच्यावर आहे तेच जर राष्ट्रपित्याच्या खुन्याचे अभिनंदन करत असतील, धन्यवाद गोडसे म्हणत

असतील आणि नोटेवरून गांधी हटाव म्हणत असतील तर याचा अर्थ काय घ्यावा? जनतेनं भरलेल्या करातून गलेलठ्ठ पगार घेणाऱ्या पांढऱ्या हत्तींना म्हणजे पांढऱ्या बाबूंना कधी कधी अतिसत्ता, अतिसोयी, अति अधिकार यामुळे मानसिक अडचणी तयार होतात. म्हणजे मी कोणी तरी वेगळा आहे हे पदावर राहून सांगण्याचा झटका येतो किंवा मुळातच तो त्यांच्यात असतो. झटका पुन्हा येऊ नये म्हणून पहिल्यांदा यांच्यावर कठोर उपचार केले पाहिजेत. पुन्हा एकदा गोडसे कधी यांचा नायक होऊ नये आणि पुन्हा एकदा यांनी गांधींना खलनायक करू नये असे उपचार करावे लागतात. घटनेतील मानवी मूल्यांची जर हेच तोडफोड करत असतील तर मग उरलं काय? शिस्तभंग, मूल्यभंग, विचार-आचार भंग, घटनात्मक मूल्यांचा भंग असं सारं करून अनिधीबाई पुन्हा आपल्या गांधीभक्तीचं खोटं प्रदर्शन करत आहेत. टाइमलाईन पहा म्हणत आहेत. घड्याळ फोडून टाकायचं आणि सेकंद काटा हलतो का पहा म्हणायचं, असा हा अहंकाराचा एक किडा आहे. आपण जनतेचे नोकर नाही आहोत. आपण धर्मनिरपेक्ष नाही आहोत तर आपण शायनिंग मारणारे कोणीतरी आहोत, पुढारी आहोत, अशा भावना जाग्या होऊ लागल्या की गोडसे नायकाच्या रूपात समोर येऊ शकतो. हे सारं पाहण्यासाठी बापूजी हजर असते. त्यांना कोणी आधार कार्डावर मोबाईल दिला असता. आता कोणीतरी म्हणजे इथल्या फाटक्या-तुटक्या गरिबानं मोबाईल दिला असता तर त्यांनीही कुणाच्या तरी मदतीनं ट्विट केलं असतं, 'यू टू ब्रूट अनिधीबाई...' पण नकाश्रू ढाळणाऱ्या अनिधीबाई म्हणतात की, आपल्याला दुःख होतेय... लहानपणी बापूजींवरचा धडा आठवतोय. साबरमती आठवतेय... खरं तर हे गांधीविरोधकांनाही सातत्यानं आणि जास्त आठवतं. अनिधीबाईचं यातलं काही एक खरं नाही. लहानपणी सर्वांच्या समोर बापूजी गेलेले असतातच. ते एकट्या अनिधीबाईनं बघितलं म्हणण्यात काय अर्थ आहे? साऱ्यांची टाइमलाईन सारखीच असते. या टाइमलाईनला हिंदुत्वाचे वारे, गांधीद्वेषाचे वारे चाटू लागले की टाइमलाईन उलटी व्हायला लागते. स्वतःची टाइमलाईन बघा म्हणणाऱ्या अनिधीबाई बापूजींची टाइमलाईन का दाखवत नाही? शक्यता आहे की बापूजी त्यांच्यापेक्षा कमी हुशार असतील. पर्याय निवडून, वस्तुनिष्ठ परीक्षा देऊन ते पास झाले नसतील किंवा ते स्वतःला लोकांचे मालक समजले नसतील. शेवटी बूंद से गयी वो हौद से नही आती. मुळात बापूजी कधी मरत नसतात. गोडसेने अजून कितीही गोळ्या घातल्या आणि अनिधीबाईनी कितीही वेळा त्याचं इंग्रजीतून अभिनंदन केलं तरी ते मरत नसतात. प्रश्न गांधींवर खडे फेकण्याचा नाही तर गोडसेचं उदात्तीकरण करण्याचा आहे. धर्मनिरपेक्षतेची आणि जनतेची सेवा करण्याची शपथ घेऊन लाल दिव्याच्या गाडीत बसणाऱ्या अनिधीबाईसारख्यांचा आहे.

अनिधीबाईच्या उपरोधिक लिखाणावर टीका सुरू झाली तेव्हा सरकारलाही दखल घ्यावी लागली. कोणी म्हणालं चौकशी करू, कोणी म्हणालं त्यांनी दिलगिरी व्यक्त केलीय. खरं तर, या गोष्टीला काही अर्थ नाही. दिलगिरी व्यक्त करून कधी स्वतःला निर्दोष जाहीर करता येत नाही. गुन्ह्याचं समर्थन, उदात्तीकरण, दिलगिरीकरण करताच येत नाही. गुन्हा तो गुन्हाच आणि राष्ट्रीय गुन्हा तो गुन्हाच असतो. राज्य सरकारला हालचाल करावीशी वाटली आणि अनिधीबाईची बदली झाली. सरकारी कर्मचाऱ्यांसाठी बदली नैसर्गिक असते. ती त्यांच्या सेवेचा एक भाग असते. बदली शिक्षा नसते. एखादी गोष्ट एका जागी करू नका, दुसऱ्या जागी करा, असे म्हणण्यासारखे आहे. ही गोष्ट सामान्य माणसानं केली असती तर त्याला काय काय ठरवलं गेलं असतं. प्रसंगी जा पाकिस्तानात म्हटलं गेलं असतं. आता काय करणार? प्रश्न सरकारनं सोडवायचा आहे. पंक्चरवाल्यानं तो रस्त्यावर बसून विचारायचा आहे आणि कोणाच्या तरी वशिल्यानं अहंकारी बनू पाहणाऱ्या अधिकाऱ्यासाठी शासकीय दरात मानसोपचार केंद्र शोधायचं आहे. शेवटी सर सलामत तो पगडी पचास!

(ता.क. अनिधीबाई हे सारं तुमच्या भाषेत उपरोधिक सांगण्याचा एक प्रयत्न आहे. आमचीही टाइमलाईन बघाच. चूकभूल द्या आणि घ्या. शासकीय सवलतीत मिळणारं सत्याचे प्रयोग वाचाच. तुमच्या शायनिंग मारणाऱ्या कथित कर्तृत्वाचा आम्हाला आदर आहे. पण शेजारची रेष खोडून आपल्याला कधी मोठं होता येत नाही तर नवीन रेष मारून मोठं होता येतं. हेही बापूजींनीच आम्हाला शिकवलंय. तुम्हाला कसं काय शिकवलं नाही किंवा तुम्ही कसं काय शिकला नाही याचं आश्चर्य शोधण्यासाठी सरकार चौकशी समिती नेमेलच.)

## जय श्रीराम विरुद्ध जय हिंद

राजकारणातल्या किंवा सत्तेच्या लढाईत 'जय श्रीराम' हा मंत्र




आज ना उद्या एक हत्यार बनवला जाणार होताच. खरं तर, तो गेल्या काही वर्षांपासून बनवलाही जातोय. पश्चिम बंगालमध्ये म्हणजे वंगभूमीत, एकेकाळी डाव्यांची सत्ता असणाऱ्यांच्या भूमीत आणि आता भाजपशी एकाकी लढणाऱ्या ममतादीदींच्या भूमीत

हा नाममंत्र उघड हत्याराप्रमाणं वापरला जातोय. ममतादीदींना हरवण्यासाठी सर्व प्रकारची आयुधं अयशस्वी होत आहेत हे लक्षात आल्यावर मग 'रामनाम' घेण्यात आले. भाजपच्या कार्यकर्त्यांनी ममतांच्या भूमीत रामनामाचा जागर सुरू केला. अर्थात, रामनामाला कोणाचा विरोध असण्याचं कारण नाही; पण ममतादीदींना खिजवण्यासाठी, त्यांना त्रस्त करण्यासाठी 'जय श्रीराम' म्हणणाऱ्या टोळ्या तयार करण्यात आल्या. तृणमूल काँग्रेसचे कार्यक्रम जेथे असतील, ज्या रस्त्यावरून ममतादीदी जा-ये करणार असतील, जेथे त्यांच्या सभा असतील तेथे या टोळक्यांनी 'जय श्रीराम' असा घोष करायचा. त्यांना विरोध केला की तो करणाऱ्यांना धर्मद्रोही ठरवायचं, असा हा एका षड्‌यंत्राचा भाग आहे. रामनामामध्ये ममतादीदी अक्षरशः घुसमटून जातील, त्या बहिऱ्या होतील यासाठी प्रयत्न करायचं म्हणजेच रामाचं नाव घेऊन राजकारणात त्यांना सळो की पळो करायचं, असा हा प्रयत्न आहे. रामनामाला राजकारणाचा भाग बनवला जातोय. सरकारला धर्मद्रोही ठरवण्यासाठी असा प्रयत्न केला जातोय. याच्याही पुढे जाऊन 'जय श्रीराम' असा मजकूर लिहिलेली दहा लाख पोस्टकार्ड ममतादीदींना पाठवायचं ठरवलंय. आता पेच असा की, रामाला उत्तर काही देता येत नाही. तो पुरुषोत्तम असल्यानं उत्तरही काही मागत नाही. यातून मार्ग काढण्यासाठी 'जय श्रीराम'ला विधायक उत्तर देण्यासाठी 'जयहिंद' म्हणण्याचं दीदीनं ठरवलं. म्हणजे घडतंय असं की 'जय श्रीराम' विरुद्ध 'जयहिंद, जय वंगभूमी' असं काही तयार होतंय किंवा तयार झालंय. त्यातून कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न तयार झालाय. शांती, समृद्धी आणि श्रद्धेसाठी वापरावयाचा राम आता अलीकडच्या गचाळ वातावरणात राजकारणाचा केंद्रबिंदू करणं काही ठीक नाहीय. उद्या बंगालमध्ये विधानसभेच्या निवडणुका होतील तेव्हा वातावरण कसं असेल याची कल्पना केलेली बरी! दीदीविरोधकांचा जाहीरनामा पाच लाख, दहा कोटी, शंभर कोटी रामनामानं भरला जाईल. म्हणजे निवडणुकांचा अजेंडा काय तर रामनाम! अशा परिस्थितीत राष्ट्राचा, नागरिकांचा, त्यांना भेडसावणाऱ्या प्रश्नांचा विचार कोण करणार? याची उत्तरं कोणाकडे नाहीत. सत्तासंघर्ष टोकाला गेली की श्रद्धा, भक्ती, धर्म, देव याचा वापर होतो. जो आता सुरू आहे.

जेथे जेथे भाजपविरोधक सशक्त आहेत तेथे तेथे आता रामनाम घुसवायचं. त्यांना रामवादी व्हायला भाग पाडायचं. तिथल्या जनतेत हा वाद घुसवायचा. राजकर्त्यांना कैचित पकडायचं, असा हा एक सापळा आहे. मोदींनी 'जय किसान, जय जवान' म्हणायचं आणि मोदीभक्तांनी 'जय राम' म्हणायचं हे सारं काही ठरवून चाललंय. निवडणुकीनंतर मोदींच्या ओठावरून कोणी सहसा जय श्रीराम ऐकलेलं नसावं. ममतादीदी खंबीरपणे उभ्या आहेत. एका वेळेला काहींना मूर्ख बनवता येतं; पण सदासर्वकाळ देवाच्या नावानं साऱ्यांना मूर्ख बनवता येत नाही असं त्या सांगत आहेत. पण हा सिद्धांत झाला. भाजपनं प्रात्यक्षिक वेगळंच सुरू केलं आहे. नव्या-जुन्या पिढीत एकदा का धर्म घुसवला, त्याची प्रतीकं घुसवली, की राजकारण सोपं होतं. निवडणूक निकालानंतर खात्री झाली आहे. आता ते मागं हटतील याची शक्यता इतक्यात कमी आहे. तिकडं पिंपरी-चिंचवडमध्ये मुला-मुलींच्या हातात रायफली आणि तलवारी देऊन खुलेआम मिरवणूक काढण्यात आली. कोणी विरोध केला नाही. ज्याच्या हातात सगळंच आलंय त्याला विरोध तरी कोण करणार? एखाद्या गरिबाच्या घरात काठी जरी दिसली तरी पोलिस ती जप्त करतात. शस्त्र प्रतिबंधक कायदा लावतात. तो लावण्यात गैर काहीच नाही; पण मिरवणुकीतील खऱ्या रायफली आणि तलवारीचं काय करायचं? 'कानून के हाथ लंबे होते है' हे यांना कोणी सांगायचं की नाही? रामाच्या नावानं श्रद्धा जाग्या करणाऱ्यांना नव्हे तर भडकवणाऱ्यांना सांगायचं कोणी?

राम-राम म्हटल्यावर सत्ता मिळते. आधी सत्ता मग मंदिर असं सांगताही येतं. सत्ता आल्यानंतर पुन्हा पाहू असं सांगताही येतं. प्रश्न एकच आहे की हे आपण कुणाला सांगत आहोत? का सांगत आहोत आणि त्याचे परिणाम काय होणार आहेत? ममतादीदींना दहा लाख किंवा कोटी पत्रं पाठवण्याचं कारण काय? त्या 'जयहिंद' म्हणतात यात गुन्हा काय? कोणत्याही गोष्टीची श्रद्धा हा काळजातला सहज उगम असतो. असावा लागतो. कायद्यानं, झुंडशाहीनं कधी श्रद्धेचा झरा तयार होत नाही. दिवसातून दहा वेळा राष्ट्रगीत म्हणणारा राष्ट्रभक्त असेलच असं नाही. पण हे समजून न घेता रामनामाचं आंदोलनात आणि तेही राजकीय आंदोलनात रूपांतर केलं गेलंय. ममतादीदी राजकीय विरोधक असतीलही. त्यांना हरवण्याची इच्छाही वाईट नाही. पण इश्यू न घेता, विचार न घेता 'जय श्रीराम' म्हणणाऱ्या टोळ्या त्यांच्या मार्गात धाडण्याचं कारणच काय? भारतातल्या माणसांना राम असा जबरदस्तीनं शिकवण्याची गरज नाही. तो त्यांच्याकडे असतोच. रामाचा वापर असा राजकीय, धार्मिक, सामाजिक कलहासाठीही करण्याची गरज नाहीये. आता जे पंक्चरवाल्याला कळतं ते रामवाल्यांना का कळत नाहीये?

## काँग्रेस जिंकली की मतपत्रिका?

चमत्कारावर कुणाचा विश्वास असो अगर नसो; पण राजकारणात चमत्कार वाटाव्यात अशा काही गोष्टी घडत असतात. उदाहरणार्थ, लोकसभा निवडणुकीनंतर बिहारच्या नितीशकुमार यांनी केंद्रात मंत्रिपद घ्यायचं नाही असं ठरवलं. त्याचं कारण एवढ्या मोठ्या विश्वासू मित्राला फक्त एक जागा भाजपनं देऊ केली आहे. घ्यायचं तर घ्या अन्यथा शांत बसा; कारण आमच्याकडे ३०३ जागा आहेत. कोणत्याही कुबड्यांशिवाय आम्ही सत्तेत राहू शकतो असं कदाचित भाजपला सुचवायचं असेल; पण नितीशकुमारांनी हाच डाव मांडला आणि राज्याच्या मंत्रिमंडळात भाजपचा समावेश केला नाही. तिकडं उत्तर प्रदेशात गेली चार-सहा महिने गळ्यात गळा घालणाऱ्या बसपा-सपामध्ये निवडणूक निकालाचे मीठ पडलं. येथून पुढं स्वतंत्रपणे निवडणुका



लढवण्याचा निर्णय जाहीर केला. असाच निर्णय भाजपला अपेक्षित होता. सपा-बसपा एकत्र आले की भाजपला उठाबशा काढायला लावू शकतात हे सिद्ध झालं होतं. उत्तर प्रदेशात या जोडगोळीला जागा कमी मिळाल्या असल्या तरी मतं जास्त मिळाली आहेत. महाराष्ट्रात वंचित आघाडी जेवढी स्वतंत्र लढेल तेवढं भाजपच्या वरण-भातावर आपोआपच गाईचं शुद्ध तूप पडतं. अर्थात राजकारणात हे सारं घडतं. सामान्य माणसाला ते आश्चर्यकारक वाटतं. पण राजकीय बुद्धिबळ खेळणाऱ्यांना त्यात असं काही वाटत नाही. काही वेळा लोकच चमत्कारासारखे वर्तन करतात. राजकीय तज्ज्ञांनाही त्याचा ठावठिकाणा, थांगपत्ता किंवा अर्थ लागत नाही.

आता कर्नाटकाचंच बघा. महिन्यापूर्वी लोकसभा निवडणुकीत लोकांनी २८ पैकी २५ जागा भाजपच्या भगव्या झोळीत टाकल्या होत्या. ध्यानात गेलेल्या मोदींनाही हे कळलं नसावं किंवा कळलंही असावं. काँग्रेसचं माहेर असलेल्या कर्नाटकात मतदारांनी फक्त एक जागा पंजाला दिली आणि देवेगौडांच्या जनता दलालाही फक्त एक जागा मिळाली. या पक्षाचा जन्मदाता म्हणजे देवेगौडा पराभूत झाले. कुणाचं पानिपत तर कुणाला महापूर भेटला. या घटनेचं विस्मरण होण्यापूर्वीच झालेल्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत लोकांनी काँग्रेसला छप्पर फाड के दिलं. म्हणजे ६३ शहरांतील १३६१ जागांपैकी काँग्रेसला जवळपास सहाशे जागा मिळाल्या. धर्मनिरपेक्ष जनता दलाला २०२ तर भाजपला ४०६ जागा मिळाल्या. म्हणजे काँग्रेसला भाजपपेक्षा दीड- दोनशे जागा जास्त मिळाल्या. काँग्रेसमुक्त भारत म्हणजे एका अर्थानं विरोधी पक्षमुक्त भारत या मोदींच्या कल्पनेला कर्नाटकानं तडा दिला किंवा थप्पड दिली. आता लवकरच जिल्हा, तालुका आणि ग्रामपंचायत निवडणुका होणार आहेत. त्यातही असाच आलेख राहिला तर तो आणखी मोठा चमत्कार ठरणार आहे. दक्षिण भारत भगवा करण्यास निघालेल्या भाजपला लोकसभा निवडणुकीत यापूर्वीच तामिळनाडू आणि केरळमध्ये प्रादेशिक पक्षांनी दणका दिलेलाच आहे. विरोधी पक्षमुक्त किंवा काँग्रेसमुक्त भारत होऊ देणार नाही असाच दिल्लीला धाडलेला हा सांगावा आहे.


स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये मिळालेल्या प्रचंड यशामागं काहींना चमत्कार जसा दिसतो आहे तसं ईव्हीएम यंत्रही दिसतं आहे. कारण लोकसभा निवडणुकीच्या वेळी मशीन वापरली गेली होती. अनेकांची तक्रार असूनही ती वापरली गेली होती. त्यावर बराच वाद गाजला. विरोधी पक्ष सर्वोच्च न्यायालयापर्यंत पोहोचले; पण मशीन कायम राहिली. आता कर्नाटकाच्या कालच्या निवडणुकीत मतपत्रिका वापरल्या गेल्या. यावरून असा संशय व्यक्त केला जातोय की, ईव्हीएम मशीनमध्ये काही गडबड झाली असावी. महिन्यापूर्वी भाजपला छप्पर फाड के देणारे मतदार महिन्याच्या आतच काँग्रेसला छप्पर फाड के कसं काय देतात? असं इकडं किंवा तिकडं काय घडलं होतं किंवा घडवलं गेलं का असेही प्रश्न जन्माला येत आहेत. अर्थातच ते ईव्हीएमच्या चारित्र्याकडं बोट करत आहेत. अर्थात माणूस देईल तेच चारित्र्य मशीनला लाभत असतं. प्रश्न एवढाच असतो, अपेक्षा आणि आग्रह एवढाच असतो की तो वादातीत असावं. सिझरच्या बायकोच्या चारित्र्यासारखं असावं. पण तसं काही सिद्ध होत नाहीय. विरोधकांच्या आणि काही प्रमाणात लोकांच्या मनातला संशयही दूर होत नाही. लोकशाहीतल्या निवडणुकीविषयी, त्यातल्या मतदानाच्या पद्धतीविषयी लोकांच्या मनात शंका निर्माण होत असतील तर सम्यक मार्गानं, त्यांना विश्वासात घेऊन त्या दूर करायला पाहिजेत. काही ठिकाणी तुम्ही जिंकता तेव्हा का प्रश्न निर्माण होत नाही, असा सत्ताधाऱ्यांनी प्रतिप्रश्न करणे हे काही लोकशाहीत उत्तर नसतं. शंकेचा छोटासा कणही कुणाच्या मनात राहणार नाही अशीच व्यवस्था असायला हवी. मशीन की मतपत्रिका हा मुद्दा नाही तर संशय निर्माण होणार नाही अशी व्यवस्था हे त्यामागचं उत्तर आहे. लोकांना आपल्याला हवी तशी, सुलभ, पारदर्शी आणि जबाबदार पद्धती मागण्याचा अधिकार लोकशाहीनंच त्यांना दिलाय. शेवटी लोकशाही लोकांची असते. तेच तिचे मालक असतात. त्यांनाच आपले सेवक प्रतिनिधींनी निवडायचे असते. कर्नाटकात असा विषय तयार झाला आहे. आणखीही तो कुठं होऊ शकतो. मशीनचा युरोप-अमेरिकेत गुण येतो म्हणून भारतातही तसा गुण येईलच असं नाही. मशीन महत्त्वाचं नसतं तर ते हाताळणारे मानवी हातही महत्त्वाचे असतात. खर्च वाचवायला खूप जागा आहेत. पंतप्रधानांनी दोन-चार परदेश दौरे कमी केले तरी मतपत्रिकांचा खर्च निघू शकतो. सिन्नर विधानसभा मतदारसंघात तर असा खर्च आपण करू, असं लोकसभेत हरलेल्या कोकाटेंनी म्हटलंय. व्यक्तिगत म्हणून ते सोडून न देता मोठ्या प्रमाणात संशय का व्यक्त होतोय, यावर विचार केला पाहिजे. मतपत्रिका असतानाही भाजप जिंकला होता. कधी जनता पक्ष जिंकला होता. काँग्रेसही जिंकत आली. मत कसं द्यायचं ते एक माध्यम आहे. ते संशयातीत आणि वादातीत ठेवणं लोकशाहीत महत्त्वाचं असतं. एक मत सरकार उभंही करतं आणि सरकार पाडतंही म्हणून संशय दूर करणं महत्त्वाचं आहे. •••

# ग्रेट थॉट्स




सूर्य, चंद्र आणि सत्य या तीन गोष्टी आपण जास्त काळ लपवून ठेऊ शकत नाही

**– गौतम बुद्ध**



शिक्षण हा उत्कृष्ट मित्र आहे. ते सौंदर्य आणि तारूण्यावर वरचढ आहे – **चाणक्य**



स्पष्टीकरणावर वेळ घालवू नका. लोकांना जे ऐकावं वाटतं, तेच ते ऐकत असतात

**– पॉलो कोएल्हो**



जग ही महान व्यायामशाळा आहे, जिथे स्वतःला मजबूत बनवण्यासाठी आपण जातो – **स्वामी विवेकानंद**



ऐक्य, परस्पर प्रेम, विश्वास व चिकाटीचे सतत प्रयत्न ही आमची शस्त्रे असली पाहिजेत – **राजर्षी शाहू महाराज**



सकारात्मक अपेक्षा ही सर्वश्रेष्ठ व्यक्तिमत्वाची खूण असते – **ब्रायन ट्रेसी**




देशाचे संरक्षण शस्त्राने नव्हे तर नैतिक वर्तनाने झाले पाहिजे

**– विनोबा भावे**



आनंद ही तयार वस्तू नसते. ती आपल्या कृतीतून मिळत असते – **दलाई लामा (चौदावे)**



तुम्ही जे कुणी असाल, चांगले राहा

**– अब्राहम लिंकन**

कविता

# होरपळलेलं मन...

जाता जाता जीवनाच्या त्या वाटेने
चुचकारले मज त्या कोरड्याठण्ण विहिरीने...
करीता चिंतन तिचे चितेवरच मी चढले
रेतीच्या सागरात मीच रेती झाले...
वेदनेरूप पाखराने आठवणींचा डोंगर पोखरला
मनाच्या ढोलीत निघाले मीच केलेले माझेच रितेपणं...
तिरस्कार वाटे त्या सागराचा मज आता
माझ्याच भाऊबंदांसाठी आटल्या या विहिरी हे पाहता...
त्या माळरानावर ना दिसे चिटपाखरू
छावणीतल्या गाईस वाटे, का जन्मले हे वासरू...
सहज मोजता येई त्याच्या शरीराची हाडे
आमची जनता मात्र काढे फक्त सरकारचेच वाभाडे...
सरकार करते देखावा एक कोटी झाडे लावायचा
सारेच करिती देखावा पुन्हा एकदा सरकारनेही कराव
लावलेल्या झाडांस एक कोटी लिटर पाणी द्यायचा...
एकाचे पितात पाणी मुले ग्लुकोज टाकून
आणि एकाचे पितात गढूळ खड्ड्यामधून काढून...
या विषमतेची दरी कशी आणि केव्हा संपणार
आपल्या देशात आपुलकीचा ओढा कधी वाहणार...
करूयात सुरुवात ही दरी आपुलकीने भरण्यास
थोर पुरुषांच्या आठवणींचा डोंगर टाकुनी या दरीत...
या देशाचे रहाटगाडगे चालविण्यास व्हावे आपण सज्ज
न वाटावा मज पुन्हा तो सागरही तुच्छ...

**– शीतल तावरे**

# लेका

अंधाराला देत धडका
स्पयंदीप झालं पाहिजे
लेका, पंखात बळ दिलं
तुला उडता आलं पाहिजे

जायदादीचा तू वारस
सतर्क जागलं पाहिजे
लेका, वाघाच्या बछड्यानं
तसंच वागलं पाहिजे

निखाऱ्यावरील राखेला
फुंकर घातली पाहिजे
लेका, जुलूम जाळण्याला
धग उरातली पाहिजे

काजळी झटक, तू दिवा
जळत राहिलं पाहिजे
लेका, जीवाच्या या वाती
वळत राहिलं पाहिजे

पेरणीचा तुझा वसा
तू पेरीत गेलं पाहिजे,
लेका, शब्दांचेच शस्त्र
तू लेणी कोरीत गेलं पाहिजे

जीर्ण रूढीच्या गढीला
सुरुंग लावला पाहिजे
लेका, प्रबोधनाच्या पथी
तू पुढं धावला पाहिजे

माणसं वाचता वाचता
लिहितच गेलं पाहिजे
लेका, ओसाड गायरान
वहितीत नेलं पाहिजे

मुक्त कंठी जीवनाचं
गाणं गायिलं पाहिजे
लेका, विहारात रोज एक
फुल वाहिलं पाहिजे

**– रविचंद्र हडसनकर**
नांदेड

# कोण काय बोलतं...

## ॲड. प्रकाश आंबेडकर



राष्ट्रवादी काँग्रेसचे १० आमदार वंचित बहुजन आघाडीतर्फे विधानसभा लढण्यास तयार.

## मायावती



सपाशी आघाडी कुचकामी ठरली. यापुढील सर्व निवडणुका स्वबळावर लढणार.

## फाफ ड्युप्लेसिस (द. अफ्रिकेचा कर्णधार)



विश्वचषक स्पर्धेतील आव्हान कायम ठेवण्यासाठी भारताविरुद्धच्या पुढील सामन्यात नवी रणनीती आखावी लागेल.

## सी. विद्यासागर राव (महाराष्ट्राचे राज्यपाल)



उच्च शिक्षण क्षेत्रात विद्यार्थी वाढत आहेत, पण शिक्षणाचा दर्जा मात्र खालावतोय.

## ममता बॅनर्जी (प. बंगालच्या मुख्यमंत्री)



आता मतपत्रिकेद्वारेच मतदान हवे. ईव्हीएमविरोधात देशभरात मोहीम राबविणार.

## डॉ. व्यंकटेश काब्दे (माजी खासदार)



ठोस आंदोलनाशिवाय मराठवाड्याचा पाणीप्रश्न सुटणार नाही.

## राहुल गांधी (काँग्रेस अध्यक्ष)



मोदी सरकार म्हणजे ब्रिटिशराज आहे. देशात तुम्हाला कोणतीही संस्था पाठिंबा देणार नाही.

## डॉ. अशोक ढवण (कुलगुरु, व.ना.म.कृ.वि.परभणी)



कृषीशास्त्रज्ञ, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी शेतकऱ्यांचे सल्लागार म्हणून मार्गदर्शन केले पाहिजे.

## डॉ. बी.ए. चोपडे (डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे माजी कुलगुरू)



मराठवाड्यातील लोकांना लाथा, धोंडे मारण्याची सवय असल्यामुळे त्यांनी मला समजूनच घेतले नाही.

## उदय सामंत (म्हाडाचे अध्यक्ष)



राज्यामध्ये आणखी एक लाख लोकांना म्हाडा घरे उपलब्ध करून देणार.

## सुनील गावसकर



सध्याच्या भारतीय संघापेक्षा १९८३ चा विजेता संघ सर्वोत्तम होता.

## श्रीमंत कोकाटे



कुठलीही संसाधने उपलब्ध नसताना छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्य स्थापन केले.

■ POSTAL REGISTRATION NO. ABD/492/2019-21
■ RNI REG. NO. MAHMAR/2018/76460



**With Best Compliments from**

**AJIT CONSTRUCTION**